VOL XXXV AKOLA MONDAY 4 FEBRUARY 1901 NO 5

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १९०१ इ० अंक ५

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १ शके १८२२

## शांतवन.

मरणाच्या हानीमुळें जें दुःख होतें तें अपरिहार्य असतें. तें दुःख हलकें करावें हेंच मनुष्याच्या हातीं आहे. दुःख कमी करण्याला रोदन पुष्कळसें कारणीभूत होतें. शोक क्षोभाचा वेग रोदनानें कमी होतो. जसजसा काल लोटतो तसतसें दुःखाचें परिमार्जन आपोआप होतें. भावी कार्याची आठवणही दुःखाचा विसर पाडते. परस्परांशी बोलण्यानें व सहदुःखाच्या गोष्टी पुनः पुनः केल्यानेंही दुःखापासून विश्रांती मिळते. अशा संवादांत मृतांची आठवण व त्यांच्या सत्कृत्यांची स्मरणी यांनीं मनाला बरें वाटतें व दुःखि मनुष्याचें दुःख हलकें होतें. या शेवटच्या मार्गाला शांतवनाचा उपाय ह्मणतात. शांतवनाच्या गोष्टीमध्यें ईश्वरी निष्ठा उत्पन्न होऊन विवेकाचा विकास होतो आणि मरणाचें दुःखही विभागल्यासारखें होऊन संसारांतला मोठाच कार्यभाग सहजगत्या सुखकर होतो.

शांतवन ह्मणजे दुःखावर सुखच्छाय घालणें होय. शांतवनाचा शिष्टचार फार जुना आहे. त्याला अनुसरूनच गेल्या सोमवारीं आकोल्याच्या सभ्य गृहस्थांनीं एक जाहिरसभा भरविली होती. अध्यक्षस्थानीं मे. रुस्तुमजी साहेब विराजमान होते. अशा सभा महाराणी सरकारच्या निधनामुळें चाऱ्ही खंडांत अगदीं सामान्य झाल्या आहेत. महाराणी सरकारचा प्रजासमूह एवढा मोठा आहे कीं अशा सभांची गणती करणेंही मोठ्या श्रमाचें आहे. या सहानुभूतीनें व प्रेमळ शांतवनानें महाराणी व्हिक्टोरिअ, यांच्या आप्तवर्गीयांचा प्रजाजनांशी एकजीव होईल व परस्परांमधील प्रेमाचे व लोभाचे पाश अधीक बळकट होतील अशी आह्मांस आशा आहे. गेल्या सोमवारच्या सभेंत महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या गुणराशींचें स्मरण करून सभेच्या द्वारें शांतवनाचा निरोप पाठविण्यांत आला. त्या दिवशीं मेसर्स रुस्तुमजी, आण्णासाहेब महाजनी व महमद हुसेन या तिघांनीं प्रजाजनांच्या मनांतील दुःखोद्गार आपल्या भाषणांनीं प्रगट केले.

भावी सुखाच्या आशेनें दुःखें विसरावीं लागतात. महाराणी सरकारच्या प्रेताचा अंतिम संस्कार गेल्या शनिवारीं आटोपला आणि नंतर पूर्ववत् आपल्या दिनचर्येला लोक अनुसरले ही दुःखांत सुखाची गोष्ट होय. परमेश्वराच्या कृपेनें बादशहा एडवर्ड यांचें राज्य चिरायु व कल्याणप्रद होवो !

---

## गुण स्मरण

(कैलासवासी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नीस शांतवनाचा निरोप)

शांतवनाचा शिष्टाचार फार गोड आहे आणि तो कधींही स्वीकारण्यास चुकूं नये शांतवन करितांना आपल्या माणसाची आठवण त्याच्या गुणाचिंतनानें मनाला मोठी समाधानकारक वाटते. गुणचिंतनाचा एक उपाय मृतासंबंधानें फार शांतिप्रद होतो आणि त्याच मार्गाला अनुसरून गेल्या गुरुवारीं सायंकाळीं येथील नेटिव जनरल लायब्ररींत कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांचे पत्नीस शांतवनाचा निरोप धाडण्यासाठीं एक जाहिरसभा भरली होती. समाज फार मोठा होता. डायरेक्टर क्यांडी साहेब, राजा इंद्रकरण, रावबहादूर भागवत, रा. रा. महाजनी, दांडेकर, देशपांडे, शेवडे अदिकरून पुष्कळ गृहस्थ जमले होते. कैलासवासी रानडे यांच्या सारखा संस्मरणाचा विषय असल्यामुळें सर्व सभासद आपल्या सद्गदित कंठानें, अश्रूपूर्ण नेत्रांनें व उदास चेहऱ्यानें दुःखाचा उमाळा व्यक्त करित होते. अध्यक्षस्थानीं रा. रा. विष्णु सदाशिव बापट टेलिग्राफ सुपरिंटेंडंट हे बसल्यानंतर प्रारंभीं रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर हे बोलले कीं:—

" मित्र हो. आज आपण न्यायमूर्ती राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांचे निधनाबद्दल दुःख प्रदर्शनार्थ येथें जमलों आहों. यांची कुशाग्रबुद्धि, सौम्य चेहरा, शांत वृत्ती स्वदेशप्रीती, स्वदेशोन्नती करण्याची इच्छा फार अप्रातिम असे. यांचा विद्यालयांतला क्रम संपल्यावर यांना फेलोची जागा मिळाली. व त्यावेळेसच यांनीं आपल्या तीव्र बुद्धीच्या कारणानें सर्व प्रोफेसर व आपली सहाध्यायी मंडळी यांना अगदीं मोहित करून सोडिलें. सर आलेक्झांडर ग्रांट यांनीं कॉलेजांतील सभेंत बोलून दाखविलें कीं मी पुष्कळ विद्यार्थी पाहिले परंतु राव बहादूरा सारखा तीक्ष्ण बुद्धीचा, पोक्त, विचारी विद्यार्थी विरळाच! पुढें त्यांच्या तीव्र बुद्धीमुळें व उत्तम कर्तबगारीबद्दल मोठ मोठ्या बढतीच्या व जबाबदारीच्या जागा मिळवून शेवटीं हायकोर्टातील न्यायासन त्यांनीं मंडित केलें, व येथेंही आपली तीक्ष्ण बुद्धी, कायद्याची पूर्ण माहिती, व पोक्त विचार यांच्या योगानें दुसऱ्या न्यायाधीश मंडळीला थक्क करून सोडिलें.

पुणें व मुंबई येथें या ६० वर्षांत ज्या चांगल्या संस्था चालू झाल्या त्यांचे चालकत्व नाहीं तर त्याचे जनकत्व या सुत्रधाराच्या हातीं होतें व या सर्व संस्थांचे उद्देश बऱ्याच अंशीं सिद्धीस गेले आहेत. यांचा विद्या व्यासंग फार जबरदस्त असे. परोपकार करावा अशी यांची फार इच्छा असे व कोणावरही विकट प्रसंग आल्यास राव बहादुरांचा सल्ला व उपदेश घेण्यास मंडळी येत असे व तेही सर्वांस प्रेम बुद्धीनें व निर्मळ अंतःकरणानें सुविचार व उत्तम सल्ला देत असत. हिंदुस्थानांतील एक मोठा मोहरा गेला व एक मोठें रत्न हरपलें या बद्दल आबाल वृद्धास फार शोक झाला आहे. राव बहादुर यांचे आत्म्यास शांती व त्यांचे कुटुंबांतील मनुष्यास त्याचे मृत्यूचें दुःख सहन करण्यास शक्ती द्यावी अशी ईश्वराची प्रार्थना करून मी आपलें भाषण पुरें करितों."

त्या नंतर येथील उर्दू शाळेचे हेडमास्तर मि. महमद युसूफ हे बोलले. त्यांचें उर्दू भाषण बालबोध लिपींत येणें प्रमाणें होतें.:—

"साहेबो, इस वक्त मुझे खुद्द आशयां महादेव गोविंद रानडेकी मजालिसे उजादारीमे शरीक होकर अपना इजहारे रंज करते हुवे सुनकर आप साहेबोंको ताअज्जुब होता होगा. लेकिन मेरे नजदीक ताअज्जुब की कोई बात नही. माधवराव ऑजहानिने अपनी कौमकी इसलाहके बारेमे जो जो जॉफिशानिआँ कीं और हिंदुस्थानकी बेहबुदीमे जो जो कोशिशें कीं ओ ऐसी नही है के उसे कोई दिलसे महव करे. आम् इसे के वो हिंदु हो या मुसलमान, गब्र हो या इसाई. किसी मिल्लत व मजहब व फिरका व कौमका आदमी हो हरएक के दिलमे माधवजी ऑजहानिकी वही जाय थी जो उनके हं कौंम व हं मजबके दिल मे. माधवरावकी इलमी लिआकत व मुलकी खिदमतकी सिरफ रिआयाए हिंद ही काएल नही है बल्के सरकारके नजदीकभी एक इक्तेदार की नजरसे देखे जाते थे.

साहेबो, इब्तेदाए खिदमतसे दमे वापिसीन तक यह इसी धुनमे रहे और उसमे उह एक दर्जा तक कामया भी हुए के रेआया व फरमॉरवा मे बाहम् मोहबद् पैदा करें. फर्मारवाके दिलमे रेआयाके तरफसे एतेमाद बढावें और रेआयाके दिलमे फरमारवाके मनशा की हमदर्दीको तरकी दे.

साहेबो. बावजुद इस इस्तेदादें इल्मी व इक्तेदारे दुनयवीके सादगी और कसरे नफसीमे माधवजी ऑजहानि शायद ही आपना सानी रखते हों. जिसवक्तक न्याशनल कांग्रेस का इजलास उमरावतीमे था उसवक्त सोशल कानफरन्स मे शरीक होनेके गरजसे माधवराव ऑजहानि तशरीफ लायेथे उनके इस्तकबालके वास्ते लोग [illegible] गये थे और उनकी आप[illegible] जीथे जैसे कोहीं पहिले [illegible] देखने खडा होता है. साहे[illegible] लिबासी के बायस वह उतर कर चले गये तबभी किसीने न पहेछाना के ये साहेब वही हैं. लेकिन जब स्टेजपर खडे रहेकर इनोने गुफ्तगुकी उसवक्त हरएक के दीलमे बीजलीसी कुंद गयी. सुरते मजकूर ए बालामे तबियतके जप्त और मिजानके इस्तिकलाल मे भी अगर ऐसा कहा जावे के वह नादेरुल वजूद थे तो मुबालेगा न होगा.

सामे इने बावकार माधवराव ऑजहानिकी जाती खुबी व इल्मी लिआकत का सिर्फ हिंदुस्थानही मुकीर नथा बल्के साहेबान् अंग्रेजभी इनके औसाफका लोहा मान गये थे. चाटफिल्ड साहेब माजी [illegible] कए मुंबईके मुसे इनकी श[illegible] इह कलमात निकले [illegible] शक्स तीस तीस सा[illegible] होता है. मै कहता हुं एक तीस क्या कइ तीस कहते तो बजा था. इस्से बढकर और क्या सुबुत उनके वसफे मजकूर ए बालाका हो सक्ता है के देसिओ के लिये जो निहायत आला दर्जेका मनसब सरकारी खिदमतमे मुक[illegible] ओ[illegible] मा[illegible] एक[illegible] के[illegible] रो[illegible] मुल्कास इनको मानतेथे उस्से ज्यादा इनकी ताजीम उनके हम् असर जजो और उपलावो मे की जातीथी.

हाजेरिनें मजलिस कुल्लीयतन कुल उमर मे और बिल खुसुस हिंदुस्थानके मुलकी कौमी व दीगर सवालत मे आप दिलचसूपी के साथ इतनी माहियते कामिल रखते थे के अगर कोई उन्हे मखजने इसार कहे तो बजा है. और तुर्रा ये के उनके चेहेरेंसे यह बात मुतलक अयां न होतीथी.

साहेबो. यह फिदा ये मुल्क व कौम किसी काममे मशगुल रहिनेका इतना शौक रखतेथे के जिसवक्त उन्होने बिस्तरे मौत पर इह बात सुनीके कांतीचंद्र मुकरजीनें वफात पाइ. उस् वखत उनके मुंसे बे साक्ता इही कलमा निकला के क्या अच्छा उह शक्स है जो काम करते मरे. और खुद इनके कलमातके मुताबिक उनकी हालत हुई के मरणेसे तीन घंटे पेश्तर खाने वगैरासे फारिग् होकर दस्बारा खत इन्होंने कहत कमिशनके बारेमे इंग्लिशस्तान व हिंदुस्थानको लिखे. आफसोस के ऐसा हामी ये कौम व खादीमे मुल्क हमसे दफअतन जुदा हो गया के मरते दमतक

उस्के दिल्से इनसानी हमदर्दीके खिआलात् न गये. फिल हकीकत हिंदुस्थान पिच्छले सालस बडाही बद् नशीब रहा के यके बाद दीगरे उसपर एक ना एक मुसीबत नाजिल होती ही रही. जिनपे मै माधवजी ऑंजहानिका हमसे एक ऐसे वक्त्मे जबके उनके जैसे शक्सकी आषद्द जरूरत थी जुदा हो जाना ख्याल करता हुं. आप्सोस, सद् आपूसोत

दो पाटन के बीच आ साबीत गया
न कोये.

खुदा इस बुजरुग्के रुहके साथ वही मामला करे जो ऐसे पाक तीन तों के लिये उस्के नजदीक वाजबी हो ! ! "

त्या नंतर रा. रा. वत्तात्रय त्रिम्बक भावे बी. ए. हे मोठ्या सद्गदित बोलले कीं:—

सभ्य गृहस्थ हो, आज न्या. माधवरावाना जाऊन जरी १९ दिवस होंत आले तरी त्यांचे संबंधानें बोलण्यास उठलें कीं कंठ सद्गदित झाल्या वांचून राहात नाहीं. त्यांची ती भव्य मूर्ति, तो शांत चेहरा डोळ्यापुढे उभा राहिला कीं भडभडून येतें. आपल्या देशांतील विद्वज्जन मुकुटमणी नाहींसा झाला! हिंदुस्थानांतील मोठा मुत्सदी नाहींसा झाला! महाराणीचे हिंदुस्थानचे बादशाहीचें मुकुटांतील कोहिनूर भंगला! सुधारणा नौकेचा कर्णधार बुडाला! ज्या महात्म्याचे गुणसंघ केसरीकारा सारख्या प्रासादिक वाणीचे गृहस्थास गातां येणें कठीण झालें त्यांचे गुणसंघाचें वर्णन करण्यास माझे सारख्याची दुबळी भाषा काय पुरणार आहे? परंतु ह्या महात्म्याचे निधना संबंधानें पूज्य बुद्धि प्रगट करण्यासाठीं थोडकें भाषण केल्यावांचून राहवत नाहीं. त्यांचे एक दोन गुणासंबंधानें स्वतः पाहिलेल्या गोष्टीच मी आपणास सादर करितों. दरवर्षी मे महिन्यांत वसंत व्याख्यानमाला होत असेत. व्याख्यानाचे शेवटीं त्यांचें भाषण व्हावयाचेंच. एक वेळीं एका गृहस्थानें त्यांचे काळजास झोंबावें ह्मणून बोलतां बोलतां ह्मटलें कीं "रावबहादूरांनीं सांगितल्या प्रमाणें वागण्यास ज्यांस मूलबाळ नाहीं त्यांस ठीक पडेल परंतु दुसऱ्या गृहस्थांस तसें वागतां येणार नाहीं " अनपत्यत्वाबद्दल असा कोणी भर सभेंत दुसऱ्या कोणास टोला दिला असता तर त्याचे जिव्हाळीं लागला असता परंतु या गृहस्थांनीं त्या बद्दल किंचित् ही विषाद मानण्याचें दाखविलें नाहीं. मुंबईस एक वेळ त्यांस एका सभेंत अध्यक्ष निवडल्यावर एकानें ह्मटलें "माधवराव मुत्सद्दीपणांत हिरा पण सुधारणेच्या बाबतींत निवळ काळा कुळकुळीत हिरा आहे. तेव्हां सुधारणे संबंधाच्या सभेचे त्यांस अध्यक्ष नेमूं नयेत " परंतु ह्या महात्म्यानें त्याचाही विषाद मानला नाहीं. आपलें काम मनापासून करणें येवढेंच त्यांस दिसत असे व सदा शांत व उत्साह बुद्धीनें ते काम करीत असत. हा गुण सर्वांनीं घेण्या जोगा आहे. आणखी कित्येक गुणाचें वर्णन करूं लागल्यास काळ पुरणार नाहीं. असो.

आमचे आकोलेकरांस न्या. रानड्यांच्या गुणाची पारख नाहीं ह्मणूनच ही सभा इतकी लांबली असा आक्षेप कित्येक करितात परंतु खरी गोष्ट अशी आहे, त्यांचे मृत्यूची बातमी अगदीं अकल्पित आली व आह्मास एकदम धक्का बसला. आह्मास दुःखावेगाचा हुंदका येतो न येतो तोंच एकदम आपल्या परमपूज्य महाराणी साहेबांची प्रकृति अस्वस्थ असल्या बद्दल वर्तमान आलें. आपणा सर्वांची प्रार्थनाही ईश्वरानें मान्य केली नाहीं व लवकरच त्यांचे मृत्यूची वार्ता येऊन जबरदस्त धक्का बसला. ही ह्मणजे आकाशचीच कुऱ्हाड आर्यमातेवर कोसळली, आर्यमातेला पुत्र शोक व मातृशोक बरोबर झाला. आमच्या वृत्ति प्रक्षुब्ध झाल्या व मन अगदीं स्तब्ध झालें. किंचत शुद्धीवर येतों व वाचा फुटते तों हाय ! हाय ! राणी साहेब, राणी साहेब असा एकच हा हाःकार झाला ! आर्य मातेला पुत्रशोक मातृशोकापुढें कांहीं वेळ गिळावा लागला; व हा दुःखाचा कढ थोडा जिरतो तोंच तिचे तोंडीं "हायरे माधवा " हीं अक्षरें आलीं. तीं किंचित् विलंबाने आलीं ह्यांत नवल काय? परंतु कै. माधवरावा बद्दल आह्मास कमी दुःख झालें असें नाहीं. त्याची साक्ष आजचा हा मोठा समाजच देत आहे. "

हें भाषण संपल्यावर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे उठले. त्यांचा कंठ अगदीं दाटून आला व आवाजही खोल खोल निघे त्यांनीं श्रीमती रमाबाई रानडे यांस धाडाव याचें शांतवनाचें पत्र वाचून दाखविलें. तें पत्र असें:—

"श्रीमती सकल गुणमंडित रमाबाई साहेब रानडे यांचे सेवेसीः—

कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना—आपले पति न्यायमूर्ति राव बहादूर माधवराव गोविंद रानडे एम. ए. एल्. एल्. बी. सी. आय. ई. यांस तारीख १६ रोजीं देवाज्ञा झाली हें वर्तमान ऐकून सर्व लोकांस अत्यंत वाईट वाटलें. माधवरावजींची उत्कट जिज्ञासा, अप्रतिम विद्वत्ता, व त्या बरोबर असणारा विनयन त्यांची देशभक्ति, त्यांची उद्योगशीलता, त्यांचें सरळ निष्कपट शुद्ध वर्तन, त्यांचे सर्वांशीं प्रेमानें वागणें, त्यांचा परोपकार, स्वदेशाची सर्व दिशानीं उन्नति व्हावी एतदर्थ त्यांनीं यावज्जीव केलेले अश्रांत परिश्रम, सरकार आणि प्रजा यामध्यें प्रेम वाढत जाऊन प्रजाजनांविषयीं सरकाराच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न व्हावी व प्रजाजनांच्या मनांत सरकारानें अंगीकृत केलेल्या कार्यास सहाय्य देण्याची प्रबळ इच्छा व्हावी व जेतृ पराजित भेदबुद्धि होईल तितकी कमी व्हावी या हेतूनें केलेले परिश्रम, समाजानें नीतीनें वागून आपल्या घातुक चाली हळू हळू सुधाराव्या या हेतूनें केलेले उद्योग, कसे ही निराशेचे प्रसंग आले असतां त्यांनीं अक्षयीं दाखविलेली शांतवृत्ति धैर्य व आशा, कोणीहि कटु भाषण केलें तरी त्यांतील सत्याचा भाग घेऊन त्याशीं प्रेमानें वागण्याचा त्यांचा क्रम, त्यांचें प्रोत्साहक व उद्धर्षक पण देशकाल परिस्थिति जाणून मर्यादेच्या बाहेर न जाणारें वक्तृत्व, व या सर्व गुणांला आधारभूतच नव्हे तर पोषक त्यांची खरी धर्मश्रद्धा व परमेश भक्ति हे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं एकवटलेले होते. या कारणानें माधवरावजी सर्वांच्या-सरकारच्या व लोकांच्या- आर्यांच्या व अनार्यांच्या, हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतस्थांच्या इतकेंच नाहीं तर विदेशीयांच्याही विश्वासास, आदरास व प्रेमास पात्र झाले होते. त्यांची योग्यता त्यांच्या हयातींतच सर्वांना कळून आली होती; तरी त्यांची खरी योग्यता त्यांच्या मरणोत्तर कळून येत आहे. त्यांच्या मरणोत्तर सर्व पक्ष—पुराणपक्षसाधुवादी तसेंच सुधारणावादी—आपलीं भांडणें तूर्त तरी एकीकडे ठेवून त्यांच्या कीर्तीचे धन्यवाद गात आहेत, यापेक्षां माधवरावांच्या समदृष्टीचें व खऱ्या प्रेमाचें बलवत्तर प्रमाण दुसरें देतां येणार नाहीं. सारांश मुंबई इलाख्याचा व महाराष्ट्राचाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानचा आज एक मोहोरा गेला. एक सत्पुरुष निजधामास गेला, ह्मणून सर्व लोक हळहळत आहेत. त्यांच्या मरणानें इतरांना जर इतकें दुःख होत आहे तर आपणांस किती होत असेल ! पण येथें उपाय नाहीं. परमेश्वराच्या मर्जीची ही गोष्ट झाली. माधवरावजी गेले, पण त्यांचीं कृत्यें त्यांनीं मागें ठेविलीं आहेत, त्यांचे बोध राहिले आहेत, त्यांची कीर्ति मागें उरली आहे, सर्वांत मोठी गोष्ट ही कीं त्यांनीं आपलें उदाहरण सर्व पुढें ठेविलें आहे. त्याचा कित्ता गिरवणें हेंच सर्वांचें काम आहे.

आपण माधवरावजींच्या कार्यांस यथाशक्ति मदत देत होतां हें उत्तम उदाहरण हिंदुस्थानांतील सर्व गृहिणी वर्गास अपण घालून दिलें याबद्दल येथील सर्व स्त्रीपुरुष वर्ग आपला आभारी आहे. माधवरावजी गेले तरी आपण पूर्वी अंगिकारिलेलें व्रत आपण तसेंच पाळाल, आणि या रूपानें मरणोत्तर त्यांची सेवा कराल, अशी आह्मा सर्वांस आशा आहे. हल्लीं झालेला शोकावेग दाबून विवेकानें पूर्वीचें व्रत पाळण्यास सर्वांतर्यामी व सर्वप्रेरक जगदीश आपणांस धैर्य व शक्ति देवो अशी आमची त्याजवळ विनंती आहे ती तो पूर्ण करो. कळावें लोभ असावा ही विनंती.

आकोलें येथें भरलेल्या जाहीर सभेच्या वतीनें आपलें पत्रद्वारें दर्शन घेणारे. "

वरील पत्राचा मसूदा सर्वानुमतें पसंत ठरला आणि सभेचें विसर्जन होतांना लोक कै० रानड्यांचे गुण पुनः पुनः आठवीत होते.

## नीतीची व्याप्ति.

( आमच्या एका मित्राकडून )

जनसमाज ह्मटला ह्मणजे तो कांहीं नियमरूपी बंधनानें बद्ध असतो. मग तो समाज सुशिक्षितांचा असो, अगर अशिक्षित रानटी मनुष्यांचा असो बंधना वाचून समाज विसकळित होईल, व त्यांतील व्यक्ति व पशु ह्यामध्यें कांहीं फरक राहणार नाहीं. किंबहुना त्यापेक्षां ही नीचत्वास पोंहोंचतील. कारण आपणास माहीतच आहे कीं कांहीं जातीचे पशुही कळप करून राहतात. बंधना वांचून समाज असणें संभवनीय नाहीं. असो. ज्या वस्तु एकत्र राखावयाच्या असतील त्यांचे त्यांचे मानानें त्यांस एकत्र ठेवणारी दोरीही कमजास्त प्रमाणानें बळकट असावी लागते व मनुष्या सारखे स्वतः चलन वलन करणारे व बुद्धिरूप महाशक्तीनें प्रचलित असे प्राणी एकत्र राखणारा जो रज्जु तो तर असामान्य शक्तीचाच असला पाहिजे, व तसा तो आहे ही. हा समाजरज्जु मोठ्या तारांविगेल फार बळकट दोरखंडा प्रमाणें आहे. मोठ्या तारांचे दोरखंड बहुधा ३ पेडाचे बनविलेले असतात व तो प्रत्येक पेड बारीक बारीक पण बळकट अशा दोऱ्यांनीं बनविलेला असतो, व ह्या लहानशा प्रत्येक दोरींत एक बारीक बळकट लवचीक तार असते. ही तार दुसऱ्या तागाच्या वगैरे दोऱ्यात गुरफटलेली असते. व वर वर पाहणाऱ्याला तिचें अस्तित्व कळूनही येत नाहीं. परंतु प्रत्येक दोरांत, पेडांत व मोठ्या दोरखंडांत मुख्य शक्ति त्या तारेचीच असते. तिच्याच योगानें बाकीचे तंतु एकमेकांस जोर देतात, व जरी स्वतः कोठें कोठें ते झिजले तरी त्यांची एकंदर शक्ति बहुतेक कायम राहते.

तद्वत् ह्या समाजरज्जूचे तीन पेड निरनिराळ्या तंतूंच्या वळलेल्या दोरांचे बनविले आहेत. ते तीन पेड ह्मणजे धार्मिक, सामाजिक व राजकीय नियम हेच होत. धर्माज्ञा असोत किंवा अलिखित परंतु आचारसंमत असे शिष्टाचाराचे अगर सामाजिक नियम असोत किंवा राजाचे कायदे असोत, त्या प्रत्येकांत आपणांस एक तत्व आढळून येईल. तें हें कीं व्यक्ती व्यक्ती मध्यें न्यायाचें आचरण असावें, प्रत्येक व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य असावें (मात्र तें दुसऱ्या व्यक्तींचें स्वातंत्र्याचे आड येतां कामां नये.) व एकंदरीनें सर्वांस सुख व्हावें हेंच नीति तत्व होय. केवळ ह्या तत्वावरच बाकीचे सर्व नियम अवलंबून आहेत.

समाजाच्या रज्जूंचा एक पेड जो "राजकीय नियम " त्याचा थोडा विचार करूं. 'कायदा' हें नांव त्यास मिळालें ह्मणजे जरी तो मूळ नीतितत्वावर अवलंबून असतो तरी तो "कायदा " बनल्यावर त्याची नीतिमूलकता कोणी लक्षांत आणीत नाहीं. एकदां कायदा झाला ह्मणजे त्या प्रमाणें वागणें भाग आहे. त्याचें योग्या योग्यतेबद्दल विचार राहत नाहीं. अर्थात हा विषय कायदे पंडितांचा आहे.

दुसरा भाग "धार्मिक नियम " होय. त्याचें 'राजकीय नियम' अगर 'कायदा' ह्यांशीं बरेंच साम्य आहे. त्यांतही कांहीं कांहीं ठिकाणीं 'धर्माज्ञा' ह्मणून पालन कराव्या लागतात. लग्नांत अमुक संस्कार झाले तर मात्र तें लग्न; नाहीं तर नाहीं. त्या त्या संस्काराचे योग्यायोग्यते बद्दल विचार करण्याचे आपल्या स्वाधीन नव्हते. अर्थात् हाही विषय प्रत्येक धर्मांतील मुख्य आचार्य असतील त्यांचा आहे.

आतां राहिलेला भाग "सामाजिक नियम " हा मात्र असा आहे कीं ज्यानें उठावें त्यानें या विषयास हात घालावा. त्याची योग्यता असो वा नसो. हें हल्लीं आपणास सामाजिक चळवळी करणाऱ्या कांहीं कांहीं व्यक्तींच्या आचरणावरून कळून येत आहेच तेव्हां हा ही विषय वादग्रस्त असून लहान मोठ्या वीरांच्या धांगडधिंग्यांत आमचे हातींच लागत नाहीं. तथापि प्रत्येकांत गुरफटलेलें परंतु मुख्य शक्ति देणारें तत्व ह्मणजे 'नीति' होय.

## रामायण कथा.

जुन्या ग्रंथांचें समालोचन करण्याची विद्या मोठी कठीण आहे. ही विद्या मोठ्या परिश्रमाची, मार्मिक विचारदृष्टीची आणि चतुर युक्तिवादाची आहे. ही विद्या आपण कशी शिकावी याचा धडा रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं नुकतांच घालून दिला. रामायणाचा ग्रंथ समग्र वाचून त्यांतील उपयुक्त माहिती इतिहासकाराच्या व तत्वज्ञाच्या दृष्टीनें त्यांनीं एकत्र केली आहे. तो सर्वच निबंध फार उत्कृष्ठ आहे हें कळविण्या पेक्षां द्विरुक्तीलाही न भीतां तो आह्मी निरनिराळ्या भागाभागानें जसाचा तसाच देण्याचा विचार केला आहे.

वाल्मीकि ऋषींनीं नारदास प्रश्न केला कीं, हल्लींच्या काळीं कोणता राजा सर्व गुणांनीं मंडित, धर्मज्ञ, सत्यवक्ता, चारित्र्ययुक्त, प्रतापवान् आहे तो मला सांग. तेव्हां नारदानें रामाचें नांव घेऊन त्याचें चरित्र रावणवधा नंतर राम अयोध्येस परत आला येथ पर्यंत सांगून पुढचें चरित्र असें होईल ह्मणून ह्मटलें. पुढें नारद स्वर्गास गेल्यावर वाल्मिकी तमसा नदीवर स्नानास गेले. तेथें क्रौंच पक्ष्याचें जोडपें काममोहित असता, व्याधानें त्यापैकीं एकाचा बाणानें वध केला. हें पाहून वाल्मीकीची कारुण्य वृत्ति उचंबळली, व त्यांच्या मुखांतून छंदोबद्ध वाणी अशी निघाली.:—

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः
यत्क्रौंच मिथुना देक मवधीः काममोहितम्॥

यांत चार पाद असून हा तन्त्रीवर व ताल सुरावर गातां येईल, असा हा शोकापासून तें डांतून निघाला तेव्हां हा श्लोक होवो, असें ऋषि ह्मणाले मग स्नान करून कलश हातीं घेऊन उटजांत परत आल्यावर ध्यानस्थ बसले व शोकाकुल होत्साते श्लोक गाऊं लागले तेव्हां ब्रह्मदेव त्यांच्या दर्शनास आला. विहित आदरसत्कार झाल्यावर मुनि पुनः ध्यानस्थ होऊन तो श्लोक पुन्हां गाऊं लागले. तेव्हां ब्रह्मदेव हंसून ह्मणाले "मुनिवर्या! माझ्याच प्रेरणेने ही वाणी तुझ्या मुखांतून निघाली. हा श्लोक होईल. आतां तूं रामचरित्र नारदानें तुला सांगितलें त्या प्रमाणें श्लोक वृत्तांत गा. माझ्या प्रसादानें तुला सर्व गोष्टी उघड घडल्या असतील ह्या व एकांतांत घडल्या असतील त्या कळून येतील. तुझी वाणी खोटी होणार नाहीं. श्लोक बद्ध रचलेली रामकथा या पृथ्वीवरील पर्वत व नद्या राहतील तो पर्यंत राहील व तूंही तों पर्यंत माझ्या लोकांत राहशील" असा वर देऊन ब्रह्मदेव अन्तर्धान पावले.

मग पवित्र कुशासनावर बसून मुनीनीं ध्यान करून आतां पर्यंत झालेलें रामचरित्र पाहिलें, व त्या प्रमाणें रचलें. त्याचे एकंदर २४००० श्लोक, पांचशें सर्ग व सहा कांडें व उत्तर चरित्र धरून सात कांडें झालीं. पुढें मुनीला काळजी पडली कीं, या चरित्राचा "प्रयोग" कोण करून दाखवील?— ह्मणजे कोण हें चरित्र ताल सुरावर गाईल. तेव्हां कुशीलव (कुश आणि लव; २ पात्रें) प्रयोग करण्याला पुढें झाले. त्यांची योग्यता पाहून वेदांचें उपबृंहण करणारें व सर्व रसांनीं ओथंबलेलें हें चरित्र गंधर्वा प्रमाणें गाणाऱ्या ह्या दोघा राम प्रतिबिंब शिशूंच्या करवीं पाठ करवून ऋषीमंडळांत ताल सुरावर गायविलें. तेव्हां सर्व मुनि विस्मित होऊन ह्या गायकांस आपणांजवळील चांवर, कमंडलु, बसायाची हाती, दंड वगैरे पदार्थ देऊन तोषविते झाले. ज्यां जवळ देण्याला कांहीं नव्हतें त्यांनीं आयुरारोग्याभिवृद्धि रूप आशीर्वाद दिले. असें हें चरित्र-पुढील कवींस आधारभूत झालेलें-कुश लव अयोध्येच्या रथ्ये मध्यें गात असतां रामचंद्रानें ऐकिलें तेव्हां राजवाड्यांत नेऊन त्यांचा योग्य सत्कार करून सर्व भ्रातें व सचिव जवळ बसले होते अशा वेळीं रामचंद्रानें त्याज कडून हें चरित्र गावविलें.

सातव्या कांडांत हें चरित्र हय मेधाच्या वेळीं यज्ञ वाटांत ऋषि मंडळ जमलें असतां गाईलें असें ह्मटलें आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 4 1901

### INDIAN DISCONTENT COUNTS FOR NOTHING

The Indians it can not be denied enjoy many blessings under the British rule; our columns have borne a frank testimony to them. Yet they feel they have grievances. Some of these have vitally affected us. Our prospects have been blasted for ever. Yet they are all grievances imparted by human agency and therefore human agency alone can redress them. Some are removable the most easily while others require a deeper handling. But there is no doubt all of them can be removed if there were but a real desire to do it. Our rulers howsoever best intentioned differ from us in race, language, creed and political instinct and political training. They misapply their theories to this vast country and have for their informants the most surrepti ious among us. Long, a very long foreign yoke has induced among us certain failings. They deserve pity and sympathy. They must be eradicated by cautious and better treatment rather than despised and the people held to perpetual ridicule. The best among us perceived this and thought that if they once a year met together and informed their rulers of what their grievances are and of how they would be removed they would be doing immense service both to their rulers and also to themselves. This once thought of course on account of an overweening confidence in the good wishes of our rulers and in the sincerity of their intentions gave birth to that instituion known as the Indian National Congress. At least one thousand of our best men held in no thraldom and purchased by no favour except the empty one of title or honour meet together year after year. They do it at much expense and sacrifice. They express themselves in a language capable of inflicting silence on the most adverse critics. They do it under an honest conviction that the Government will lend at least a sympathetic ear to all their prayers and will encourage their deliberations. Indeed long before the existence of this institution the people were encouraged to speak out their mind to their rulers. A free press and the privilege of submitting petitions will bear out what we assert. Beyond that our rulers always brag they exist not for the sake of any gain to them. They do not govern us for their enjoyment but for raising our barbarous and fallen huminity. They are aliens and may not know what ails us. They can not see evil unless it were pointed to them. They would grant any reasonable request. This is the way they have been inviting a roll of grievances ever since they became our masters on the only philanthropic mission of reneration us.

The Congress is in fact the triumph of our rulers. They only could make its organisation a reality. Yet what have the Government done towards the building up of this institution? How its deliberations have been at least listened to? Every year a number of deliberations and resolutions are submitted to the Government and the Government receive a copy of the same. The attitude of reticence so wisely adopted works like a cooling cord and the people every year draw on hope "the deficiency of the present day will be supplied by the morrow." The Indians are proverbially enduring. But endurance has its limit. Year after year possed and yet the prayers of the people remained unheard. Is not this disheartening?

---

There is a sad pleasure in the thought that at the death of our Queen Empress there was spontaneous heart—felt and universal sympathy in all quarters of the globe. The high esteem and admiration for our virtuous and great old Queen was universal and in giving a formal expression to similar feelings of the Akola people, Mr. Rustomji Faridoonji made the following remarks at the public meeting held at Akola:—

Queen Empress undoubtedly the greatest, the best and the most remarkable woman that the the world has known for centuries past, and is likely to produce for centuries to come. It is quite unnecessary for me to dilate on the great virtues of our late sovereign. We in common with millions of Her other subjects, have profited by them, and we know them as well as we do the virtues of those nearest and dearest to us. The death of Her Majesty has suddenly created a great blank which it is difficult for us at present to realise. Fortunately for the world, the good actions of the great do not die with them, but are abiding; and the benefits of the rule of our late Queen extending over a quarter of the globe, and nearly three quarters of a century, will continue, while she who conferred them has, like all mortals, been gathered to her illustrous fathers.

—:0:—

The latest experiences of the Takvai advances made by the Government in the last famine do all confirm the opinion that an agricultural bank is urgently wanted in Berar. The Takvai advances were made on a large scale and the borrowing people did enjoy a sort of relief at the moderate rate of interest and the number of instalments by which the loan was to be repaid. The comfort was really great in comparison with the worry which a borrower had to undergo when he raised a loan and had to go through the costly process of executing bonds in favour of the money-lenders. The general rate of interest is very high and is almost probibitive but necessity knows no laws and the needy debtor agrees to pay any interest in order to ward off the evil of the present day. But when he thinks of repaying the loan with interest he naturally shrinks back at the enormous sums which he has to pay by way of interest. The money—lender's business is most lucrative in Berar and is consequently most destructive of the harmony and the peace of the poor people. With the rampant rate of interest, the indebtedness of the rayats is fast increasing and there is hardly any hope of improving the chances of freeing them from the trammels of the money—lending Shylock. The only remedy lies in th[illegible] bank that will unde[illegible] of the Government, [illegible] a moderate rate of [illegible] that the local Gove[illegible] into consideration t[illegible] tion of the rayats in [illegible] the famine and will [illegible] its laws of the Tak[illegible] this system of loans [illegible] angible shape of a ba[illegible]

---

## वऱ्हा[illegible]

मि. क्ले असिस्टंट क[illegible] महिन्याच्या रजेवर गेले [illegible]

रा. रा. विठ्ठलराव क[illegible] एटींग एक्स्ट्रा असि. क[illegible] पूरच्या कोर्टावर नेमल्या [illegible] रास आज रोजीं दाखल [illegible] कोर्ट पुष्कळ दिवस बंद [illegible] झालें यामुळें पक्षकार [illegible] अडचण दूर झाली.

रा. रा. हरीहर काशी[illegible] जळगांव हे तीन महिन्यांच[illegible] पण ह्यांस आफिशिएटींग [illegible] कमिशनर नेमून ह्याच्या[illegible] घेतलेल्या जमिनींच्या वि[illegible] काम देण्यांत आलें आहे.

मि. अजिमुद्दीन तहशी[illegible] यांस आफिशिएटींग एक्[illegible] नर नेमून त्यांच्या जागीं [illegible] सखाराम अग्निहोत्री यास [illegible] नेमिलें हें कळविण्यास आनं[illegible]

---

## नोटीस.

बेशमी भोलाराम वल्लद [illegible] फत्तेपूरकर, वस्ती आकोले, [illegible]

खाली सही करणार य[illegible] ण्यांत येते कीं तुह्मी आमचे [illegible] थील आमचे मकानांत [illegible] आहां त्याचें भाडें आज प[illegible] मकानही खालीं करून देत [illegible] वेळ तुह्मास सांगितलें परंतु भाड्याचे रुपयेही दिले नाहींत व मकानहीं खाली करून दिलें नाहीं, व त्या मकानाचे जवळील कोठडींत आमची लहान मोठी जीं भांडीं तांब्यापितळेचीं व लोखंडी होतीं तीं तुह्मी कुलूप तोडून काढून घेतलीं हें कांहीं बरोबर केलें नाहीं, करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या पासून बारा तासांचे आंत आमचीं भांडीं आणून पोचती करावी व मकान खाली करून तसें केल्याचें कळवावें. व भाड्याचे रुपये चुकते देऊन पावती ध्यावी. असें न केल्यास तुमचेवर कायद्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें. तारीख ३।२।१९०१ इसवी.

सही
जोरावरमल्ल गंगाधर दस्तुर
जानकीदास गंगाधर.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवाने देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्य हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढता येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं

मुंबई ब्यांक आकोला १९ जुले १८९८ } A. G. Watson Agent.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८९० चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणे

कि. मु. नंबर ,,१,, क्लास १९

विद्यमान सिव्हील जड्ज्य साहेब बहादूर आकोले

नांव जडीबाई जवजे सोनीराम तर्फे मुखत्यार गणेश नारायण मारवाडी राहणार राजंद तालुके आकोले जिल्हे आकोले यांस मयत सोनीराम बापाचें नांव रामरतन राहणार राजंद तालुके आकोले जिल्हे आकोले यांचे ६९०० रुपये कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकारितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १९०१ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजीर होऊन आप आपले हक्का विषयीं लेखी हकीगत दाखल करावी.

तारीख २९ माहे जानेवारी सन १९०१ इसवी.

V. N. Dandekar
Civil Judge Akola.

---

नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. रामा व सुमाना वल्द भोलाजी वंजारी मुकद्दम राहणार ताजना पेठ आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मापासून सावकारी रिती प्रमाणें कर्ज काढलें तें १०० रुपयांचा एक व ५० रुपयांचा एक असे दोन पुर्जे तुमचे दोघा भावांचे माझ्या नांवानी निरनिराळे आहेत तें दोन पुर्जे मिळून एकंदर रुपये १५० दिडशे माझ्या कडे तुमचे कर्जाऊ आहेत. या शिवाय माझ्याकडे तुमची एक पै देखील नाहीं. ते रुपये मी देण्यास तयार आहे. परंतु मी आपलीं कँट्रकाचीं कामें चार पांच केलीं आहेत त्यांची मजुरी गाडी भाडें व माझी मजुरी वगैरेचा सर्व हिशेब तुह्माकडे तसाच राहिला आहे तो खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ पुलगांवच्या स्टेशनावरून आर्वीला प्रेस व जीन नेण्याकारितां गाड्या दोन रोज दर गाडीस सव्वा रुपया प्रमाणें महिने दोनचें भाडें रुपये १५० दीडशे व माझी मजुरी रोज आठ आणे प्रमाणें दोन महिन्याचे रुपये ३० तीस मिळून रुपये १८०

२ आकोल्यावरून आकोटास प्रेस नेला त्याबद्दल गाड्या दोनचें भाडें एक महिन्याचें दर गाडीस एक रुपया रोजा प्रमाणें रुपये ६० साठ व माझा मजुरी त्याच कामाबरोबरचीं आठ आणे रोजा प्रमाणें एक महिन्याचे रुपये १५ मिळून एकंदर रुपये ७५ पाऊणशें

३ लादुराम मारवाडी याचा बॉलर आकोल्यावरून आकोटास नेला त्या करितां गाड्या दोन दिवस पंधराचे भाडें दर गाडीस रुपया एक प्रमाणें रुपये ३० तीस व माझी मजुरी दिवस पंधराची आठ आणे प्रमाणें रुपये ७॥ साडेसात मिळून रुपये ३७॥ साडे सदतीस

४ किसनासिंग जमादार याचें जीनचें बॉलर मेडशीला नेलें त्याला गाड्या दोन दिवस सातचें भाडें दर गाडीस एक रुपया रोजा प्रमाणें सात दिवसांचें रुपये १४ चवदा व माझी मजुरी सात दिवसाची आठ आणे रोजा प्रमाणें रुपये ३॥ साडेतीन मिळून रुपये २२॥ साडेबावीस

५ दहिहांड्याला चुनीलालचें बॉलर नेलें त्याला गाडी एक दिवस साहाचें भाडें दर गाडीस दीड रुपया रोजा प्रमाणें साहा दिवसाचे रुपये ९ नऊ व माझी मजुरी आठ आणे प्रमाणें साहा दिवसाचे रुपये ३ तीन मिळून रुपये १२ बारा

सदर्हू वर लिहिले प्रमाणे गाडी भाड्या बद्दल व माझ्या मजुरीबद्दल एकंदर रुपये ३२७ तिनशे सत्तावीस आपणाकडे निघतात त्या पैकीं तुह्मी आह्मास खर्चण्या करितां सरासरी रुपये पहिले पासून १३७ एकशे सदतीस दिले ते रुपये वजा जाता बाकी आमचे रुपये तुमचे कडे २१० दोनशे दहा फिरतात.

सदर्हू कर्जरोख्यांचा हिशेब करून ती रकम, तुह्माकडे माझी जी बाकी मजुरी संबंधाची व कंत्राटा संबंधीचा फिरत आहे तीच्या मधून वजा करावी आणि माझी बाकी येणें राहिलेली चुकती करावी ह्मणून मी तुह्मांस अनेक वेळां विनंती केली. या गोष्टीला सहा महिने होत आले तरी तुह्मी निकाल केला नाहीं.

या नोटिशीनें कळवितों कीं तुमच्या कर्जरोख्याला व्याज आहे तसें माझ्या रकमेला दर्णे निघाल्या तारखे पासून व्याज द्यावें लागेल. आणि सर्व देववेवीचा निकाल आठ दिवसांत नोटिस पोंचल्या पासून जर तुह्मी न कराल तर कोर्टांत दावा करून सर्व खर्चा सह व नुकसानी सह सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावे तारीख २९ जानेवारी १९०१ इसवी.

ताजा कलम ( ३०।१।१९०१ ) आतां च माझा भाऊ तात्या हा परत आला आणि त्यानें कळविलें कीं रामा वल्लद भोलाजी हा आकोटाला गेला आणि त्यानें सखारामाचा निरोप ह्मणून सांगितला व त्या खोट्या भूलथापीला फसून तात्यानें १ गाडी, २ बैल व २५ रुपये देऊन १।१०।१८९९ चा कर्ज रोखा वापस घेतला. ही तुह्मी लबाडी केली तर याचा जबाब तुह्माकडून दिवाणींत व फौजदारींत घेतला जाईल कळावें

सही

सखाराम वल्लद राजाराम गायकवाड राहणार ताजनपेठ आकोला निशाणी खुद्द हातची.

---

गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय कृत



## अचुक गुणकारी औषधें.

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणांबद्दल सार्टीफिकेट ( दाखला ) मिळाले आहे. ज्वरांकुश— ( तापावर रामबाण ) तीन दिवसांत हटकून हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. किं. रु. ट. व बंगी खर्च १८१

पूपरम्यावर वस्ताद—तीन दिवसांत हटकून गुण किं. रु. ! ट. व बं. खर्च ॥–

जुलाब, पोटदुखी व कॉलरा ( पटकी ) बंद करण्याचें वस्ताद औषध. प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें किंमत ८१२ ट. व बंगी खर्च ।=

शक्तीवरील गोळ्या—नंबर १ बलवर्धक शक्तिवर्धक पौष्टिक इ. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३ ट. बं. खर्च ।–

सारसोडाइन—देशी सारसापरेला, उपदंश, गर्मीचे चट्टे इ. उत्तम किं. रु. १ ट. व बंगी खर्च ६ आणे.

शक्तीवर गोळ्या—नंबर २ धातुपातावर सुस्तीवर, पानथरीवर, मुलाचे डब्यावर, अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट. व बंगी तीन बाटल्यापर्यंत खर्च ।–

केस काळेभोर करण्याचा कल्प—किं. रु. १। ट. व. बं. खर्च ॥–

रक्तपितीवर रामबाण—किं. रु. ६ ट. व बंगी खर्च ।८–

खोकल्यावर गोळ्या—१०० गोळयास किं. ८१२ ट. व बं. दोन बाटल्यापर्यंत खर्च ।–

गजकर्ण अथवा खरजेवर मलम—किं. प्रत्येक डबीस ८६ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।–

नेत्र संजीवनी थेंब—किं० रु १ ट. व बं. खर्च ।=

मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम —किं. रु. २ ट. व बं. खर्च ।–

वायुनाशक तेल—किं. ८४ ट. व बं खर्च ।=

खोकल्यावर व दम्यावर सरबत—फारच गुणकारी किं. रु. १ ट. व बं. खर्च ।=

बालसंजीवन—किं. रु. १ ट, व बंगी खर्च ८१२. ३ बा. ट. व बंगी खर्च ॥।–

कर्णरोगावर थेंब—किं ८१२ ट. व बंगी खर्च ।=

दांतांचें मंजन—किं. ८४ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।–

केशवर्धक तेल—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ॥–

जुलाबाच्या गोळ्या—किं ८६ ट. व बं. खर्च तीन बाटल्यापर्यंत ।–

अन्नपाचक गोळया—१०० गो. किं. रु. १। ट. व बं. खर्च ।–

मुलांचे ताड्यावर—( आंकडीवर ) रामबाण किं. रु ३ व रु. ट. व बं. खर्च ।=

मुद्दाम उन्हाळ्याकरितां थंडगार, हुषारी आणणारी, ऊत येणारी सरबताची भुकणी किं. रु. १ ट. व बंगी ॥।–

केस जाण्याचें औषध—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ।– हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास केस तत्काळ निघून जातात

### पंढरीनाथ गोपिनाथकृत स्वदेशीय सार्सापरिला मिश्रित रक्तशुद्ध करणाऱ्या व वाढविणाऱ्या

ट. व बं. ख. ।– **गोळ्या.** किं. १ रु.

घाऊक औषधें घेणारांस कामिशन देण्यांत येईल. रेल्वेजवळ राहणारांनीं औषधें रेल्वेनें मागवावीं. कारण रेल्वे हांशील स्वस्त पडतें. विस्तृत सचित्र जाहिराती व क्याटलाग मागवा. ह्याशिवाय पाहिजे त्या रोगावर वयाचें व प्रकृतीचें मान सविस्तर कळविल्यास औषधें पाठविण्यांत येतील.

## वैद्य--गोपिनाथ कृष्णाजी क्षात्रिय.

## एजंट पाहिजेत.

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत. मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N.

सहामाही ,, ३ ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, १ ८८
किरकोळ अंकास .........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......... ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 a
ingle copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ......2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line,,.3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 11 FEBRUARY 1901 NO 6

वर्षं ३५ आकोला सोमवार तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९०१ इ० अंक ६

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढता येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुले } A. G. Watson
१८९८ } Agent.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ८ शके १८२२

## रामायण.

संस्कृत रामायणाचा ग्रंथ केवढा आहे याची कल्पना देखील पुष्कळांस नसेल तेव्हां हा मूळचा ग्रंथ वाचणारे लोक थोडेच आढळतील. अलीकडे विद्वान् पुष्कळच झाले आहेत पण त्यांच्या दृढ व्यासंगामुळें विद्यार्थीदशा संपतांच ते विद्येला कंटाळतात आणि पुढें त्यांच्या प्रदीप्त व उज्वल ज्ञानाचा प्रकाश मंदमंद होतो आणि अखेरीस नामधारी विद्वान् मंडळींच्या पंक्तीला आमची पुष्कळशी शिकलेली मंडळी येऊन बसतात. अशा स्थितींतल्या विद्वानांचा परिचय एका परम पूज्य व खऱ्या विद्वानांच्या प्रयत्नाशीं व व्यासंगाशीं करून देण्याचा आमचा विचार आहे. रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं रामायणासंबंधानें जो निबंध लिहिला आहे तो वाचतां वाचतां आह्मांस फारच आनंद वाटला हें सांगणें अगदीं साध्या लौकिक रीतींचें वाटेल परंतु या निबंधाचें अध्ययन एखाद्या क्रमिक पुस्तका प्रमाणें किंवा परीक्षेला नेमलेल्या विषया प्रमाणें करूं लागावें ह्मणजे या निबंधाची खरी योग्यता कळण्या सारखी आहे. रामायणा सारख्या ग्रंथाकडे सांप्रतची विचारदृष्टि कशी लावावी इतकेंच या निबंधा पासून शिकण्या सारखें नाहीं, तर वाचनाची दिशा कशी असावी, तात्पर्य कसें संग्रहित करावें, सारभूत गोष्टी कोणत्या व कशा संविधानकाला जुळवून घ्याव्या, आणि इतिहासाची तत्वज्ञता ग्रंथांतल्या नानाविध विषयांकडे कशी लागूं करावी इत्यादि अनेक गोष्टी या निबंधा पासून शिकण्या सारख्या आहेत, हा निबंध वाचतांना वाचकांनेंही निबंधकाराच्या परिश्रमाची अटकळ करण्यास विसरूं नये ह्मणजे रामयणाच्या समुद्रांतलीं मोत्यें वर काढून त्यांचा बनविलेला रत्नहार किती रमणीय व आल्हादकारक आहे हें सहृदय वाचकच सांगू शकतील.

रामायणाच्या कथेचा उपोद्घात प्रारंभीं सांगितल्या नंतर या मोठ्या कथेचा निष्कर्ष निबंधकारानें असा दिला आहे.:—

### कथेचा निष्कर्ष.

आधुनिक दृष्टीनें ह्या कथेचें निरीक्षण केलें व रामायणांतील इतर भागाशीं हिला जुळवून पाहिलें तर ह्या कथेचा निष्कर्ष असा निघतो.

वाल्मिकि कवि रामाचा परम स्नेही होता ( ७,४७,१६-१७ ) लक्ष्मण त्यांना दशरथा प्रमाणें लेखी. यांच्या आश्रमाजवळ चित्रकूट पर्वतावर राम, लक्ष्मण आणि सीता यांसह चार महिने राहिला होता. राज्यप्राप्ति झाल्या नंतर लोकापवादास भिऊन रामानें सितेचा त्याग केला त्या वेळीं लक्ष्मणास तिला वाल्मीकीच्या आश्रमाजवळ नेऊन सोड अशी त्यानें आज्ञा केली. निर्जन वनांत टाक असें ह्मटलें नाहीं. लक्ष्मणानें सीतेला तेथें नेलें तेव्हां हा वाल्मीकीचा आश्रम जवळ आहे, यांच्या पादच्छाये खालीं तूं स्वस्थ ऐस, तूं पतिव्रता आहेस तुझें श्रेय होईल, असें ह्मटलें आहे. या आश्रमांतच सीता प्रसूत होऊन तिला दोन अपत्यें झालीं. त्या रात्रीं शत्रुघ्न मधुपुरावर जाऊन लवणाचा वध करण्या करितां चाललों असतां या आश्रमांतच होता. ( ७,६५।६६ ) लवणाला मारून मधुपुराची पुन्हा आबादानी करून शत्रुघ्न बारा वर्षांनीं परत अयोध्येस रामपाददर्शनार्थ जात असतां पुनः वाल्मीकीच्या आश्रमांत उतरला होता. तेथें त्यानें व त्याच्या सैन्यानें कुशलवांस रामचरित्र गातांना ऐकिलें व सर्व तटस्थ झाले.

सीता बारा वर्षें वाल्मीकी जवळ राहिली होती तेव्हां रामचरित्राचे बरेच भाग तिच्या कडून वाल्मीकीला कळले असले पाहिजेत. तशांत वाल्मीकि तत्कालीन ऋषीं प्रमाणें बरींच तीर्थें हिंडला असला पाहिजे, व ऋषि मंडळांत बसून त्यानें अपरान्हीं कथाही ऐकिल्या असल्या पाहिजेत. या योगानें त्यांची मूळची स्वयंप्रतिभा उद्दीपित झाली असेल व तशांत सीते सारखी पतिव्रता नित्य डोळ्या समोर वागतांना पाहून करुणेनें तीव्र झाली असेल हें सांगावयाला नको. वाल्मीकीला सर्व सृष्टी करतलामलकवत् दिसत असे. त्याचीं वर्णनें फारच साधीं व मनोहर आहेत. त्यांत राम चरित्रा सारखें वीरकरुणरसांनीं परिपूर्ण चारित्र मिळालें तेव्हां हें सर्व काव्य पुढील कवींना आधार झालें, व तें सरस्वतीच्या मुखातून ऐकून ब्रह्मदेवानेंही मान डोकविली. ( ७,२११,११ ) हें युक्तच आहे.

### काव्यांत अतिशयोक्ति व असंभावना,

आधुनिक टीकेच्या कसोटीस हें काव्य लाविलें तर त्यांत पदोपदीं अतिशयोक्ति व असंभावना हे दोष दिसतील. पण कोणीही कवि असो व त्याची प्रतिभा कितीही उज्वल असो तरी समकालीन लोकांच्या समजुतींच्या पलीकडे त्याला फारसें जातां येत नाहीं. हें तत्व जर आपण लक्षांत ठेविलें तर, एकुणीसाव्या शतकांतील रसायन शास्त्र, विद्युच्छास्त्र इत्यादि शास्त्रांच्या अध्ययनानें ज्यांची सत्यान्वेषणबुद्धि तीव्र झाली आहे ज्यांचा सत्यान्वेषणाचा पंथ असिधारे प्रमाणें कठीण झाला आहे, त्यांनीं हें चरित्र शास्त्राच्या कसोटीस उतरत नाहीं, असें ह्मटलें तरी आपण फारशी पर्वा करूं नये. शास्त्र ह्मणून या चरित्राचें अध्ययन करूं नये. तसें केलें असतां आपण घोटाळ्यांत पडूं.

### रामायण काव्य

चरित्र काव्य आहे असें धरून चालूं या. वाल्मीकि रामाचा परम सखा होता ह्मणून रामाचे गुण वर्णितांना, त्याच्या राज्याची स्थिति सांगतांना, त्यानें स्तुतीची झांक अधिक टाकली असेल, तसेंच रावणादिकांच वर्णन करितांना कृष्णवर्ण जास्त टाकला असेल व शत्रूच्या वैभवाची महती जास्त केल्यानें त्याला ज्यानें धुळीस मिळाविलें त्याचा पराक्रम आपोआप वर्णिला जातो या न्यायानें रावणादिकांच्या ऐश्वर्याची थोरवीही वाढविली असेल हें घेऊन चाललों तरी हरकत नाहीं.

तर मग त्या काव्यापासून आपणांस कांहींच लाभ मिळणार नाहीं अशी जर आपण कल्पना कराल तर ती चुकीची होईल. कोर्टामध्यें एखाद्या पक्षाकडील साक्षीदार लांब रहात असला ह्मणजे कोर्ट त्याची साक्ष त्या ठिकाणीं कमिशन बसवून घेते, व त्या जबानीवरून अनुमान काढतें, त्या प्रमाणें येथें आपण केलें पाहिजे. अनुकूल भाग साशंक दृष्टीनें पाहिला पाहिजे; प्रतिकूल भाग जमेस धरिला पाहिजे; जो भाग कथेच्या ओघानें सहजगत्या सांगितला असेल, व ज्यांत रागद्वेषादिकाला स्थान असण्याचा संभव कमी असेल अथवा मुळींच नसेल, तोही भाग जमेस धरितां येईल. तसेंच दृष्टांतद्वारा बरीच माहिती मिळण्याची आशा करावी.

अनुकूल भाग साशंकदृष्टीनें पाहावा, असें वर ह्मटलें आहे त्याची फोड करणें जरूर आहे. ह्या ह्मणण्याचा अर्थ असा नाहीं कीं, हा सर्व भाग त्याज्य आहे. त्यांतील ग्राह्यांश घेतला पाहिजे. तसेंच त्या वरून उत्तम पुरुषाविषयीं, साध्वी स्त्री विषयीं, किंवा उत्तम राज्यव्यवस्थेविषयीं वगैरे त्या वेळच्या विचारी लोकाग्रणींच्या कल्पना ( ideas ) कशा होत्या हें सहज समजतें. वस्तुस्थिति कल्पनेशीं सर्वांशीं जुळत नाहीं, तरी ती कल्पनेच्या मागोमाग धांवत असते. आणि कल्पना जर उत्तम असेल तर वस्तुस्थिती कधीं कालीं तरी तिच्या जवळ जवळ येईल अशी आशा असते. मि. मोर्ले यांनीं आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे:—

The decisive sign of the elevation of a nation's life is to be sought among those who lead or ought to lead. The test of the health of a people is to be found in the utterence of those who are its spokesmen, and in the actions of those whom it accepts or chooses to be its chiefs. We have to look to the magnitude of the issues and the height of the interests which engage its foremost spirits. What are the best men in the country striving for? And is the struggle pursued intrepidly, and with a sense of its size and amplitude or with creeping foot and blinking eye? The answer to these questions, is the answer to the other question, whether the best men in the country are small or great.

कवि हे लोकाग्रणींत श्रेष्ठ असतात; व त्यांच्या कल्पना शतकानुशतकें लोकांस मार्ग दाखवीत असतात. वाल्मीकीच्या कल्पना आज अडीच तीन हजार वर्षांवर या आर्य भूमींतील स्त्रीपुरुषांना, राजारंकांना, मार्ग दाखवीत आहेत. समाजाचे व्यवस्थित रूप जें हल्लीं दिसत आहे व पर कल्पनांना व विचारांना टक्कर देण्याचा जो त्यांत जोम आहे तें स्वरूप व तो जोम वाल्मीकी सारख्यांच्या कल्पनांचा परिणाम होत. त्या कल्पना कायमच्या ठशांनीं छापल्यामुळे त्यांना कमी जास्त प्रमाणानें रूढींचें स्वरूप आलें, तींत फारसा फरक होत नाहीं. रामायण काव्य तसेंच महाभारत, हे दोन ग्रंथ, किंवा त्यांचा आधार धरून रचलेलीं आधुनिक प्राकृतांत रचलेलीं नाटकें व काव्यें जोंपर्यंत आबालवृद्धांच्या वाचण्यांत अगर ऐ-

कण्यांत अगर पहाण्यांत येत आहेत तों पर्यंत रूढीचा प्रभाव कायम राहिला पाहिजे अशी या दोन ग्रंथांची महती आहे. ह्मणून त्यांतील कल्पना वस्तुस्थितीस जुळत नसल्या तरी त्या जर उदात्त असतील, व रूढी यांच्यांशीं विसंगत असेल, तर हल्लींच्या लोकनायकांनीं या पुरातन कल्पना लोकांच्या सेवेस पात्र होतील असे प्रयत्न केले पाहिजेत, अशा कल्पना या काव्यांत आहेत. असो.

या काव्याचें अध्ययन केल्यानें कोणती माहिती मिळते हें सांगण्या पूर्वीं या काव्याच्या स्वरूपांत थोडा फार फरक झाला आहे त्याबद्दल सांगितलें पाहिजे.

मूळचें रामायण फार लहान होतें व तें कथांनीं वगैरे पुढें वाढविलें असा तर्क पाश्चात्य विद्वानांनी केला आहे हा खरा असला तरी मूळचें रूप शोधून काढणें दुरापास्त झालें आहे. हल्लींचें रामायणाचें जें स्वरूप आहे तें मनूच्या नंतर आणि बुद्धाच्या कालाच्या पूर्वीं त्यास प्राप्त झालें आहे इतकें निश्चयानें सांगतां येतें. तेव्हां उपलब्ध असलेल्या रामायणावरून अगदीं प्रथम रामायण झालें त्या काळची माहिती अगर त्या काळच्या समजुती कळल्या नाहींत तरी वर सांगितलेल्या ह्या दोन गोष्टी मधल्या काळाच्या संबंधानें आपणाला बरीच माहिती मिळेल. हल्लीं उपलब्ध असलेल्या प्रतीस सुधारून वाढविलेली प्रत असें ह्मटलें तरी चालेल.

## प्रक्षिप्त

पण रामायणाची या काळांत ही वाढविलेली आवृत्ति कायम राहिली नाहीं. मधून मधून प्रक्षिप्त सर्ग कोणी तरी घुसडून दिले आहेत. प्रक्षिप्त श्लोक किती असतील तें सांगणें कठीण आहे. वाढविलेल्या आवृत्तींत सर्ग ५०० होते, असें ह्मटलें आहे, पण हल्लींच्या मुंबईत छापलेल्या आवृत्तींत ६४५ आहेत. कित्येकांच्या मतें उत्तर कांडांतील सर्ग यांत जमेस धरूं नयेत असें आहे. यांतील १११ सर्ग कमी केले, तरी बाकी ५०० वर राहतात. कतक ह्मणून एक रामायणावर टीकाकार होऊन गेला, त्यानें या विषयीं बराच विचार केला आहे, असें रामीय टीकेंत ह्मटलें आहे तो व तीर्थ यांच्या टीका मीं पाहिल्या नाहींत. प्रकृत मुंबईच्या आवृत्तींत ह्या वीस तरी सर्ग टीकाकाराच्या पाहण्यांत आलेले नाहींत असे "प्रक्षिप्त" ह्मणून छापलेले आहेत. असे प्रक्षिप्त सर्ग कसे येतात, या विषयीं थोडा विचार केला पाहिजे.

कोठें मुख्य कथेंत कांहीं भाग अविस्तृत आहे, किंवा कांहीं गोष्ट घडली असें अनुमान निघत असून ती घडल्या बद्दल वर्णन नाहीं. तर तो भाग वाल्मीकीचा वेष घेतलेल्यांनीं वाढविला आहे, किंवा नवीन जोडून घातला आहे. उदाहरणार्थ काकश्वर्षणाचा सर्ग किंवा इंद्रानें सितेला धाडलेल्या अन्नपात्रा संबंधानें असलेला सर्ग....तसेंच एखाद्या वीराची उत्पत्ति कथा दिली नाहीं व ग्रंथ त्यामुळें पुढील कवीस अपुरा वाटला तर तो भाग त्यानें नवीन घातला आहे.

किती एक प्रसंगीं एखाद्या अधुनीक कवीस एखाद्या सर्गांतील श्लोकांचा अर्थ निराळ्या वृत्तांत लिहावा असें वाटून त्यानें ते तसे श्लोक रचून पोथीच्या पृष्ठाखालीं लिहिले असावे कालान्तरानें या पोथीची प्रत करणाऱ्या लेखकाच्या अज्ञानानें मूळचें अनुष्टुभ श्लोक व तदभिन्नार्थ इतर वृत्तांतले श्लोक विचित्र माळा भरणा प्रमाणें नवीन प्रतींत एकाच पृष्ठांत सारखे गोविले असावे पहा कचित् रूढीस विघातक गोष्टींत प्रचलित रूप दिलें असावें असें वाटतें.

पण हे माझे तर्क मी भीत भीत आपणापुढें ठेवीत आहे. या प्रक्षिप्तांचा विचार करितांना निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित असलेल्या निरनिराळ्या काळीं लिहिलेल्या रामायणाच्या पोथ्या ताडून पहावयास पाहिजेत. तसेंच रामायणांतील उतारे ह्मणून इतर कवींनीं आपल्या ग्रंथात घेतले आहेत ते उपलब्ध रामायणाच्या प्रतींत आहेत कीं काय या बद्दल शोध केला पाहिजे. मग अंतरंग पुराव्या वरून कोणते श्लोक प्रक्षिप्त असावे या बद्दल तर्क केला पाहिजे. इतके सर्व करण्याला मजजवळ सामग्री नाहीं, व पुरेसा वेळही नाहीं; तसेंच असलें काम करण्याचा अभ्यास पाहिजे तोही मला नाहीं.

तरी जो प्रक्षिप्त भाग ठरलेला आहे, त्याची व वाढविलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या रामायणांतील मूळाची जवळ जवळ ठेवून पहाणी केली, तर भाषेंत व वृत्तांत जरी थोडा बहुत प्रकार दिसून येतो, व संदर्भ जुळवावयाला पंचाईत पडते तरी विचारांत फारसा फरक दृष्टीस पडत नाहीं. हा मी रूढीचा प्रभाव समजतों. जुनी रूढी नवीन कवीच्या अंगांत इतकी खिळली होती कीं, त्याचे विचार पूर्वींच्या कवीच्या विचाराहून फारसे भिन्न दिसून येत नाहींत.

---

देवी काढविण्याचा उपयोग सर्वत्रांस चांगला माहित आहे आणि त्यामुळें देवी काढण्याच्या कामाला कोणी मोठीशी हरकत करीत नाहीं. आपापल्या मुलाबाळास योग्य वेळीं देवी काढविण्या विषयीं लोकच काळजी घेत असतात आणि गोस्तनदेवीतला देवी अगदीं प्रचारांतल्या झाल्या आहेत. सध्यां अडचण देवी काढविण्या संबंधाची नाहीं पण देवी पुनः पुनः काढविण्या विषयीं लोक हरकती आणितात. देवी दुबार काढण्या संबंधानें सानिटरी कमिशनर साहेबांचा आग्रह विशेष दिसतो. अलिकडे डाक्टर लोकांचा अभिप्राय असा आहे कीं एक वेळ देवी काढविल्या नंतर पुनः देवी काढवल्यात ह्मणजे देवीच्या रोगाची भिती राहत नाहीं. दोनदां देवी टोचविण्या विषयीं लोकांची प्रवृत्ति प्रतिकूळ आहे, पहिल्या देवी संबंधानें लोक काळजी घेतात पण पुनः देवी काढवूं नयेत असा लोकांचा ग्रह आहे. मनाच्या या प्रवृत्ती मुळें देवी काढण्याची पुनरावृत्ती करितांना लोक मागे सरतात आणि सानिटरी कमिशनरांचा हेतु सिद्धीस जात नाहीं. अलिकडे सरकारी विचार पुनः देवी काढण्या विषयीं सक्ती करण्याचा दिसतो. सक्ती कायद्यानें करितां येत नाहीं ही गोष्ट खरी तथापि सक्तीची अंमलबारी होण्याचा मोठाच संभव आहे: पुन्हां देवी काढण्याला लोकांची अनुकूलता नाहीं इतकेंच नाहीं तर या बाबदींत डाक्टर लोकांचा अभिप्राय तरी एकच पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. वास्तविक प्रकार आमच्या विधानाच्या उलट असेल तर आमचे सानिटरी कमिशनर देवी पुनः काढविण्याचे फायदे लोकांस एखाद्या सरक्युलरानें कळवितील तर देवी पुन्हां काढण्याला लोकच आपोआप सिद्ध होतील. देवी दोयदां काढविण्याची गोष्ट लोकांच्या मर्जी वर ठेवावी असें आमचें मत आहे आणि तदनुरूपच या बाबदींत हुकूम सुटतील अशी आह्मीं उमद बाळगतों.

---

## बादशहाचा निरोप

आमचे सार्वभौम बादशहा एडवर्ड यांनीं इंडियाच्या राजेरजवाड्यांस व प्रजाजनांस वुइंडसर येथून गेल्या सोमवारीं एक पत्र लिहिलें आहे. हें पत्र फार कळवळ्याचें असून इंडियन लोकांविषयीं प्रजावात्सल्य यांत अगदीं स्पष्टपणें दिसून येत आहे. या पत्राचा मतलब सर्वांस कळावा ह्मणून तो आह्मी मराठींत खालीं देतों. :—

"आमच्या परमपूज्य मातोश्री निवर्तल्या व प्रजासमूह शोकाकुल होऊन गेला! त्यांच्या या निधनामुळें सिंहासनाचा अधिकार वारशाच्या नात्यानें मजकडे आला. हा वारसा वंशपरंपरेनें फार लांबवर पासून चालत आला असून मजपर्यंतचा त्याचा इतिहास फार जुना आहे. माझ्या इंडियाच्या राज्यांतील नेटिव संस्थानांच्या राजराजवाड्यांचें व प्रजाजनाचें मी अभिनंदन मनापासून करितों आणि त्यांच्या कल्याणाविषयीं मला अंतःकरणापासून काळजी आहे असें मी त्यांस अश्वासन देतों. मी ज्यांच्या गादीवर बसलों आहे त्या पुण्यश्लोक व चिरशोचनीय मातोश्री या राष्ट्राच्या पहिल्या चक्रवर्तिनी होत्या. त्यांनींच इंडियाचा राज्यकारभार आपल्या स्वतांच्या हातीं घेतला आणि या अफाट राज्याच्या कारभारांशी आपला संबंध निकटचा जडला हें दर्शविण्यासाठीं त्यांनीं बादशाहिणी हा किताब धारण केला.

इंडियाच्या संबंधानें सर्व बाबदींत चक्रवर्तिनी महाराणी सरकार स्वतां लक्ष्य पुरवीत व हा त्यांचा क्रम सततचा होता. आणि त्यांच्या गादी विषयीं व त्यांच्या स्वतां विषयीं कोठ्यावधी इंडियन लोकांमध्यें जी राजनिष्ठा व राजभक्ती होती ती मला पूर्णपणें माहित आहे.

त्यांच्या त्या चिरकालीन व पुण्यप्रतापी कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षीं ही राजभक्ती फारच व्यक्त व स्पष्ट दिसून आली. दक्षिण आफ्रिकेंतील लढाईंत संस्थानिकांनीं जी अप्रतिम राजसेवा केली आणि नेटीव लष्करानें आपल्या देशाहून बाह्य देशीं जो मर्दुमकीचा रणशूरपणा गाजविला त्या दोन्ही गोष्टींनीं खरी राजभक्ती निदर्शनास आली.

त्याच्याच इच्छेवरून व आज्ञे वरून मी इंडियांत आलो होतों. आणि या जुन्या व विख्यात राष्ट्रातील संस्थानिक, लोकसमूह व नगरी यांची ओळख मी स्वतां करून घेतली.

ह्या वेळीं माझ्या मनाचे जे उत्कृष्ट ग्रह झाले आहेत ते मी कधीं विसरणार नाहीं. आणि पहिल्या चक्रवर्ती बादशाहिणीचा मोठा कित्ता मी पुढें ठेवीन आणि सर्व दर्जांच्या माझ्या इंडियन प्रजेच्या कल्याणा विषयींचे प्रयत्न मी सतत करीन आणि प्रजेची निरंतर राजनिष्ठा व राजभक्ती यांच्याच प्रमाणें संपादन करण्या साठीं मही परिश्रम घेईन."

असा हा कळकळीचा निरोप ऐकून सर्व लोकांस मोठा आनंद होईल. ईश्वर करो आणि आमचा बादशहा चिरायु, सत्यप्रतिज्ञ व कीर्तीमान होवो.

---

## स्मारक.

चक्रवर्तिनी व्हिक्टोरिआ यांचें स्मारक कोण करणार नाहीं! यांच्या सारखें अन्नदानीचें राज्य इतिहासान्तरीं दुसरें आढळणार नाहीं. विद्या, कला, व शास्त्रें यांचें रत्नभांडार यांच्या कारकिर्दींत खुलें झालें आणि सरस्वती व श्री यांच्या राज्यांत एकत्र नांदूं लागल्या इतकेंच नाहीं तर इतिहासांतली अपूर्व गोष्ट ह्मणजे या दोहोंचा संगम होऊन या परस्पराला परिपोषक व गुणशाली झाल्या. पुरुष व स्त्री यांच्या हक्काची समता या राज्यांत दृष्टोत्पत्तीस आली. अशा या अद्भूत कारकीर्दीचें स्मारक ह्मणजे भावी कल्याणराशी होत. पुढील सुखवैभवाचे अनुभोक्ते आपल्या संवादाची कारणमाला यांच्या कारकिर्दीशी आणून पोंचवितील तेव्हां पदापदीं व्हिक्टोरिआ हें पवित्र नाम आठवत जाईल आणि आमच्या दृष्टीनें ही भावी सुसृष्टी खरोखर पहिलें स्मारक होय. या विचारा प्रमाणें थोर महात्मे आपल्या अजरामर कीर्तीनें सदा जीवंत आहेतच.

सिंहावलोकनानें भविष्यदृष्टी प्राप्त होते. ज्याला मागला इतिहास चांगला कळतो तोच भविष्यकाला विषयीं कांहीं योग्य अनुमानें बांधू शकतो. ज्याला भूतकालाची सांखळी वर्तमानकालच्या दुव्यांनीं भविष्यकाळापर्यंत लांबवितां येते तोच खरा मार्मिक मनुष्य होय. असे मार्मिक लोकच आपल्या पूर्वजांची थोरवी राखतात व आपल्या वर्तमान गुणांनीं वंशजांला वंद्य व पूज्य होतात. जे पूर्वजांचें स्मारक करितात त्यांचेंच स्मारक पुढील पिढ्या करितात. स्मारकाची कल्पना गुणग्राहकतेला धरून आहे आणि तिच्या मध्यें भूत व भविष्य यांची एक सांगड पडते. स्मारकानें दोन गोष्टी लाभतात. ज्याचें स्मारक आपण उभारतों त्याचा चांगुलपणा पुढील पिढ्यांस कळवितांना आपण तो बहुगुणित करितों आणि स्मारक करणाऱ्याचीही आठवण आपोआपच पुढील पिढ्यांस राहते.

महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकाची गोष्ट निघाल्या बरोबर इंडियाभर हा एकच मुख्य विषय होऊन बसला आहे. स्मारकाची गोष्ट लार्ड कर्झन साहेबांनीं मनावर घेतली आहे व त्या मुळें वर्गण्यांचे आंकडे लक्षावधी रुपयाचे पडत आहत हें अगदीं साहजिक आहे. कलकत्यास एक अप्रतिम अज-

बखाना उभारण्याचा संकल्प ठरला आहे स्मारक करावें किंवा नाहीं हा प्रश्न राहिला नाहीं. फक्त स्मारक कोणतें करावें या विषयीं वाटाघाट चालू आहे. प्रांतोप्रांत निरनिराळीं स्मारकें करण्याला कोणाची हरकत नाहीं तथापि एक मोठें स्मारक कलकत्यास करावें असा लार्ड कर्झन साहेबांचा विचार आहे. आमच्या मतें स्मारक असें असावें कीं ज्याच्या योगानें औद्योगिक शिक्षणाची कांहीं तरी निराळी सोय होईल. आणि असेंच स्मारक प्रस्तुक कालाला अत्यंत अवश्यक आहे.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 11 1901

The Revenue administration of Berar for 1899—1900 seems to be more satisfactory than was expected in the actual brunt of the famine. The report of that year is just out and it is but natural that it should be a sad tale of the effects of the last year's famine. The report is a brief one and asks us to await the publication of the famine—report for a fuller information on a number of important and instructive topics in connection with the condition of the people. From the succinct account of the Takvai advances and the collection of the land revenue in the last year we learn that the famine did not disappear without leaving some lessons for the guidance of the government as well as the people themselves. The fact of the indebtedness of the people reappears in a number of ways It affords great difficulties when the question of suspending or remitting the land revenue comes before the revenue officers. It has a tendency to increase demands for Takvai loans for agricultural purposes. The main principle of the revenue policy was to afford all facilities to the poor rayats. It is well and good if they be not driven to their money—lenders. The latter people are now well-to-do and have become the owners of the lands of our rayats. We have often observed in these columns that the greatest curse of our people is their extreme indebtedness and unless some measures are devised to enable them to get rid of them we do not know whether the people will show signs of a progressive community. The sin of indebtedness haunts and besets our agriculturists. Their old virtues of hospitality, simplicity & a modest living are now their vices and multiply their miseries of ignorance and illiterate lives. Indebtedness is the canker at the root of all progress and we have no hopes of prosperity for our agriculturists. Their ancestral lands are now in the hands of their money—lenders. This fact is prominently brought to light by Mr. Hare when he means to suggest that there is really no reason why outsiders who have acquired the lands of our ryots in settlement of debts greatly made up of interest at high rates should not pay their rent whether a crop was taken off the land or not, especially as the rent is supposed to be a fair average for all years good and bad. This argument may be true with respect to money—lenders but when we come to consult the welfare of the rayots it becomes the parental duty of the government to remit—and not only to suspend—the land revenue, and to see well whether the new assessments be not reduced to their old standards for some years to come. The class of agriculturists is very poor and has no other alternative but to borrow to satisfy the need of the day. There is no thought of tomorrow and the rate of interest is therefore exhorbitant. We request the local government to institute some agricultural Bank, to lighten the burden of rent and to legislate upon the rate of interest in order to afford some relief against the present claims of the money—lenders.

## THE NATIONAL MEMORIAL

To

The Editor " Berar Samachar "
Akola.

Sir,

The question of erecting a National Memorial to perpetuate the memory of Her late Majesty the Queen Empress of India is being discussed throughout the length and breadth of India. Several proposals are being made as to the exact form the memorial should take. Large and influential meetings are being held and the pros and cons of the question are discussed by the high officials and non—officials of the country. Calcutta and Bombay have already taken the lead in the matter and Madras will soon follow. The province of Berar is not backward and benighted. It has taken a lead in all social and political movements and ranks first in small provinces which had the honor of holding the sittings of the Indian National Congress. It therefor behoves the leader of the province to move in the matter and organise an influentcal public meeting of both officials and non—officials and the general public, at Amraoti at a very early day. The question as to the nature of the Memorial should be discussed and settled and subscriptions invited from the general public. My humble proposal is that the name of our illustrous Lady Sovereign should be perpetuated in Berar by erecting a 'Building for utilisting it as a Technical and Industrial school to be named as "Victoria Technical and Industrial school, Berar" in which Technical and Industrial education should be imparted. A moderate scheme should be drawn up and funds raised and provided for the maintenance of the institution and for purchasing the necessary apparatus. Poor labourers find no employment & wages owing to the disappearance of old industries and if a stimulus be given to the development of the industrial movement and numbers of Factories established in the province, the people will ever remember the name of Her Gracious Majesty and the instituion will undoubtedly be a fitting memorial of the Lady Sovereign whose reign is distinguished for the wonderful progress in social, and political matters and advancement in arts and sciences.

Ellichpur
8—2—1901

Yours truly
G. N. S.

## वऱ्हाड

हवामान—हिंवाळा संपून ऋतुमान पालटलें आहे. किंचित् उष्णतेचा भासही होऊं लागला आहे. हा चांगली निरोगी व आरोग्यकारक असून दुःखण्यांचे मानही कमी झालें आहे.

रा. रा. वासदेव काशीनाथ परांजपे क्लार्क आफ कोर्ट, स्मालकाज बडनेरा यांस इलिचपूरच्या डेपुटी कमिशनरच्या क्लार्क आफ कोर्टाची बढती मिळाली आणि त्यांच्या बडनेरच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. विनायक कृष्ण सहस्त्रबुद्धे यांस नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

मि० मीडो साहेब डेपुटी कमिशनर, वाशिम हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जात आहेत आणि त्यांच्या रजेंत क्याप्टन फ्लौडन असि० कमिशनर, बुलढाणा हे डेपुटी कमिशनरचें काम पाहतील.

मेजर ग्यारिट साहेब हे पुढील महिन्यांत रजेवरून परत आल्या नंतर उमरावतीस डेपुटी कमिशनरचे जागीं रुजूं होतील आणि उमरावतीचे क्या० हार्सबरो साहेब हे इलिचपुरास डेपुटी कमिशनरचे जागीं बदलून जाणार आहेत.

उमरावतीचे प्रसिद्ध साहुकार रा. रा. श्रीनारायण रामविलास मारवाडी यांस ३ रे वर्ग माजिस्ट्रेटीचा अधिकार देऊन त्यांनीं उमरावतीच्या इतर बेंच माजिस्ट्रेटा बरोबर काम करावें असें ठरलें आहे. कैलासवासी राव साहेब रामविलास शेट यांच्या मागें त्यांच्या चिरंजावास हा बहुमानाचा अधिकार दिला हो संतोषाची गोष्ट होय.

मि० इ० मार्शल ए० असि० कमिशनर माजि० वर्ग १ यांस समरी माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यात आले.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर ए० असि० कमिशनर यांस असिस्टंट कमिशनरचे संपूर्ण मुलकी अधिकार देण्यांत आले.

गेल्या नोवेंबर महिन्यांत या प्रांतांत ४७१३ माणसें जन्मलीं व १२७४० मरण पावलीं. मरणाचें प्रमाण फार मोठें असून असें आढळतें कीं पांच वर्षा खालील मुलें व ६० वर्षावरील वृद्ध माणसें हीं विशेष भारी प्रमाणानें मरतात. दुष्काळाच्या उपासमारीचे परिणाम या दोन्ही प्रकारच्या माणसांवर अधीक सत्वर घडतात.

मि. आरदेसर दिनसाजी चिनाय एक्स्ट्रा असि कमिशनर वर्ग ३, यांस सेन्सस सुपरिन्टेंडेंट नेमल्यामुळें गेल्या जून १६ वे तारखे पासून खालील प्रमाणें बदल्या देण्यांत आल्या आहेत:—

| रा० रा० | एक्स्ट्रा असि. कमिशनरीचा वर्ग. |
|---|---|
| गणेश बापूजी | ३ रा. |
| टी. आर. एडवर्डस | ४ था. |
| बाळकृष्ण बळवंत सुळे | ६ वा. |

## आकोला बाजारभाव

शेर ८० रुपये भार बारोळी मण

| दर खंडीस रु० | | दर खंडीस रु० | |
|---|---|---|---|
| जवारी | ४९।५७ | | |
| गहू काठे | १२० | ( बनशी ) | १७० |
| चणे | १०० | आळशी | १३९ |
| तीळ | १०९।११० | मीठ | ८० |

तुप मण १०॥ शेरी रु० १२
तेल मण १८ शेरी रु० ७॥
कपाशी ३०—३८
रुई ९८
सर्की खंडी (मण १०॥ शेरी) रु० ४८=
सोनें २४। रुपये तोळ्यास.
चांदी शंभर रुपये भार किंमत रु० ८१

वाशिम तारीख ८।२।०१

हवामान— थंडी दिवसंदिवस कमी होत चालली असून दुपारीं तर उष्मा भासूं लागला आहे. वरचेवर आकाशांत ढग येत असतात. ताप, पडशें व खोकला हे आजार कमी होत चालले आहेत. धारण थोडी उतरली असून गूरांस पाणी व चारा पुरेसा आहे.

खानेसुमारी—आमचे जिल्ह्यांत ही खानेसुमारीचें काम झपाट्यानें चालू आहे वाशिम शहराकारितां रा. रा. विनायक विष्णू गोखले वकील यांस सेन्सस सुपेरिटेन्डेंट नेमण्यांत आले असून ते आपलें काम काळजीपूर्वक बजावीत आहेत.

नवीन वकील— रा. रा. शेषराव रघुनाथ वकील यांचे नातलगा पैकीं मि. कृष्णाजी हणमंत जतकर बी. ए. एल. एल. बी. यांची वकिलीची परीक्षा पास झाली असून ते लवकरच विचापूराहून येथें येतील. मि० जतकर येथें आल्यावर येथील वकीलांची संख्या एकंदर आठ होईल.

नेमणुक— मि० एफ. डब्ल्यू. ए. मिडो साहेब बहादूर डेपुटी कमिशनर यानीं दोन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागीं बुलडाण्याचे असिस्टंट कमिशनर क्यापटन् टी. सी. फ्लौडन यांची नेमणुक झाली आहे. साहेब मवसूफ यांनीं या जिल्ह्यांत तीन महिने आफिशिएटिंग डेपुटी कमिशनरचें काम पाहिलें होतें.

रा. रा. गणेश वासुदेव नीमकर क्लार्क ऑफ दि कोर्ट यांनीं दोन २ महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागीं बुलठाण्याचे क्लार्क आफ दि कोर्ट रा. रा. नारायण राघवेंद्र यांस येथें नेमलें. मि. नीमकर आतां या जिल्ह्यांत येणार नाहींत असें खात्रीलायक समजलें आहे.

मि. गुलाबराव चीफ का० यांस वाशीमास मि. कन्हयालाल यांस रिसोडास आणि रा. सखारामपंत यांस मंगरूळास नेमलें.

तार पाठवली—चक्रवर्तिनी माहाराणी सरकारचे देहावसानाबद्दल दुःख प्रदर्शित करणेंकारितां ज्यूबली टाऊनहालांत डेपुटी कमिशनर साहेब यांचे अध्यक्षतेखालीं शहरवासी जनांची एक सभा भरली होती त्यांत सर्व जातीचे लोक शरीक होते. सर्वानुमतें एक दुःखवठ्याची तार व्हाइसराय साहेबांचे सेवेशी पाठविली गेली.

## वर्तमानसार

युनिव्हर्सिटींत देशीभाषांचा प्रवेश.:— आह्मास कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं तारिख ३ रोजीं भरलेल्या सीनिटमध्यें मराठी, गुजराथी व कानडी ह्या भाषा एम. एच्या परिक्षेस ठेवाव्या असें बहुमतानें ठरलें आहे. व्हाईसराय चॅन्सलर मि. कँडी यांनीं हें प्रकरण लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न केला होता पण बहुमत पडल्यामुळें अखेर ह्या भाषाचा युनिव्हर्सिटींत प्रवेश झाला. विशेष समाधानाची गोष्ट ही कीं शाळा खात्याचे डायरेक्टर मे. जाईल्स साहेब यांचें या सुचनेस अनुकूल मत पडलें. आणि या मुळें बहुमतास ही त्याचा बराच उपयोग झाला. या सर्व गोष्टीचें श्रय कै. न्या. रानडे यांजकडे आहे. एम एच्या परिक्षेंत कोणतीं मराठीं पुस्तकें ठेवावयाची यांजबद्दल कै. न्या. रानडे यांचा रिपोर्ट आहे. यापुढें बरीच मंडळी देशी भाषेंत एम. ए. होतील अशी आशा आहे.

पाखरांनीं गांव सोडलें.—वर्धा येथील सर्व पाखरांनीं तें गांव सोडून दिलें कारण काय असेल तें देवाला ठाऊक !

गाणारें झाड—न्यूबिया देशांत एक झाड आहे त्यांतून एकसारखा मंजुळ स्वर निघत असतो. या झाडाला तिकडचे लोक सोफर ह्मणतात.

घड्याळाचें झाड.—ग्लासगो येथें एका बागेतील झाडें अशा बेतानें लाविलीं आहेत. कीं ह्या झाडांच्या सावलीवरून किती वाजले हें नेमकें सांगतां येतें. तासांच्या अनुक्रमाप्रमाणेंच झाडांचीही नांवें ठेविलीं आहेत.

श्री० महाराणीसाहेबांच्या स्मारकार्थ सोलापूर येथील सुप्रसिद्ध व्यापारी रा. सा. वारद यांनीं १००० रुपये देण्यासंबंधीं आपली इच्छा प्रदर्शित केली असें समजतें. तें स्मारक सोलापूर मुक्कामीं करण्याचें तेथील लोकप्रिय कलेक्टर मि. मेकानकी याचें मत विशेष आहे असें ह्मणतात. ज्ञा.

चीनचें दुर्दैव – हो नाहीं ह्मणतां ह्मणतां चीन देशाशीं तह झाला. आणि त्या तहानें संयुक्तराष्ट्रांचे सध्यां तरी कांहीं अंशीं समाधान झालें आहे ह्मणण्यास मार्ग नाहीं तरी हें समाधान व तो तह ह्या दुर्दैवी देशास यापुढें किती नाचेल याची आजच कल्पना करणें योग्य नाहीं तथापि असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, प्रस्तुतच्या स्थित्यंतरानें चीन देशाचा दरारा, स्वातंत्र्य व वैभव हीं मात्र डळमळींत पायावर उभीं आहेत!

केकत आणि तिचा उपयोग– मिस्तर सूटर नांवाचे स्वीडनदेशीय गृहस्थ आहेत, त्यांनीं मुंबई शहरा नजीक आपले कारखान्यास सोईची अशी वीस हजार एकर जमीन सरकारांतून खंडानें घेतली आहे व त्या सर्व जमिनींत केकतीची लागवड करून तिच्या पासून यांत्रिक सामुग्रीनें तंतु काढून त्याचा व्यापार करण्याचा कारखाना घातला आहे. सदरी कारखाना अद्यापि अगदीं बाल्यावस्थेंत आहे तरी आज मित्तीस त्याजवर हजारो लोकांचा निर्वाह होत आहे. हजारो कोसावरून येऊन इतकें मांडवल घातलें असेल तें फायद्याची खात्री असल्याशिवाय घातलें असेल काय ? सोलापुरांतून सदरी कंपनीनें आगगाडीचे डब्यांचे डबे भरून केकतीचे गड्डे नेले आहेत. व त्यांची तेथें लागवड करण्याची योजना केली आहे. क० त०

सूर्यकमळें यांचें पीक केलें असतां फार फायदेशीर आहे. त्यांच्या बियांत शेकडा ५० प्रमाणानें तेल सांपडतें व पेंड गुरांच्या उपयोगी पडते. सूर्यकमळाचें उत्पन्न दर एकरीं सुमारें दोन अडीच खंडीहूनही जास्त होतें.

गुजराथची जमीन फार सुपीक असल्यामुळें ते लोक आपल्यास खाण्यास लागणारें धान्य अगदीं थोडे पिकवितात आणि कापूस, गहू, तेलाचीं धान्यें, वगैरे परदेशीं जाणाऱ्या जिनसा फार पिकवितात, अशीं त्यांची स्थिती असल्यामुळें १८९९ च्या पूर्वीं ५–४ वर्षें जमिनीचें पीक थोडें थोडें कमी येऊन १८९९ चे खरपड पक्कें बसतांच ते लोक अगदी जेरीस आले.

काश्मीरच्या हद्दींत कडे कोसळून व बर्फ पडून रस्ते बंद झाल्यामुळें डाकेस खोटी झाली आहे. अ.

गेल्या पांच वर्षांत भुईमुग बाहेर किती खंडी गेला त्याचे आंकडे पुढील प्रमाणें आहेतः—

| | मुंबई इलाख्यांतून | मद्रास इलाख्यांतून | इतर प्रांतांतून | एकंदर |
|---|---|---|---|---|
| १८९५।९६ | ७९६९६८ | ३२२१४४ | १६७ | १११९२७९ |
| १८९६।९७ | २८८८०२ | २४७१८५ | २९८ | ५३६२८५ |
| १८९७।९८ | १९९९०६ | २४५७५९ | १९४ | ४४५८५९ |
| १८९८।९९ | ७६७२८ | १०२३९६ | ७३७ | १७९८६१ |
| १८९९।१९०० | २३३०४ | १३१८४० | १९५ | १५५३३९ |
| १९००।०१ (बे ९ महिने) | २४७८ | ८१०९३ | ११० | ८३६८१ |

या वरून हें भुइमुगाचें पीक अलिकडे बरेंच कमी होऊं लागलें आहे असें होतें, व तें वाईट आहे. ठा० अ०

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।॥- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारांनी ट. ह. सह ०।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

NOTICE.

Under rule 12 of the municipal Election Rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies created by the retirement of the members in the Akoa Municipal Committee, under operation of rule 31 of the Municipal Rules, will take place from 7 A. M. to 5 P. M. on the 21st. 22nd and 28th February 1901. The following table gives for each ward the names of the outgoing members, the date and place of election, the name of the Polling Officer, and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to the pollieg Officer.

Dated Akola 4th February 1901

K. G. Damle.
Secretary
M. Committee
Akola.

| Ward. | Names of outgoing members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Ganoba Raghoba<br>" Narayan Kashinath Date | 23th February 1901 | Patel's chowri | V. N. Dandekar Esquire Extra Assistant Commissioner | 21st February 1901 | |
| II | " Jaikrishna Bagajee<br>" RamchandraM. Gupte<br>" Hakimoddin | 21st February 1901 | Grain Market office | | 14th Feburary 1901 | |
| III | " Dattatraya Krishna Kolatker | 22nd February 1901 | Town Hall | | 15th Feburay 1901 | |

Dated Akola 4th February 1901

K. G. Damle
Secretary M. C. Akola.

## जाहिरात

म्युनिसिपाल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येतें कीं आकोले म्युनिसिपाल कमेटींतील ज्या मेंबराच्या जागा सदहू नियमांपैकीं नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्या करिता तारीख २१-२२-२८ फेब्रवारी सन १९०१ इसवी रोजीं सकाळचें ७ वाजे पासून सायंकाळचे ५ वाजेपर्यंत निवडणूक होणार आहे. दिलेल्या तक्त्यांत वार्डांपैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख जागा, पोलिंग आफिसरचे नांव, उमेदवारांनीं कोणत्या कोणत्या तारखेपर्यंत पोलिंग आफिसरकडेस म्युनिसिपल नियम १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावेत वगैरे माहिती दिली आहे. कळावें. तारीख ४।२।१९०१ इसवी.

K. G. Damle.
सेक्रेटरी
म्युनिसिपल कमेटी.
आकोला.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवें कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि. गणोबा राघोबा.<br>मि. नारायण काशीनाथ दाते. | २८-२-१९०१ | पाटील चावडी. | रा. विश्वनाथ नारायण दांडेकर. | २१—२—१९०१ चे आंत. |
| २ | मि. जैकृष्ण बगाजी.<br>मि. रामचंद्र [illegible] गुप्ते.<br>मि. मौ. हकीमुद्दीन. | २१-२-१९०१ | ग्रेन मार्केट ऑफिस | | १४—२—१९०१ |
| ३ | मि. दत्तात्रय कृष्ण कोलटकर. | २२-२-१९०१ | टाऊनहाल | | १५-२-१९०१ |

आकोले तारीख ४-२-१९०१

K. G. Damle
सेक्रेटरी म्यु० कमटी अकोला.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N.

सहामाही ,, २ ,, ८
साल अखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास ...........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस.......... ८१ ०१
दुसरे खेपेस .... .... ....८१

... 7 ... 1 Rs 8 as
ingle copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 11 FEBRUARY 1901 NO 6

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९०१ इ० अंक ६

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढता येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं

मुंबई ब्यांक
आकोला १६ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ८ शके १८२२

## रामायण.

संस्कृत रामायणाचा ग्रंथ केवढा आहे याची कल्पना देखील पुष्कळांस नसेल तेव्हां हा मूळचा ग्रंथ वाचणारे लोक थोडेच आढळतील. अलीकडे विद्वान् पुष्कळच झाले आहेत पण त्यांच्या दृढ व्यासंगामुळें विद्यार्थीदशा संपतांच ते विद्येला कंटाळतात आणि पुढें त्यांच्या प्रदीप्त व उज्वल ज्ञानाचा प्रकाश मंदमंद होतो आणि अखेरीस नामधारी विद्वान् मंडळींच्या पंक्तीला आमच्यांपैकी पुष्कळशी शिकलेली मंडळी येऊन बसतात. अशा स्थितींतल्या विद्वानांचा परिचय एका परम पूज्य व खऱ्या विद्वानांच्या प्रयत्नाशीं व व्यासंगाशीं करून देण्याचा आमचा विचार आहे. रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं रामायणासंबंधानें जो निबंध लिहिला आहे तो वाचतां वाचतां आह्मांस फारच आनंद वाटला हें सांगणें अगदीं साध्या लौकिक रीतीचें वाटेल परंतु या निबंधाचें अध्ययन एखाद्या क्रमिक पुस्तका प्रमाणें किंवा परीक्षेला नेमलेल्या विषया प्रमाणें करूं लागावें ह्मणजे या निबंधाची खरी योग्यता कळण्या सारखी आहे. रामायणा सारख्या ग्रंथाकडे सांप्रतची विचारदृष्टि कशी लावावी इतकेंच या निबंधा पासून शिकण्या सारखें नाहीं, तर वाचनाची दिशा कशी असावी, तात्पर्य कसें संग्रहित करावें, सारभूत गोष्टी कोणत्या व कशा संविधानकाला जुळवून घ्याव्या, आणि इतिहासाची तत्वज्ञता ग्रंथांतल्या नानाविध विषयांकडे कशी लागूं करावी इत्यादि अनेक गोष्टी या निबंधा पासून शिकण्या सारख्या आहेत. हा निबंध वाचतांना वाचकानेंही निबंधकाराच्या परिश्रमाची अटकळ करण्यास विसरूं नये ह्मणजे रामायणाच्या समुद्रांतलीं मोत्यें वर काढून ह्यांचा बनविलेला रत्नहार किती रमणीय व आल्हादकारक आहे हें सहृदय वाचकच सांगू शकतील.

रामायणाच्या कथेचा उपोद्घात प्रारंभीं सांगितल्या नंतर या मोठ्या कथेचा निष्कर्ष निबंधकारानें असा दिला आहे.:—

### कथेचा निष्कर्ष.

आधुनिक दृष्टीनें ह्या कथेचें निरीक्षण केलें व रामायणांतील इतर भागाशीं हिला जुळवून पाहिलें तर ह्या कथेचा निष्कर्ष असा निघतो.

वाल्मिकि कवि रामाचा परम स्नेही होता (७,४७,१६-१७) लक्ष्मण त्यांना दशरथा प्रमाणें लेखी. यांच्या आश्रमाजवळ चित्रकूट पर्वतावर राम, लक्ष्मण आणि सीता यांसह चार महिने राहिला होता. राज्यप्राप्ति झाल्या नंतर लोकापवादास भिऊन रामानें सीतेचा त्याग केला त्या वेळीं लक्ष्मणास तिला वाल्मीकीच्या आश्रमाजवळ नेऊन सोड अशी त्यानें आज्ञा केली. निर्जन वनांत टाक असें ह्मटलें नाहीं. लक्ष्मणानें सीतेला तेथें नेलें तेव्हां हा वाल्मीकीचा आश्रम जवळ आहे, यांच्या पादच्छायेखालीं तूं स्वस्थ ऐस, तूं पतिव्रता आहेस तुझें श्रेय होईल, असें ह्मटलें आहे. या आश्रमांतच सीता प्रसूत होऊन तिला दोन अपत्यें झालीं. त्या रात्रीं शत्रुघ्न मधुपुरावर जाऊन लवणाचा वध करण्या करितां चाललों असतां या आश्रमांतच होता. (७,६५।६६) लवणाला मारून मधुपुराची पुन्हा आबादानी करून शत्रुघ्न बारा वर्षांनीं परत अयोध्येस रामपाददर्शनार्थ जात असतां पुनः वाल्मीकीच्या आश्रमांत उतरला होता. तेथें त्यानें व त्याच्या सैन्यानें कुशलवांस रामचरित्र गातांना ऐकिलें व सर्व तटस्थ झाले.

सीता बारा वर्षें वाल्मीकी जवळ राहिली होती तेव्हां रामचरित्राचे बरेच भाग तिच्या कडून वाल्मीकीला कळले असले पाहिजेत. तशांत वाल्मीकि तत्कालीन ऋषी प्रमाणें बरींच तीर्थें हिंडला असला पाहिजे, व ऋषि मंडळांत बसून त्यानें अपरान्हीं कथाही ऐकिल्या असल्या पाहिजेत. या योगानें त्यांची मूळची स्वयंप्रतिभा उद्दीपित झाली असेल व तशांत सीते सारखी पतिव्रता नित्य डोळ्या समोर वागतांना पाहून करुणेनें तीव्र झाली असेल हें सांगावयाला नको. वाल्मीकीला सर्व सृष्टी करतलामलकवत् दिसत असे. त्याचीं वर्णनें फारच साधीं व मनोहर आहेत. आंत राम चरित्रा सारखें वीरकरुणरसांनीं परिपूर्ण चारित्र मिळालें तेव्हां हें सर्व काव्य पुढील कवींना आधार झालें, व तें सरस्वतीच्या मुखातून ऐकून ब्रह्मदेवानेंही मान डोकविली. (७,२११,११) हें युक्तच आहे.

### काव्यांत अतिशयोक्ति व असंभावना,

आधुनिक टीकेच्या कसोटीस हें काव्य लाविलें तर त्यांत पदोपदीं अतिशयोक्ति व असंभावना हे दोष दिसतील. पण कोणीही कवि असो व त्याची प्रतिभा कितीही उज्ज्वल असो तरी समकालीन लोकांच्या समजुतींच्या पलीकडे त्याला फारसें जातां येत नाहीं. हें तत्व जर आपण लक्षांत ठेविलें तर, एकुणीसाव्या शतकांतील रसायन शास्त्र, विद्युच्छास्त्र इत्यादि शास्त्रांच्या अध्ययनानें ज्यांची सत्यान्वेषणबुद्धि तीव्र झाली आहे ज्यांचा सत्यान्वेषणाचा पंथ असिधारे प्रमाणें कठीण झाला आहे, त्यांनीं हें चरित्र शास्त्राच्या कसोटीस उतरत नाहीं, असें ह्मटलें तरी आपण फारशी पर्वा करूं नये. शास्त्र ह्मणून या चरित्राचें अध्ययन करूं नये. तसें केलें असतां आपण घोटाळ्यांत पडूं.

### रामायण काव्य

चरित्र काव्य आहे असें धरून चालूं या. वाल्मीकि रामाचा परम सखा होता ह्मणून रामाचे गुण वर्णितांना, त्याच्या राज्याची स्थिति सांगतांना, त्यानें स्तुतीची झांक अधिक टाकली असेल, तसेच रावणादिकांच वर्णन करितांना कृष्णवर्ण जास्त टाकला असेल व शत्रूच्या वैभवाची महती जास्त केल्यानें त्याला ज्यानें धुळीस मिळविलें त्याचा पराक्रम आपोआप वर्णिला जातो या न्यायानें रावणादिकांच्या ऐश्वर्याची थोरवीही वाढविली असेल हें घेऊन चाललों तरी हरकत नाहीं.

तर मग त्या काव्यापासून आपणांस कांहींच लाभ मिळणार नाहीं अशी जर आपण कल्पना कराल तर ती चुकीची होईल. कोर्टामध्यें एखाद्या पक्षाकडील साक्षीदार लांब रहात असला ह्मणजे कोर्ट त्याची साक्ष त्या ठिकाणीं कमिशन बसवून घेते, व त्या जबानीवरून अनुमान काढतें, त्या प्रमाणें यथें आचरण केलें पाहिजे. अनुकूल भाग साशंक दृष्टीनें पाहिला पाहिजे; प्रतिकूल भाग जमेस धरिला पाहिजे; जो भाग कथेच्या ओघानें सहजगत्या सांगितला असेल, व ज्यांत रागद्वेषादिकाला स्थान असण्याचा संभव कमी असेल अथवा मुळींच नसेल, तोही भाग जमेस धरितां येईल. तसेंच दृष्टांतद्वारा बरीच माहिती मिळण्याची आशा करावी.

अनुकूल भाग साशंकदृष्टीनें पाहावा, असें वर ह्मटलें आहे त्याची फोड करणें जरूर आहे. ह्या ह्मणण्याचा अर्थ असा नाहीं कीं, हा सर्व भाग त्याज्य आहे. त्यांतील ग्राह्यांश घेतला पाहिजे. तसेंच त्यावरून उत्तम पुरुषाविषयीं, साध्वी स्त्री विषयीं, किंवा उत्तम राज्यव्यवस्थेविषयीं वगैरे त्या वेळच्या विचारी लोकाग्रणींच्या कल्पना ( ideas ) कशा होत्या हें सहज समजतें. वस्तुस्थिति कल्पनेशीं सर्वांशीं जुळत नाहीं, तरी ती कल्पनेच्या मागोमाग धावत असते. आणि कल्पना जर उत्तम असेल तर वस्तुस्थिती कधीं कालीं तरी तिच्या जवळ जवळ येईल अशी आशा असते. मि. मोर्ले यांनीं आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे:—

The decisive sign of the elevation of a nation's life is to be sought among those who lead or ought to lead. The test of the health of a people is to be found in the ucterence of those who are its spokesmen, and in the actions of those whom it accepts or chooses to be its chiefs. We have to look to the magnitude of the issues and the height of the interests which engage its foremost spirits. What are the best men in the country striving for? And is the struggle pursued intrepidly, and with a sense of its size and amplitude or with creeping foot and blinking eye? The answer to these questions, is the answer to the other question, whether the best men in the country are small or great.

कवि हे लोकाग्रणींत श्रेष्ठ असतात; व त्यांच्या कल्पना शतकानुशतकें लोकांस मार्ग दाखवीत असतात. वाल्मीकीच्या कल्पना आज अडीच तीन हजार वर्षांवर या आर्य भूमींतील स्त्रीपुरुषांना, राजारंकांना, मार्ग दाखवीत आहेत. समाजाचे व्यवस्थित रूप जें हल्लीं दिसत आहे व पर कल्पनांना व विचारांना टक्कर देण्याचा जो त्यांत जोम आहे तें स्वरूप व तो जोम वाल्मीकी सारख्यांच्या कल्पनांचा परिणाम होत. त्या कल्पना कायमच्या ठशांनीं छापल्यामुळे त्यांना कमी जास्त प्रमाणानें रूढीचें स्वरूप आलें, तींत फारसा फरक होत नाहीं. रामायण काव्य तसेंच महाभारत, हे दोन ग्रंथ, किंवा त्यांचा आधार धरून रचलेलीं आधुनिक प्राकृतांत रचलेलीं नाटकें व काव्यें जोंपर्यंत आबालवृद्धांच्या वाचण्यांत अगर ऐ-

कण्यांत अगर पहाण्यांत येत आहेत तों पर्यंत रूढीचा प्रभाव कायम राहिला पाहिजे अशी या दोन ग्रंथाची महती आहे. ह्मणून त्यातील कल्पना वस्तुस्थितीस जुळत नसल्या तरी त्या जर उदात्त असतील, व रूढी यांच्यांशीं विसंगत असेल, तर हल्लींच्या लोकनायकांनीं या पुरातन कल्पना लोकांच्या सेवेस पात्र होतील असे प्रयत्न केले पाहिजेत, अशा कल्पना या काव्यांत आहेत. असो.

या काव्याचें अध्ययन केल्यानें कोणती माहिती मिळते हें सांगण्या पूर्वीं या काव्याच्या स्वरूपांत थोडा फार फरक झाला आहे त्याबद्दल सांगितलें पाहिजे.

मूळचें रामायण फार लहान होतें व तें कथांनीं वगैरे पुढें वाढविलें असा तर्क पाश्चात्य विद्वानांनीं केला आहे हा खरा असला तरी मूळचें रूप शोधून काढणें दुरापास्त झालें आहे. हल्लींचें रामायणाचें जें स्वरूप आहे तें मनूच्या नंतर आणि बुद्धाच्या कालाच्या पूर्वीं त्यास प्राप्त झालें आहे इतकें निश्चयानें सांगतां येतें. तेव्हां उपलब्ध असलेल्या रामायणावरून अगदीं प्रथम रामायण झालें त्या काळची माहिती अगर त्या काळच्या समजुती कळल्या नाहींत तरी वर सांगितलेल्या ह्या दोन गोष्टी मधल्या काळाच्या संबंधानें आपणाला बरीच माहिती मिळेल. हल्लीं उपलब्ध असलेल्या प्रतीस सुधारून वाढविलेली प्रत असें ह्मटलें तरी चालेल.

## प्रक्षिप्त

पण रामायणाची या काळांत ही वाढविलेली आवृत्ति कायम राहिली नाहीं. मधून मधून प्रक्षिप्त सर्ग कोणी तरी घुसडून दिले आहेत. प्रक्षिप्त श्लोक किती असतील तें सांगणें कठीण आहे. वाढविलेल्या आवृत्तींत सर्ग ६०० होते, असें ह्मटलें आहे, पण हल्लींच्या मुंबईंत छापलेल्या आवृत्तींत ६४९ आहेत. कित्येकांच्या मतें उत्तर कांडांतील सर्ग यांत जमेस धरूं नयेत असें आहे. त्यांतील १११ सर्ग कमी केले, तरी बाकी ६०० वर राहतात. कतक ह्मणून एक रामायणावर टीकाकार होऊन गेला, त्यानें या विषयीं बराच विचार केला आहे, असें रामीय टीकेंत ह्मटलें आहे तो व तीर्थ यांच्या टीका मीं पाहिल्या नाहींत. प्रकृत मुंबईच्या आवृत्तींत दहा वीस तरी सर्ग टीकाकाराच्या पाहण्यांत आलेले नाहींत असे "प्रक्षिप्त" ह्मणून छापलेले आहेत. असे प्रक्षिप्त सर्ग कसे येतात, या विषयीं थोडा विचार केला पाहिजे.

कोठें मुख्य कथेंत कांहीं भाग अविस्तृत आहे, किंवा कांहीं गोष्ट घडली असें अनुमान निघत असून ती घडल्या बद्दल वर्णन नाहीं. तर तो भाग वाल्मीकीचा वेष घेतलेल्यानीं वाढविला आहे, किंवा नवीन जोडून घातला आहे. उदाहरणार्थ काकधर्षणाचा सर्ग किंवा इंद्रानें सीतेला धाडलेल्या अन्नपात्रा संबंधानें असलेला सर्ग....तसेंच एखाद्या वीराची उत्पत्ति कथा दिली नाहीं व ग्रंथ त्यामुळें पुढील कवीस अपुरा वाटला तर तो भाग त्यानें नवीन घातला आहे.

किती एक प्रसंगीं एखाद्या अधुनीक कवीस एखाद्या सर्गांतील श्लोकांचा अर्थ निराळ्या वृत्तांत लिहावा असें वाटून त्यानें ते तसे श्लोक रचून पोथीच्या पृष्ठाखालीं लिहिले असावे कालान्तरानें या पोथीची प्रत करणाऱ्या लेखकाच्या अज्ञानानें मूळचें अनुष्टुभ श्लोक व तदभिन्नार्थ इतर वृत्तांतले श्लोक विचित्र-माळा भरणा प्रमाणे नवीन प्रतींत एकाच पृष्ठांत सारखे गोविले असावे पहा क्वचित् रूढीए विघातक गोष्टींत प्रचलित रूप दिलें असावें असें वाटतें.

पण हे माझे तर्क मी भीत भीत आपणापुढें ठेवीत आहे. या प्रक्षिप्तांचा विचार करितांना निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित असलेल्या निरनिराळ्या काळीं लिहिलेल्या रामायणाच्या पोथ्या ताडून पहावयास पाहिजेत. तसेंच रामायणांतील उतारे ह्मणून इतर कवींनीं आपल्या ग्रंथात घेतले आहेत ते उपलब्ध रामायणाच्या प्रतींत आहेत कीं काय या बद्दल शोध केला पाहिजे. मग अंतरंग पुराव्या वरून कोणते श्लोक प्रक्षिप्त असावे या बद्दल तर्क केला पाहिजे. इतके सर्व करण्याला मजजवळ सामग्री नाहीं, व पुरेसा वेळही नाहीं; तसेंच असलें काम करण्याचा अभ्यास पाहिजे तोहि मला नाहीं.

तरी जो प्रक्षिप्त भाग ठरलेला आहे, त्याची व वाढविलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या रामायणांतील मूळाची जवळ जवळ ठेवून पहाणी केली, तर भाषेंत व वृत्तांत जरी थोडा बहुत प्रकार दिसून येतो, व संदर्भ जुळवावयाला पंचाईत पडते तरी विचारांत फारसा फरक दृष्टीस पडत नाहीं. हा मी रूढीचा प्रभाव समजतों. जुनी रूढी नवीन कवीच्या अंगांत इतकी खिळली होती कीं, त्याचे विचार पूर्वींच्या कवीच्या विचाराहून फारसे भिन्न दिसून येत नाहींत.

---

देवी काढविण्याचा उपयोग सर्वत्रांस चांगला माहित आहे आणि त्यामुळें देवी काढण्याच्या कामाला कोणी मोठीशी हरकत करीत नाहीं. आपापल्या मुलाबाळास योग्य वेळीं देवी काढविण्या विषयीं लोकच काळजी घेत असतात आणि गोस्तनदेवीतला देवी अगदीं प्रचारांतल्या झाल्या आहेत. सध्यां अडचण देवी काढविण्या संबंधाची नाहीं पण देवी पुनः पुनः काढविण्या विषयीं लोक हरकती आणितात. देवी दुबार काढण्या संबंधानें सानिटरी कमिशनर साहेबांचा आग्रह विशेष दिसतो. अलिकडे डाक्टर लोकांचा अभिप्राय असा आहे कीं एक वेळ देवी काढविल्या नंतर पुनः देवी काढवल्यात ह्मणजे देवीच्या रोगाची भिती राहत नाहीं. दोनदां देवी टोचविण्या विषयीं लोकाची प्रवृत्ति प्रतिकूळ आहे, पहिल्या देवी संबंधानें लोक काळजी घेतात पण पुनः देवी काढवूं नयेत असा लोकांचा ग्रह आहे. मनाच्या या प्रवृत्ती मुळें देवी काढण्याची पुनरावृत्ती करितांना लोक मागे सरतात आणि सानिटरी कमिशनरांचा हेतु सिद्धीस जात नाहीं. अलिकडे सरकारी विचार पुनः देवी काढण्या विषयीं सक्ती करण्याचा दिसतो. सक्ती कायद्यानें करितां येत नाहीं ही गोष्ट खरी तथापि सक्तीची अंमलबारी होण्याचा मोठाच संभव आहे: पुन्हां देवी काढण्याला लोकांची अनुकूलता नाहीं इतकेंच नाहीं तर या बाबदींत डाक्टर लोकांचा अभिप्राय तरी एकच पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. वास्तविक प्रकार आमच्या विधानाच्या उलट असेल तर आमचे सानिटरी कामिशनर देवी पुनः काढविण्याचे फायदे लोकांस एखाद्या सरक्युलरानें कळवितील तर देवी पुन्हां काढण्याला लोकच आपोआप सिद्ध होतील. देवी दोयदां काढविण्याची गोष्ट लोकांच्या मर्जी वर ठेवावी असें आमचें मत आहे आणि तदनुरूपच या बाबदींत हुकूम सुटतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

## बादशहाचा निरोप

आमचे सार्वभौम बादशहा एडवर्ड यांनीं इंडियाच्या राजेरजवाड्यांस व प्रजाजनांस वुंडसर येथून गेल्या सोमवारीं एक पत्र लिहिलें आहे. हें पत्र फार कळवळ्याचें असून इंडियन लोकांविषयीं प्रजावात्सल्य यांत अगदीं स्पष्टपणें दिसून येत आहे. या पत्राचा मतलब सर्वांस कळावा ह्मणून तें आह्मी मराठींत खालीं देतों. :—

"आमच्या परमपूज्य मातोश्री निवर्तल्या व प्रजासमूह शोकाकुल होऊन गेला! त्यांच्या या निधनामुळें सिंहासनाचा अधिकार वारशाच्या नात्यानें मजकडे आला हा वारसा वंशपरंपरेनें फार लांबवर पासून चालत आला असून मजपर्यंतचा त्याचा इतिहास फार जुना आहे. माझ्या इंडियाच्या राज्यांतील नेटिव संस्थानांच्या राजरजवाड्यांचें व प्रजाजनाचें मी अभिनंदन मनापासून करितों आणि त्यांच्या कल्याणाविषयीं मला अंतःकरणापासून काळजी आहे असें मी त्यांस अश्वासन देतों. मी ज्यांच्या गादीवर बसलों आहे त्या पुण्यश्लोक व चिरशोचनीय मातोश्री या राष्ट्राच्या पहिल्या चक्रवर्तिनी होत्या. त्यांनींच इंडियाचा राज्यकारभार आपल्या स्वतांच्या हातीं घेतला आणि या अफाट राज्याज्या कारभारांशी आपला संबंध निकटचा लडला हें दर्शविण्यासाठीं त्यांनीं बादशाहिणी हा किताब धारण केला.

इंडियाच्या संबंधानें सर्व बाबदींत चक्रवर्तिनी महाराणी सरकार स्वतां लक्ष्य पुरवीत व हा त्यांचा क्रम सततचा होता. आणि त्यांच्या गादी विषयीं व त्यांच्या स्वतां विषयीं कोच्यावधी इंडियन लोकांमध्यें जी राजनिष्ठा व राजभक्ती होती ती मला पूर्णपणें माहित आहे.

त्यांच्या त्या चिरकालीन व पुण्यप्रतापी कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षीं ही राजभक्ती फारच व्यक्त व स्पष्ट दिसून आली. दक्षिण आफ्रिकेंतील लढाईंत संस्थानिकांनीं जी अप्रतिम राजसेवा केली आणि नेटीव लष्करानें आपल्या देशाहून बाह्य देशीं जो मर्दुमकीचा रणशूरपणा गाजविला त्या दोन्ही गोष्टींनीं खरी राजभक्ती निदर्शनास आली.

त्याच्याच इच्छेवरून व आज्ञे वरून मी इंडियांत आलो होतों. आणि या जुन्या व विख्यात राष्ट्रांतील संस्थानिक, लोकसमूह व नगरी यांची ओळख मी स्वतां करून घेतली.

त्या वेळीं माझ्या मनाचे जे उत्कृष्ट ग्रह झाले आहेत ते मी कधीं विसरणार नाहीं. आणि पहिल्या चक्रवर्ती बादशाहिणीचा मोठा कित्ता मी पुढें ठेवीन आणि सर्व दर्ज्यांच्या माझ्या इंडियन प्रजेच्या कल्याणा विषयींचे प्रयत्न मी सतत करीन आणि प्रजेचे निरंतर राजनिष्ठा व राजभक्ती यांच्या च प्रमाणें संपादन करण्या साठीं मीहि परिश्रम घेईन."

असा हा कळकळीचा निरोप ऐकून सर्व लोकांस मोठा आनंद होईल. ईश्वर करो आणि आमचा बादशहा चिरायु, सुप्रतिष्ठ व कीर्तीमान होवो.

---

## स्मारक.

चक्रवर्तिनी व्हिक्टोरिआ यांचें स्मारक कोण करणार नाहीं! यांच्या सारखें अजादार्नीचें राज्य इतिहासान्तरीं दुसरें आढळणार नाहीं. विद्या, कला, व शास्त्रें यांचें रत्नभांडार यांच्या कारकिर्दींत खुलें झालें आणि सरस्वती व श्री यांच्या राज्यांत एकत्र नांदूं लागल्या इतकेंच नाहीं तर इतिहासांतली अपूर्व गोष्ट ह्मणजे या दोहोंचा संगम होऊन या परस्पराला परिपोषक व गुणशाली झाल्या. पुरुष व स्त्री यांच्या हक्कांची समता या राज्यांत दृष्टोत्पत्तीस आली. अशा या अद्भूत कारकीर्दीचें स्मारक ह्मणजे भावी कल्याणराशी होत. पुढील सुखवैभवाचे अनुभोक्ते आपल्या संपदाची कारणमाला याच्या कारकिर्दींशी आणून पोंचवितील तेव्हां पदापदीं व्हिक्टोरिआ हें पवित्र नाम आठवत जाईल आणि आमच्या दृष्टीनें ही भावी सुखसृष्टी खरोखर पहिलें स्मारक होय. या विचारा प्रमाणें थोर महात्मे आपल्या अजरामर कीर्तीनें सदा जीवंत आहेतच.

सिंहावलोकनानें भविष्यदृष्टी प्राप्त होते. ज्याला मागला इतिहास चांगला कळतो तोच भविष्यकाला विषयीं कांहीं योग्य अनमानें बांधू शकतो. ज्याला भूतकालाची सांखळी वर्तमानकालच्या दुव्यांनीं भविष्यकाळापर्यंत लांबविता येते तोच खरा मार्मिक मनुष्य होय. असे मार्मिक लोकच आपल्या पूर्वजांची थोरवी राखतात व आपल्या वर्तमान गुणांनीं वंशजांला वंद्य व पूज्य होतात. जे पूर्वजांचें स्मारक करितात त्यांचेंच स्मारक पुढील पिढ्या करितात. स्मारकाची कल्पना गुणग्राहकतेला धरून आहे आणि तिच्या मध्यें भूत व भविष्य यांची एक सांगड पडते. स्मारकानें दोन गोष्टी लाभतात. ज्याचें स्मारक आपण उभारतों त्याचा चांगुलपणा पुढील पिढ्यांस कळवितांना आपण तो बहुगुणित करितों आणि स्मारक करणाऱ्याचीही आठवण पर्दर्शित आपोआपच पुढील पिढ्यांस राहते.

महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकाची गोष्ट निघाल्या बरोबर इंडियाभर हा एकच मुख्य विषय होऊन बसला आहे. स्मारकाची गोष्ट लार्ड कर्झन साहेबांनीं मनावर घेतली आहे व त्या मुळें वर्गण्यांचे आंकडे लक्षावधी रुपयाचे पडत आहत हें अगदीं साहजिक आहे. कलकत्यास एक अप्रतिम अज-

बसाना उभारण्याचा संकल्प ठरला आहे स्मारक करावें किंवा नाहीं हा प्रश्न राहिला नाहीं. फक्त स्मारक कोणतें करावें या विषयीं वाटाघाट चालू आहे. प्रांतोप्रांत निरनिराळीं स्मारकें करण्याला कोणाची हरकत नाहीं तथापि एक मोठें स्मारक कलकत्यास करावें असा लार्ड कर्झन साहेबांचा विचार आहे. आमच्या मतें स्मारक असें असावें कीं ज्याच्या योगानें औद्योगिक शिक्षणाची कांहीं तरी निराळी सोय होईल. आणि असेंच स्मारक प्रस्तुक कालाला अयंत अवश्यक आहे.

# The Berar Samschar

**MONDAY FEBRUARY 11 1901**

The Revenue administration of Berar for 1899—1900 seems to be more satisfactory than was expecced in the actual brunt of the famine. The report of that year is just out and it is but natural that it should be a sad tale of the effects of the last year's famine. The report is a brief one and asks us to await the publication of the famine—report for a fuller information on a number of important and instructive topics in connection with the condition of the people. From the succinct account of the Takvai advances and the collection of the land revenue in the last year we learn that the famine did not disappear without leaving some lessons for the guidance of the government as well as the people themselves. The fact of the indebtedness of the people reappears in a number of ways It affords great difficulties when the question of suspending or remitting the land revenue comes before the revenue officers. It has a tendency to increase demands for Takvai loans for agricultural purposes. The main principle of the revenue policy was to afford all facilities to the poor rayats. It is well and good if they be not driven to their mony—lenders. The latter people are now well-to-do and have become the owners of the lands of our rayats. We have often observed in these columns that the greatest curse of our people is their extreme indebtedness and unless some measures are devised to enable them to get rid of them we do not know whether the people will show signs of a progressive community. The sin of indebtedness haunts and besets our agriculturists. Their old virtues of hospitality, simplicity & a modest living are now their vices and multiply their miseries of ignorance and illiterate lives. Indebtedness is the canker at the root of all progress and we have no hopes of prosperity for our agriculturists. Their ancestral lands are [illegible] the hands of their money—lenders. This fact is prominently brought to light by Mr. Hare when he means to suggest that there is really no reason why outsiders who have acquired the lands of our ryots in settlement of debts greatly made up of interest at high rates should not pay their rent whether a crop was taken off the land or not, especially as the rent is supposed to be a fair average for all years good and bad. This argument may be true with respect to money—lenders but when we come to consult the welfare of the rayots it becomes the parental duty of the government to remit—and not only to suspend—the land revenue, and to see well whether the new assessments be not reduced to their old standards for some years to come. The class of agriculturists is very poor and has no other alternative but to borrow to satisfy the need of the day. There is no thought of tomorrow and the rate of interest is therefore exhorbitant. We request the local government to institute some agricultural Bank, to lighten the burden of rent and to legislate upon the rate of interest in order to afford some relief against the present claims of the money—lenders.

## THE NATIONAL MEMORIAL

To
The Editor "Berar Samachar"
Akola.

Sir,

The question of erecting a National Memorial to perpetuate the memory of Her late Majesty the Queen Empress of India is being discussed throughout the length and breadth of India. Several proposals are being made as to the exact form the memorial should take. Large and influential meetings are being held and the pros and cons of the question are discussed by the high officials and non—officials of the country. Calcutta and Bombay have already taken the lead in the matter and Madras will soon follow. The province of Berar is not backward and benight d. It has taken a lead in all social and political movements and ranks first in small provinces which had the honor of holding the sittings of the Indian National Congress. It therefor behoves the leader of the province to move in the matter and organise an influentcal public meeting of both officials and non—officials and the general public, at Amraoti at a very early day. The question as to the nature of the Memorial should be discussed and settled and subscriptions invited from the general public. My humble proposal is that the name of our illustrous Lady Sovereign should be perpetuated in Berar by erecting a 'Building for utilising it as a Technical and Industrial school to be named as "Victoria Technical and Industrial school, Berar" in which Technical and Industrial education should be imparted. A moderate scheme should be drawn up and funds raised and provided for the maintenance of the institution and for purchasing the necessary upparatus. Poor labourers find no employment & wages owing to the disappearance of old industries and if a stimulus be given to the development of the industrial movement and numbers of Factories established in the province, the people will ever remember the name of Her Gracious Majesty and the institution will undoubtedly be a fitting memorial of the Lady Sovereign whose reign is distinguished for the wonderful progress in social, and political matters and advancement in arts and sciences.

Ellichpur 8—2—1901 — Yours truly G. N. S.

## वऱ्हाड

हवामान—हिंवाळा संपून ऋतुमान पालटलें आहे. किंचित् उष्णतेचा भासही होऊं लागला आहे. हवा चांगली निरोगी व आरोग्यकारक असून दुःखण्यांचें मानही कमी झालें आहे.

रा. रा. वासदेव काशीनाथ परांजपे क्लार्क आफ कोर्ट, स्मालकाज बडनेरा यांस इलिचपूरच्या डेप्युटी कमिशनरच्या क्लार्क आफ कोर्टाची बढती मिळाली आणि त्यांच्या बडनेरच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. विनायक कृष्ण सहस्त्रबुद्धे यांस नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

मि० मिडो साहेब डेपुटी कमिशनर, वाशिम हे दोन महिन्यांच्या हक्का या रजेवर जात आहेत आणि त्यांच्या जागेंत क्याप्टन प्लौडन असि० कमिशनर, बुलढाणा हे डेपुटी कमिशनरचें काम पाहतील.

मेजर ग्यारेट साहेब हे पुढील महिन्यांत रजेवरून परत आल्या नंतर उमरावतीस डेपुटी कमिशनरचे जागीं रुजू होतील आणि उमरावतीचे क्या० हार्सबरो साहेब हे इलिचपुरास डेपुटी कमिशनरचे जागीं बदलून जाणार आहेत.

उमरावतीचे प्रसिद्ध साहुकार रा. रा. श्रीनारायण रामविलास मारवाडी यास ३ रे वर्ग माजिस्ट्रेटीचा अधिकार देऊन त्यानीं उमरावतीच्या इतर बेंच माजिस्ट्रेटा बरोबर काम करावें असें ठरलें आहे. कैलासवासी राव साहेब रामविलास शेट यांच्या मागें यांच्या चिरंजीवास हा बहुमानाचा अधिकार दिला हो संतोषाची गोष्ट होय.

मि० इ० माईल ए० असि० कमिशनर माजि० वर्ग १ यांस समरी माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यात आले.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर ए० असि० कमिशनर यांस असिस्टंट कमिशनरचे संपूर्ण मुलकी अधिकार देण्यांत आले.

गेल्या नोंवेंबर महिन्यांत या प्रांतांत ४७१३ माणसें जन्मलीं व १२७४० मरण पावलीं. मरणाचें प्रमाण फार मोठें असून असें आढळतें कीं पांच वर्षा खालील मुलें व ६० वर्षांवरील वृद्ध माणसें हीं विशेष भारी प्रमाणानें मरतात. दुष्काळाच्या उपासमाऱ्याचे परिणाम या दोन्ही प्रकारच्या माणसांवर अधीक सत्वर घडतात.

मि. आरदेसर दिनसाजी चिनाय एक्स्ट्रा असि कमिशनर वर्ग ३, यांस सेन्सस सुपरिंटेंडेंट नेमल्यामुळें गेल्या जून १६ वे तारखे पासून खालील प्रमाणें बढत्या देण्यांत आल्या आहेतः—

| रा० रा० | एक्स्ट्रा असि. कमिशनरीचा वर्ग. |
|---|---|
| गणेश बापूजी | ३ रा. |
| टी. आर. एडवर्डस | ४ था. |
| बाळकृष्ण बळवंत मुळे | ५ वा. |

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| शेर ८० रुपये भार | | बारोळी मण | |
| दर खंडीस रु० | | दर खंडीस रु० | |
| ज्वारी | ४९।५७ | | |
| गहूं काठे | १२० | (बनशी) | १७० |
| चणे | १०० | आळशी | १३५ |
| तीळ | १०९।११० | मीठ | ८० |
| तूप मण १०॥ शेरी रु० | १२ | | |
| तेल मण १८ शेरी रु० | ७॥ | | |
| कपाशी | ३०-३८ | | |
| रुई | ५८ | | |
| सर्की खंडी(मण १०॥ शेरी) रु० | ४८= | | |
| सोनें | २४। रुपये तोळयास. | | |
| चांदी शेंभर रुपये भार किंमत रु० | ८१ | | |

वाशिम तारीख ८।२।०१

हवामान- थंडी दिवसेंदिवस कमी होत चालली असून दुपारीं तर उष्मा भासूं लागला आहे. वरचेवर आकाशांत ढग येत असतात. ताप, पडशें व खोकला हे आजार कमी होत चालले आहेत. धारण थोडी उतरली असून गुरांस पाणी व चारा पुरेसा आहे.

खानेसुमारी—आमचे जिल्ह्यांत ही खानेसुमारीचें काम झपाट्यानें चालू आहे वाशिम शहराकारितां रा. रा. विनायक विष्णु गोखले वकील यांस सेन्सेस सुपरिंटेंडेंट नेमण्यांत आले असून ते आपलें काम काळजीपूर्वक बजावीत आहेत.

नवीन वकील— रा. रा. शेषराव रघुनाथ वकील यांचे नातलग पैकीं मि. कृष्णाजी हणमंत जतकर बी. ए. एल. एल. बी. यांची वकिलीची परीक्षा पास झाली असून ते लवकरच विचापूराहून येथें येतील. मि० जतकर येथें आल्यावर येथील वकीलांची संख्या एकंदर आठ होईल.

नेमणूक— मि० एफ. डब्ल्यू. ए. प्रिडो साहेब बहादूर डेपुटी कमिशनर यानीं दोन महिन्यांची रजा घेतली, त्यांचे जागीं बुलढाण्याचे असिस्टंट कमिशनर क्याप्टन् टी. सी. प्लौडन यांची नेमणूक झाली आहे. साहेब मवसूफ यांनीं या जिल्ह्यात तीन महिने आफिशिएटिंग डेपुटी कमिशनरचें काम पाहिलें होतें.

रा. रा. गणेश वासुदेव नीमकर क्लार्क ऑफ दि कोर्ट यांनीं दोन २ महिन्यांची रजा घेतली. यांचे जागीं बुलढाण्याचे क्लार्क आफ दि कोर्ट रा. रा. नारायण रावचंद्र यांस येथें नेमलें. मि. नीमकर आतां या जिल्ह्यांत येणार नाहींत असें खात्रीलायक समजलें आहे.

मि. गुलाबराव चीफ का० यांस वाशीमास मि. कन्हयालाल यांस रिसेडांस आणि रा. सखारामपंत यांस मंगरूळास नेमलें.

तार पाठवली—चक्रवर्तनी महाराणी सरकारचे देहावसानाबद्दल दुःख प्रदर्शित करणेंकारितां ज्युबली टाऊनहालांत डेपुटी कमिशनर साहेब यांचे अध्यक्षतेखालीं शहरवासी जनांची एक सभा भरली होती त्यांत सर्व जातीचे लोक शरीक होते. सर्वानुमतें एक दुःखदर्शक तार व्हाइसराय साहेबांचे सेवेशीं पाठविली गेली.

## वर्तमानसार

युनिव्हर्सिटींत देशीभाषांचा प्रवेश.:— आह्मास कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं तारिख ३ रोजीं भरलेल्या सीनेटमध्यें मराठी, गुजराथी व कानडी ह्या भाषा एम. एच्या परीक्षेस ठेवाव्या असें बहुमतानें ठरलें आहे. व्हाईसराय चॅन्सलर मि. कँडी यांनीं हें प्रकरण लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न केला होता पण बहुमत पडल्यामुळें अखेर ह्या भाषांचा युनिव्हर्सिटींत प्रवेश झाला. विशेष समाधानाची गोष्ट ही कीं शाळा खात्याचे डायरेक्टर मे. जाईल्स साहेब यांचें या सुचनेस अनुकूल मत पडलें. आणि या मुळें बहुमतास ही त्याचा बराच उपयोग झाला. या सर्व गोष्टीचें श्रय के. न्या. रानडे यांजकडे आहे. एम एच्या परिक्षेंत कोणतीं मराठीं पुस्तकें ठेवावयाची यांजबद्दल के. न्या. रानडे यांचा रिपोर्ट आहे. यापुढें बरीच मंडळी देशी भाषेंत एम. ए. होतील अशी आशा आहे.

पाखरांनीं गांव सोडलें.—वर्धा येथील सर्व पाखरांनीं तें गांव सोडून दिलें कारण काय असेल तें देवाला ठाऊक !

गाणारें झाड—न्यूबिया देशांत एक झाड आहे त्यांतून एकसारखा मंजुळ स्वर निघत असतो. या झाडाला तिकडचे लोक सोफर ह्मणतात.

घड्याळाचें झाड.—ग्लासगो येथें एका बागेतील झाडें अशा बेतानें लाविलीं आहेत. कीं ह्या झाडांच्या सावलीवरून किती वाजले हें नेमकें सांगतां येतें. तासांच्या अनुक्रमाप्रमाणेंच झाडांचीही नांवें ठेविलीं आहेत.

श्री० महाराणीसाहेबांच्या स्मारकार्थीसाठीं सोलापूर येथील सुप्रसिद्ध व्यापारी रा. सा. वारद यानीं १००० रुपये देण्यासंबंधीं आपली इच्छा प्रदर्शित केली असें समजतें. तें स्मारक सोलापूर मुक्कामीं करण्याचें तेथील लोकप्रिय कलेक्टर मि. मेकानकी यांचें मत विशेष आहे असें ह्मणतात. ज्ञा.

चीनचें दुर्दैव – हो नाहीं ह्मणतां ह्मणतां चीन देशाशीं तह झाला. आणि त्या तहानें संयुक्तराष्ट्रांचे सध्यां तरी कांहीं अंशीं समाधान झालें आहे ह्मणण्यास मार्ग नाहीं तरी हें समाधान व तो तह ह्या दुर्दैवी देशास यापुढे किती नाचेल याची आजच कल्पना करणें योग्य नाहीं तथापि असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, प्रस्तुतच्या स्थित्यंतरानें चीन देशाचा दरारा, स्वातंत्र्य व वैभव हीं मात्र डळमळींत पायावर उभीं आहेत!

केकत आणि तिचा उपयोग– मिस्तर सूटर नांवाचे स्वीडनदेशीय गृहस्थ आहेत, त्यांनीं मुंबई शहरा नजीक आपले कारखान्यास सोईची अशी वीस हजार एकर जमीन सरकारांतून खंडानें घेतली आहे व त्या सर्व जमिनींत केकतीची लागवड करून तिच्यापासून यांत्रिक सामुग्रीनें तंतु काढून त्याचा व्यापार करण्याचा कारखाना घातला आहे. सदरी कारखाना अद्यापि अगदीं बाल्यावस्थेंत आहे तरी आज मित्तीस त्याजवर हजारो लोकांचा निर्वाह होत आहे. हजारो कोसावरून येऊन इतकें भांडवल घातलें असेल तें फायद्याची खात्री असल्याशिवाय घातलें असेल काय ? सोलापुरांतून सदरी कंपनीनें आगगाडीचे डब्यांचे डबे भरून केकतीचे गड्डे नेले आहेत. व त्यांची तेथें लागवड करण्याची योजना केली आहे. क० त०

सूर्यकमळें यांचें पीक केलें असतां फार फायदेशीर आहे. त्यांच्या बियांत शेकडा ६० प्रमाणानें तेल सांपडतें व पेंड गुरांच्या उपयोगी पडते. सूर्यकमळाचें उत्पन्न दर एकरीं सुमारें दोन अडीच खंडीहूनही जास्त होतें.

गुजराथची जमीन फार सुपीक असल्यामुळें ते लोक आपल्यास खाण्यास लागणारें धान्य अगदीं थोडे पिकवितात आणि कापूस, गहू, तेलाचीं धान्यें, वगैरे परदेशीं जाणाऱ्या जिनसा फार पिकवितात, अशीं त्यांची स्थिती असल्यामुळें १८९९ च्या पूर्वी ५–४ वर्षें जमीनीचें पीक थोडें थोडें कमी येऊन १८९९ चे खरपड पडे बसतांच ते लोक अगदी जेरीस आले.

काश्मीरच्या हद्दींत कडे कोसळून व बर्फ पडून रस्ते बंद झाल्यामुळें डाकेस खोटी झाली आहे. अ.

गेल्या पांच वर्षांत भुईमुग बाहेर किती खंडी गेला त्याचे आंकडे पुढील प्रमाणें आहेतः—

| | मुंबई इलाख्यांतून | मद्रास इलाख्यांतून | इतर प्रांतांतून | एकंदर |
|---|---|---|---|---|
| १८९५।९६ | ७९६९६८ | ३२११४४ | १६७ | ११९८२७९ |
| १८९६।९७ | २८८८०२ | २४७१८५ | २९८ | ४८६२८६ |
| १८९७।९८ | १९९०६ | २४५७९ | १९४ | ४४७३९ |
| १८९८।९९ | ७६७२८ | १०२९६ | ७३७ | ८७७६१ |
| १८९९।०० | २३०४ | १२१८४० | १७५ | १२४३१९ |
| १९००।०१ (वे ९ महिने) | २४७८ | ८१०९३ | ११० | ८३६८१ |

या वरून हें भुइमुगाचें पीक अलिकडे बरेंच कमी होऊं लागलें आहे असें होतें, व तें वाईट आहे. ठा० अ०

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।।।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।.२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारांची ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता--एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

## NOTICE.

Under rule 12 of the municipal Election Rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies created by the retirement of the members in the Akoa Municipal Committee, under operation of rule 31 of the Municipal Rules, will take place from 7 A. M. to 5 P. M. on the 21st. 22nd and 28th February 1901. The following table gives for each ward the names of the outgoing members, the date and place of election, the name of the Polling Officer, and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to the pollieg Officer.

Dated Akola 4th February 1901 } K. G. Damle. Secretary M. Committee Akola.

| Ward. | Names of outgoing members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Ganoba Raghoba<br>,, Narayan Kashinath Date | 23th February 1901 | Patel's chowri | V. N. Dandekar Esquire Extra Assistant Commissioner | 21st February 1901 | |
| II | ,, Jaikrishna Bagajee<br>" RamchandraM. Gupte<br>" Hakimoddin | 21st February 1901 | Grain Market office | | 14th Feburary 1901 | |
| 111 | " Dattatraya Krishna Kolatker | 22nd February 1901 | Town Hall | | 15th Feburay 1901 | |

Dated Akola 4th February 1901

K. G. Damle Secretary M. C. Akola.

## जाहिरात

म्युनिसिपाल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येतें कीं आकोले म्युनिसिपाल कमेटींतील ज्या मेंबराच्या जागा सदर्हू नियमांपैकीं नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्या करिता तारीख २१-२२-२८ फेब्रुवारी सन १९०१ इसवी रोजीं सकाळचें ७ वाजे पासून सायंकाळचे ५ वाजेपर्यंत निवडणूक होणार आहे. दिलेल्या तक्त्यांत वार्डांपैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख जागा, पोलिंग आफिसरचे नांव, उमेदवारांनीं कोणत्या कोणत्या तारखेपर्यंत पोलिंग आफिसरकडेस म्युनिसिपल नियम १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावेत वगैरे माहिती दिली आहे. कळावें. तारीख ४।२।१९०१ इसवी.

K. G. Damle.
सेक्रेटरी
म्युनिसिपल कमेटी.
आकोला.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव | उमेदवारांनीं कोणत्या [illegible] चे आंत नांवचे कागद [illegible] यावे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि. गणोबा राघोबा.<br>मि. नारायण काशीनाथ दाते. | २८-२-१९०१ | पाटील चावडी. | मे. विश्वनाथ नारायण दांडेकर. | २१—२—१९०१ चे आंत. |
| २ | मि. जैकृष्ण बगाजी.<br>मि. रामचंद्र मार्तंड गुप्त.<br>मि. मो. हकीमुद्दीन. | २१-२-१९०१ | ग्रेन मार्केट ऑफिस | | १४—२—१९०१ |
| ३ | मि. दत्तात्रय कृष्ण कोलटकर. | २२-२-१९०१ | टाऊनहाल | | १५-२-१९०१ |

आकोले तारीख ४-२-१९०१

K. G. Damle
सेक्रेटरी म्यु० कमटी अकोला.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 .............. 8 a
ingle copy ..............................4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

REGISTERED N. No 9

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 18 FEBRUARY 1901 NO 7

वर्षं ३५ आकोला सोमवार तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १९०१ इ० अंक ७

### जाहिरात

#### देशमुख सभा.

सर्वत्र देशमुख बंधूंस कळविण्याचे कीं ह्या वर्षी देशमुख सभेची वार्षीक बैठक मुक्काम शिराळ तालुका उमरावती येथें मिती चैत्र शुद्ध १ तारीख २१।३।१९०१ इसवी रोजीं गुरुवारीं दुपारीं होणार आहे; तरी सर्व देशमुख बंधूंनीं सभेस येण्याची अवश्य कृपा करावी ही अत्यादर पूर्वक विनंती आहे. तारीख २०।३।१९०१ इसवी रोजीं सायंकाळचे चार वाजल्या पासून गुरुवारचे सकाळ पर्यंत बैलगाड्या उमरावती स्टेशनावर ठेवण्यांत येतील.

मलकापूर संपतराव पर्वतराव
ता० १४।२।१९०१ सेक्रेटरी देशमुख सभा.

### जाहिरात

ज्या अर्जदारांनीं सेन्सस ऑफिसांत नौकरी मिळण्याकरितां अर्ज केले आहेत त्यांनीं व दुसऱ्या अशा उमेदवारांनीं उमरावती येथें सेन्सस आफिसांत हजर होऊन तारीख ६ मार्चच्या सकाळपासून आठ दिवस बिन पगारानें ऍवस्ट्रॅक्शन व टॅबुलेशनचें काम शिकावें. त्यानंतर योग्य ठरतील यांना ठेविलें जाईल. पगार वगैरे संबंधानें माहिती समक्ष सेन्सस आफिसांत दिली जाईल.

A. D. Chiney.

क्यांप बुलडाणें } सुपरिंटेंडेंट आफ सेन्सस
ता० १६।२।०१ } आपरेशन्स
मुलुख अमानी हैदराबाद

### मोरोपंत

निवडक वेंचे ( सावित्री आख्यान )

नंबर १४ वा

अभंग—

( वनांत जातांना मार्गांत—

पुष्पीत, फलीत, तरु, मृग, पक्षी ।
वनांतीं लक्षी राजकन्या ॥ १२९ ॥
पतीच्या सुखार्थ बळें आणी हास्य ।
मयूराचें लास्य विलोकूनी ॥ १३० ॥
निंदि वचनें पतीतें डोलनी ।
दाटूनी बोलवी पुण्यकथा ॥ १३१ ॥
एके नेत्रें पिया, एके नेत्रें काळा ।
पाहे राजबाळा हर्षें, भीता ॥ १३२ ॥

( चित्राश्व कार्ष्ठे फोडितो )

कठीणा काष्ठाच्या करितां भेदना ।
उठली वेदना शिरीं भारी ॥ १३५ ॥
ह्मणे, पिये ! शूळ ऊठला मस्तकीं ।
धांवूनी हस्तकीं साध्वी धरी ॥ १३६ ॥
ह्मणे, ' कधीं झाला ऐसा खेद नाहीं ।
शिरो वेदनांहीं धैर्य गेलें ॥ १३७ ॥
जाणों शूळाघातें मस्तक फाटतें ।
मनांत वाटतें निज वेंचें ॥ १३८ ॥
पतीच्या मस्तकाखालीं वाली मांडी ।
जाणों ऊशी मांडी कुसुमाची ॥ १३९ ॥
धरूनी मस्तक मनीं ह्मणे बाळा ।
आला ठोकताळा भविष्याचा ॥ १४० ॥
तों पुरुष पार्शे–हस्त उभा आहे ।
असें साध्वी पाहे पुण्यबळें ॥ १४१ ॥
रक्त नेत्र कृष्णवर्ण तेजें अर्क ।
काळ असा तर्क मनीं केला ॥ १४२ ॥
हळूंचि मस्तक उतरूनी ठेवी ।
उठोनी ती देवी हात जोडी ॥ १४३ ॥
ह्मणे, ' बा ! तुं देव काय तुझें नाम ।
कोण कार्य काम मज सांग ॥ १४४ ॥
काळ ह्मणे ' शुद्धा ह्मणोनीच तूज ।
सांगतों मी गूज पतिव्रते ॥ १४५ ॥
करितो जीवाची प्राण-हानि यम ।
जाण हा नियम त्रैलोक्यीं ॥ १४६ ॥
सरलें आयुष्य निश्चित याच्या या ।
प्रियतम न्यायाया तुझ्या आलों ॥
पतिव्रता ह्मणे, ' दूत कीं येतात ।
जीवाला नेतात तुजकडे ॥
स्वयें कां आलास ? काय केले दूत ।
भूत प्रभृत श्रम झाला ।
यम ह्मणे, ' पितृभक्त सत्यवंत ।
यासि सर्व संत मानवती ॥
कोणी रूपें गुणें नाहीं असा मान्य ।
सत्य असामान्य सत्यवंत ॥
दूत कैसा धाडूं न्यावया अशाला ?
रक्षाया यशाला स्वयें आलों ' ॥

( कोणाच्या अंगीं एखादा साधारण दोष आढळला, किंवा त्यानें कांहीं अपराध केला असें समजलें, तर अविचारास वश होऊन त्याच्या इतर सद्गुणांचें मोल मनात न आणितां, त्याच्या या एका दोषाबद्दल किंवा अपराधाबद्दल त्यास उग्र प्रायश्चित्त देण्यास जे तयार होतात त्यांनीं वरील पद्यांत दर्शविलेलें तत्व ध्यानांत धरावें.

गुण आणि दोष यांचें मिश्रण न करितां बुद्धीचा समतोलपणा राखून दोषाबद्दल शासन आणि गुणांबद्दल शुद्ध मनानें गौरव करणें यासच खरा न्याय ह्मणता येईल. असो.

चित्राश्वाचे प्राण हरण करून यमधर्म मार्गस्थ झाला. त्याच्याच मार्गाचें अवलंबन सावित्रीनें केलें असें पाहून व तिला उद्देशून— )

यम ह्मणे, ' दूर पावींत आलीस ।
सावित्री झालीस उतराई ॥
जा, उत्तम लोक प्राप्त व्हाया पिया ।
करीं सांग क्रियो यथाशक्ती ' ॥
सावित्री ह्मणे, ' गा देहासवें छाया ।
जशी तशी जाया पती सवें ॥
प्राण जाऊं यावे पती न सोडावा ।
स्वधर्म जोडावा मुख्य हाची ॥

१ करी २ हातांत मृत्युपाश घेऊन ३ सूर्य ४ करावयाचें ५ व्रतानें सिद्ध पदाप्रत पोंहचलेली ती अशी तूं. ६ ठरलेलें. ७ यमधर्म प्रभुस. ८ पुष्कळ.

१ नृप २ अपमृत्यु निवारणार्थ ३ आनंदी ४ दूर पर्यंत. ५ उत्तर क्रिया. ६ पाली.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ३० शके १८२२

### गुणमंडन

गेल्या मुलकी रिपोर्टांत गुणमंडनाचा एक भाग आहे आणि तो वाचला ह्मणजे खरोखर आनंद वाटल्या वचून राहत नाहीं. हा भाग आमच्या प्रांताच्या पाटील पटवाऱ्या संबंधानें आहे. हे गांवचे कामदार अगदीं कसपटाप्रमाणें कित्येक अधिकाऱ्यांना दिसतात परंतु त्यांच्या अंगभूत सद्गुणांची पारख मि. हेअर सारख्या गुणग्राही माणसांसच होते. पाटील ह्मणजे गांवचा राजा आणि पटवारी ह्मणजे त्याचा सचिव होय. पाटीलपटवाऱ्यांची संस्था फार जुनाट आहे आणि त्यांची स्थापना गांवच्या स्थापने इतकी जुनी असावी. हे गांवचे अधिकार वाडवडिलापासून चालत आले असल्यामुळें त्यांचा मोठा अभिमान असतो. अलिकडे हे अधिकार पोंकळ वाटतात आणि पाटीलकी किंवा पटवारीपणा ह्मणजे शोभेचा टिकला वाटतो. या अधिकारांत कांहीं हाशिल नाहीं. एखादा शिपाई देखील त्यांची खबर घेऊं शकतो. तथापि जुन्या घरंदाजपणाला व वडिलार्जित अधिकाराला अजून मोठा मान आहे आणि तेवढ्याच करितां पाटील पटवाऱ्याची नेमणूक होते वेळीं मोठी तारंबळ उडते व हजारो रुपयेही वतनदार मंडळी वतनाच्या आशेनें खर्च करितात. पाटील पटवाऱ्यांस चांगुलपणानें वागविण्याविषयीं गेल्या दोन तीन वर्षांपासून मुलकी रिपोर्टांत सुविचार प्रसिद्ध होत असतात आणि त्यांचें श्रेय मि. हेअर साहेबांस आहे. पाटील पटवाऱ्या संबंधानें हे लिहितात कीं:—

गांवच्या कामदारांस वरचेवर दंड करूं नयेत असा माझा अभिप्राय आहे आणि तो मी पूर्वीं कळविला आहे. गांवच्या कामदारापैकीं पाटील हा तर पुष्कळ काम करितो. त्याला पगार थोडा असतो आणि अडचणी मात्र पुष्कळ असतात. मि. जोन्स यांनीं या वतनदारी संबंधानें लिहिलें होतें कीं एखादा दुष्काळाचा प्रसंग येऊन बेतलाच तर आमची गांवची कामगार मंडळी फारच फार उपयोगी पडेल आणि त्यांचें तसें लिहिणें अगदीं खरें ठरलें. दुष्काळांत गांवोगांव ज्या ज्या व्यवस्था केल्या होत्या त्यांचा सर्व भार पाटील व पटवारी यांच्यावर होता. त्यांनीं धर्मार्थ जवारी वाटली. किंबहुना खिचडीखाने व खेडेगांवचीं कामें यांची देखरेख होती. व अर्थात पुष्कळशा पैशाचा बटवडा त्यांच्या हातून झालेला आहे. त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेविला होता आणि ते खरोखर परीक्षेच्या कसोटीला उतरले आहेत. आणि त्यांस कांहीं लाभाची आशा नसतांना व केवळ आपल्या घराण्याच्या थोरपणासाठीं त्यांनीं बिनतक्रार व सतत कामें केलीं आहेत. आणि हेंही विसरतां कामा नये कीं ज्या मंडळीच्या हातून आपणाला दुष्काळाच्या निवारणाचीं कामें करून घ्यावयाचीं होतीं व ज्या मंडळींनीं तीं कामें इतकीं उत्कृष्ट बजावलीं या मंडळीपैकीं पुष्कळ जणांची दोनतयां मोठ्या कष्टानें निभत असे व ते बाहेरून ठाकठीकपणा दाखवीत असत व आपलीं कुटुंबें अब्रूदारीनें दुष्काळांतून कशी तरी वांचवीत होते. ”

अशी ही उत्कृष्ट सनद मे. हेअर साहेबांनीं आमच्या पाटील पटवाऱ्यांस दिली आहे आणि ती यथायोग्य असल्या विषयीं मे. क्रॉफर्ड व ऑलिफान्त नामदार रेसिडेंट या उभयतांचाही अभिप्राय आहे. असा जर वास्तविक प्रकार होता तर पाटीलपटवाऱ्या विषयीं नवा कडक कायदा नको होता. हा नवा कायदा कसा तरी रद्द होईल तर बरें ! यानें वतनदारी धुळीला मिळविली आहे. ही वतनदारी पूर्ववत् कायमें राहील अशी सरकार कांहीं व्यवस्था करितील अशी आह्मांस उमेद आहे.

### रामायण.

मिल्टनचे ग्रंथ वाचणारे थोडे पण मिल्टनचे स्तुतिपाठक पुष्कळ असा एके स्थळीं प्रोफेसर म्याक्मिलन यांनीं उद्गार काढला आहे. हाच प्रकार आमच्या बहुजनसमाजालाच काय पण विद्वान मंडळीलाही

सारखाच लागूं पडेल. रामायणाचे वाचक थोडेच पण रामायण ग्रंथावर गंधफूल घालून शूचिर्भूतपणानें पूजा करणारे पुजारी पुष्कळच आढळतील. कांहीं ग्रंथ उत्तम ह्मणून ठरलेले आहेत इतकेंच नाहीं त्यांच्या उत्कृष्टपणा विषयींची सनद परंपरेनें चालत आलेली आहे. त्या सनदेवर हवाला देऊन बाह्योपचारानें मान डोलविणारे रामायणाचे भक्त सर्वत्र आढळतील. ग्रंथवैभवाची कबूली गतानुगतिक आहे; आणि तिच्यावरच संतृप्ती मानून घेण्याचा मार्ग लौकिकी आहे. या फसवाफसवीच्या धर्तीला सोडून देण्याचें वळण लागावें असें आह्मी मना पासून इछितों. पुराण गोष्टींना सन्मान देण्याची रीति चांगली आहे पण ती रीति सांभाळतांना प्रत्येकानें थोडासा अंतःप्रवेश होईल आणि पुराण गोष्टींशी कांहींशी ओळख होईल असा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या जुन्या संस्थांचा खरा अभिमान ज्या आर्यबंधूंस असेल त्यांनीं आपली ज्ञानदृष्टी आंत पोचवावी आणि पुराणकालच्या स्थितीची पूर्ण माहिती करून घ्यावी हेंच ज्ञानवान् आर्यांचें पहिलें कर्तव्य होय. या कर्तव्याला जागरूक असे सन्मान्य पंडित विरळा! तशा असामान्य लोकांच्या कृतीशी परिचय करून देण्याचा सुयोग आह्मी गेल्या दोन तीन अंकांत आणिला होता. त्याच प्रयत्नाच्या चवथ्या श्रेणीला प्रारंभ करण्याचा आजचा विचार आहे. रामायणाच्या ग्रंथाविषयीं व कथेच्या ओघाविषयीं संक्षिप्त माहिती दिल्या नंतर व रामायणाचा काल निर्णीत केल्या नंतर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं ह्या **वीरकाळाच्या** राष्ट्रीय लोकस्थिती संबंधानें प्रमाणसिद्ध माहिती संग्रहित केली आहे. ती संकलित माहिती वाचून नंतर जर रामायणाच्या कालाविषयीं आपल्या मनांत पूज्यभाव दृढ झाला तर निबंधकाराचा इष्ट हेतु सिद्धीस गेला असें होईल राजश्री आण्णासाहेब महाजनी यांचा हा रामायणावरील निबंध सर्व जुन्या व नव्या मताच्या कसोटीस उतरलेला आहे आणि तो सर्वांसच सारखा मान्य व पसंत पडला आहे हें सांगणें ह्मणजे नको ती द्विरुक्ति केल्याचा दोष आह्मावर येणार आहे. या निबंधांत दर्शविलेल्या लोकस्थितीचा विद्यमान लोकस्थितींशी असलेला पूर्वसंबंध चांगला कळला तर आपल्या इतिहासाच्या ज्ञानाची परिपूर्ती होऊन पुष्कळशा असंबद्ध रूढींची व प्रचारांतल्या गोष्टींची अन्वर्थकता चांगली समजेल.

आतां या वीरकाळांतील लोकस्थिती विषयीं विचार करूं.

प्रथमतः लोकांची **राष्ट्रीय स्थिति** कशी होती हें पाहूं.

ब्राह्मण आणि क्षत्रिय हे सर्व वर्णांत श्रेष्ठ होते ह्मणून वर ह्मटलेंच आहे. द्विजातींत चार आश्रम असत. त्यांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ होता ( २,१०६,२२ )

ब्रह्मचारी हा पहिला आश्रम याचा काल मुंजी पासून विद्याभ्यास संपल्यावर विवाहकाला पर्यंत होता, असें असून लक्ष्मणास ब्रह्मचारी असें ह्मटलें आहे तें कसें हें समजत नाहीं. या शद्वाचा अर्थ व्रतस्थ इतकाच घेतला पाहिजे. वानप्रस्थाश्रमाचें व्रत रामानें वनवासांत पाळिलें आहे. जटा व वल्कलें धारण करून राहणें, फळमूळावर राहणें, कुशास्तरणावर निजणें, आणि पत्नी सहवासांतही व्रतस्थ राहणें ही या आश्रमाची लक्षणें समजतात. मांसाहारही या आश्रमांत निषिद्ध आहे; परंतु राम हें व्रत पाळीत होता असें दिसत नाहीं. मृग, मत्स्य आणि पक्षी यांचें मांस चालत असे. मसाले घालून शिजवलेलें मांस खाऊं नये इतकाच निर्बंध समजावा असें टीकाकारानें ह्मटलें आहे. गृहस्थाश्रम करून राहणारे व न राहणारे असे ऋषि असत. गृहस्थाश्रम न करणांऱ्यात पुष्कळ प्रकार सांगितले आहेत. १ फलमूलाशी यांतील प्रकारः कच्चें अन्न खाणारे, पानावर राहणारे, फक्त चाऊन खाणारे, २ तपश्चरणानें झालेले प्रकारः—पाण्यांत आकंठ राहून तप करणारे, भूमिवर आस्तरण न घालतां निजणारे, उन्निद्रतप करणारे, पाण्यावरच अथवा वायु भक्षण करूनच तप करणारे, अक्षयीं जप करणारे, अक्षयीं स्वाध्यायाध्यन करणारे, ग्रीष्मांत पंचाग्निमध्यस्थ होऊन तप करणारे मुंडी, दंडी, परिव्राजक असेही भेद आहेत महर्षींच्या अंगीं तेज असून त्यांना ध्यान योगानें अतीतांना गत वर्तमान काळच्या जवळच्या दूरच्या गोष्टी समजत; तसेंच योगबलानें त्यांना पाहिजे ते पदार्थ उत्पन्न करून अभ्यागतांचा आदर सत्कार करितां येई, अशाचीं बरीच उदाहरणें आहेत. भरद्वाजानें ससैन्य भरताचा केलेला सत्कार, हें एक उदाहरण बस आहे. ब्राह्मणाची योग्यता व अधिकार या काळीं कमी होत चालला होता असें अनुमान करावयास जागा आहे.

ना विद्वान्नच नास्तिकः १,६,८

नाषडङ्ग विदत्रासी नाव्रतो ना बहुश्रुतः ।

सदस्यास्तस्य वैराज्ञेः नावाद कुशलो

द्विजः ॥ १,१४,२१

अशा प्रकारचीं दोन निषेधवाचक शद्वांनीं केलेलीं विधानें संशयजनक असतात. ह्याच्या राज्यांत कोणी ( ब्राह्मण ) अविद्वान नव्हता, कोणि नास्तिक नव्हता, असें ह्मणणें स्तुतिपर दिसतें. यांतील मथितार्थ हा निघतो कीं, प्रत्येक ब्राह्मणानें विद्वान् असावें हें खरें, पण वस्तुस्थिति विपरीत होऊं लागली होती. दुसऱ्या उताऱ्यांत पुत्रेष्टीच्या वेळीं जमलेल्या विद्वानांत कोणी षडङ्ग न जाणणारे (१,६,११) वगैरे नव्हते. याचा अर्थ विद्या कमी होऊं लागली असाच निघतो. तसेंच "नामृष्ट भोजी" "सुग्रास ज्याला मिळत नाहीं, असा कोणी ही नव्हता" याच्या उलट गार्ग्य त्रिजटाचें उदाहरण आहे. (२,३२,२९.४९) हा ब्राह्मण निर्धन होता, याची भार्या तरुण असून मुलें पुष्कळ होतीं. हा जमीन नांगरून आपला चरितार्थ चालवीत असे, परंतु पोट भरेना ह्मणून रामाकडे आला होता.

नित्य स्वाध्यायशीलत्वान्नान्यत् कुर्वन्ति किंचन ।

अलसाः स्वादुकामाश्च महतांचापि संमताः । २,३२,१९

यांत आळशी, गोड खाणारे, व नित्य अध्ययन करण्यानें मोठ्यांनाही मान्य असा ब्राह्मणांना रामानें धर्म केला आहे असा उल्लेख आहे हें हल्लींच्या भिक्षुक वृत्तीचें बीजच होय. यांतील स्वाध्यायशीलत्वाचा ऱ्हास कालें करून झाला, तेव्हां ब्राह्मण हल्लींचे बहुतेक भिक्षुक बनले.

यज्ञयागादिकांच्या वेळीं ब्राह्मणांना भूमिदान मिळत असे, तें या काळीं ब्राह्मण घेतनासे झाले होते. भूमी बद्दल "निष्क्रय" घ्यावयाला तयार झाले होते ( १,१४,४८ ) येथें ही भूमि न घेण्याचें कारण स्वाध्यायनिरतत्वच दाखविलें आहे. हें निष्क्रयाचें बंड येथून पुढें पुष्कळच माजलें. इतक्या पुरातन काळीं पैसा सर्वार्थसाधनीभूत झाला हें पाहून आधुनिक अर्थशास्त्रज्ञास समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं.

## क्षत्रिय

ब्राह्मणाच्या खालीं क्षत्रिय येतात. यांना वेद पढण्याचा व वैदिक कर्म करण्याचा व दान करण्याचा अधिकार होता. यांचें काम युद्ध करण्याचें. आर्तांचा शद्ब ऐकूं येऊं नये ह्मणून क्षत्रिय धनुष्य हातीं घेतात, असें राम ह्मणतो. अक्षयीं युद्धांत गुंतलेल्या लोकाच्या अंगीं जे गुण किंवा अवगुण असतात ते रामकालीन क्षत्रियांत दिसत असत. रणां तून परत येणें लाजिरवाणें समजत. क्षत्रिय साहसी व स्पष्ट बोलणारे असत. मृगयेचा यांना नाद असे. अंध रात्रीही शद्बावरून हे लक्ष्य भेदीत असत. क्षात्रतेज अंगांत असल्यानें हे आमर्षी असत शत्रूंशीं सामना करण्याला अक्षयीं तयार. नसती कुरापत काढून वीर्यातिरेकानें चालून जात असत. स्वाभिमान व स्वकुलाभिमान, यांच्या अंगीं चांगला जागृत राहत असे. वडिलांना, वृद्धांना व पूज्यांना हे मान देत असत. युद्धामध्यें व राजसभेमध्यें बोलण्यांत हे मोठे चतुर असत. याच गुणांशीं संलग्न असलेले दुर्गुण कितीएक क्षत्रियांत आढळत. हे क्रूर असत. स्त्रीवर हात टाकूं नये, असा निर्बंध असे खरा, पण या वीरकालांत बऱ्याच सुंदर स्त्रियांचें धर्षण झालें असावें. रामचरित्रांतील सीताहरण हें एक निदर्शक पुरें आहे. तसेंच लोकांना त्रास देणें, त्यांची संपत्ति आणणें, हाहि निग्रांतला क्रम असे. उत्तम क्षत्रियाचें चित्र "राम" ह्मणून वाल्मीकीनें रेखाटलें आहे

क्षत्रियां खालीं **वैश्य** हे येत. त्यांच्याविषयीं रामायणांत फारसें सांगितलेलें नाहीं. हे व्यापार करीत. परदेशांतून खुष्कीनें अथवा जलमार्गानें नांवांतून माल आणवीत. यांच्या श्रेण्या असत, व त्यांवर मुख्य असत त्यांना "नैगम" ह्मणून ह्मणत असत. ते राजमंत्र्याबरोबर राजदरबारांत जात, व राजा त्यांची सल्लामसलत घेत असे. वैश्यांनीं क्षत्रिय सांगतील तसें वागावें, येवढें ह्मटलें आहे. हे तीन वर्ण "द्विजांत" मोडत; व यांनां वेदपठणाचा अधिकार असे. वैश्यांच्या खालीं शूद्र येत; यांनीं इतरांची सेवा करावी येवढेंच ह्मटलें आहे. यांना वेदाधिकार नव्हता. परंतु यज्ञादिक समारंभांत द्विजांना तसेंच यांना राजाकडून बोलावणें असे. सर्वांचा समाचार यथास्थित होत असे. रामायणांत अनुलोम विवाहाचें उदाहरण आहे. ययातीचा उल्लेख आहे पण देवयानीची कथा नाहीं. एका पंक्तींत सर्व वर्णांचे लोक बसत अशाबद्दल प्रमाण सांपडत नाहीं. एके स्थळीं बसत येवढ्यावरून कांहीं सिद्ध होत नाहीं. तरी निषादपति जो गुह त्यानें रामाला सर्व प्रकारचें अन्न ( ओलें, कोरडें ) समर्पिलें—त्यानें घेतलें नाहीं ही गोष्ट निराळी—तसेंच भरताच्या सैन्याचें त्यानें अन्न पात्र देऊन आदरातिथ्य केलें या गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. निषादाची जात अति शूद्रांत गणीत असें असून त्यांचा पति रामाचा सखा होता.

## संकर जाति.

हे वैदिक काळा पासून प्रचलित असलेले चार वर्ण या वीर काळीं अबाधित होते, असें ह्मणवत नाहीं. मनुस्मृतीस अनुसरून ही वर्णव्यवस्था वाल्मिकीनें पाळिली आहे. परंतु यावेळीं संकर जातींचा उद्गम झाला होता असें दिसतें. जाति शद्ब या काळीं अयथार्थ असेल तर धंदे हा शद्ब योजित असतां चालेल.

---

## लांच

( शाळा खात्यांतला चमत्कार )

लांचाच्या बाबतींत शाळाखातें अगदीं पवित्र आहे आणि कदाचित् या खात्यांत लांच खाण्याचा संभवही कमीच आहे. परंतु अलिकडील विद्यार्थ्यांच्या कल्पना विचित्र दिसतात. एका अबुद्ध पोराला तर्क सुचला कीं पांच रुपये खर्चून मराठी सहावी इयत्ता उतरेल तर बरें ! मुलांना विचार तो कसला ! लागलेंच त्यानें परीक्षक रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके बी. ए. डिपुटी एजुक्याशनल इनस्पेक्टर आकोला यांस पत्र लिहिलें आणि कळविलें कीं "तुह्मी जर मला मराठी सहावे इयत्तेंत पास केलें तर मी आपणास पांच रुपये देईन. तूर्त एक रुपया मी नगदी देत आहे" वगैरे या पत्रावर मे. डायरेक्टर साहेबांशीं पत्रव्यवहार होऊन असा हुकूम सर्व शाळांस फर्माविण्यांत आला आहे कीं सदर्हू विद्यार्थ्यास एक वर्ष पर्यंत कोणत्याही शाळेंत घेऊं नये.

वरील लांचाचा, कागाळीचा व हुकूमाचा सर्व प्रकार वाचून मोठें हसूं येतें. ही गोष्ट जानेवारीच्या वऱ्हाड शाळापत्रकांत सरक्युलराच्या रूपानें छापिली आहे. हें आमचें शाळापत्रक अगदीं नीरस असतें ह्मणून तें कोणी फारसें वाचीत नाहींत परंतु त्यांतही असली मौजेची छटा असली ह्मणजे त्याचा नामनिर्देश करणें भाग पडतें. मुलाची मती लांच देण्यापर्यंत आली हा दोष परीक्षकांचा नाहीं व शिक्षकांचा नाहीं तर तो पोरांच्या अल्लडपणाचा व हूडपणाचा असला पाहिजे. असल्या गोष्टीला राजश्री पिटके यांनीं रिकामें महत्व द्यावयाचें नव्हतें. मुलाची फटफजिती करून त्याला देहदंड करावयाचा होता. रागाच्या उतावळेपणांत ही मजल आली असावी पण राजश्री पिटके यांचा हा भित्रेपणा व कायदेशीरपणा पाहून आह्मांस खेद वाटतो. त्यांच्याच प्रमाणें डायरेक्टर मे. क्यांडी साहेबही चुकले असें पुढें ह्मणावें लागतें पण आह्मी त्यांच्या गादीचा मान राखण्यासाठीं वरील दोषदर्शनांत आमचीच चूक समजतों.

मुलाला शिक्षा करितांना दूरदर्शीपणा दाखविण्यांत आला नाहीं असे जुने अनुभवी शाळाखात्यांतले लोक सांगतील. त्या मुलाला परीक्षा पास होण्याची महत्वा-

कांक्षा होती; ती त्याच्या मनांतच विरली ! उनाड, खेळकर व टवाळ मुलाला एक वर्ष शाळा बंद झाली ही गोष्ट त्याच्या दृष्टीनें फायद्याचीच झाली. वास्तविक ही शिक्षा त्या मुलाच्या आईबापास झाली. आपल्या मुलाचा हा डांगोरा ऐकून त्यांचें अंतःकरण अगदीं तीळतीळ तुटेल. वरील शिक्षेविषयीं सरक्युलर काढून तें शाळ खात्यांत प्रसिद्ध केलें आणि यामुळें त्या मुलाच्या भावी आयुष्यावरही फार वाईट परिणाम घडतील. सरकारी चाकरी मिळते वेळीं ही गोष्ट पदोपदीं त्याला आडवी येईल. असला लांचाचा मासला प्रसिद्ध केल्यामुळें जी गोष्ट विद्यार्थ्यांच्या कल्पनासृष्टींतही नव्हती ती त्यांच्याच सारख्या एकानें केली असें ऐकून त्यांच्या मनाला वाटणारा आचंबा तरी नाहींसा होईल. पदोंपदीं मुलें चुक्या करितात आणि कित्येक वेळीं त्या भयंकरही असतात. मुलेंच तीं आणि बोलून चालून त्यांची पोरबुद्धि ! लहान मुलांची शाळा बंद करणें ही मोठीच चूक होय. मुलांविषयीं फौजदारि कायद्यांत ज्या शिक्षा सांगितल्या आहेत त्यांत छडीचा मार ही पहिली आहे आणि ती शिक्षा पुरेशी न वाटेल तर त्यास कैदेंत ठेऊन रिफार्मेटरीच्या शाळेंत विद्या शिकवितात. हें कायद्याचें उज्वल तत्व ध्यानांत आलें असतें तर शाळा बंद करण्याची शिक्षा देण्यांत आली नसती. चूक एखादी कळली तर प्रांजळ व न्यायी गृहस्थ घडलेली चूक दुरुस्त करितात आणि पुढें तशी न होण्या विषयीं काळजी घेतात. आमचा अभिप्राय जर खरा असेल तर आह्मी दर्शविलेली चूक दुरुस्त होईल अशी आह्मांस बळकट उमेद आहे. आह्मी अशी आशा करितों कीं डायरेक्टर साहेब वरील शिक्षेचा व सरक्युलराचा पुन्हा विचार करितील आणि मूर्ख, स्वच्छंदी व भ्रंश पावलेल्या विद्यार्थ्याला विद्येचा चांगला मार्ग दाखवितील.

---

गेल्या गुरुवारीं पार्लमेंटची सभा प्रथम भरली तेव्हां बादशहा एडवर्ड ७ वा व त्यांच्या पत्नी हीं उभयतां दरबारच्या थाटानें पार्लमेंटांत शिरलीं आणि बादशहा ह्मणाले कीं मातोश्रीचा कित्ता वळविण्याचा अहर्निश प्रयत्न करीन. ट्रान्सवालची लढाई संपली नाहीं तरी शत्रूच्या मुख्य मुख्य नगऱ्या व दळणवळणाचे मार्ग हीं माझ्या ताब्यांत आलीं आहेत. पेकिंग शहर काबीज केलें आणि चीनला आमच्या इंडियन सैन्यानें जर्जर करून सोडलें. ड्यूक आफ यार्क आपल्या पत्नीसह आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व कानडा या भागांत फिरण्यास जाणार आहेत इंडियांतील दुष्काळ संपला तरी अजून मुंबई इलाख्यांत कांहीं जिल्ह्यांत दुष्काळ आहे ही दुःखाची गोष्ट होय.

---

## The Berar Samachar

**MONDAY FEBRUARY 18 1901**

---

The Victoria Memorial is the absorbing topic of the day and it is but natural that a reign so full of blessings for India and so pregnant of future greatness and glory should be commemorated with an adequaet memorial that will remind the present and future generations of Victoria-the Good. There is no question about the necessity of a fitting memorial but opinion is very divergent on the point of the shape which the memorial should take. Lord Curzon is now to the front with his proposal the 'Viotoria Hall' & it is no wonder if the august Viceroy succeeds admirably to the extent of having to refuse the enormous sums of munificent contributions from some of the Native rulers. We hold a different view from that of Lord Curzon. It is a bold assertion but we are compelled to say that His Excellency's proposal has neither the originality of an inventor in perpetuating the sacred name of Victoria nor the refined taste of a prophet who will do well to immortalize the Victorian era with the foundation of an institution that will promise to India the return of her past grandeur. There is the wonderful. Taj Mahal at Agra-and the palsy hand of Time, though not busy with it, has left it in the back—ground and hardly arouses any interest except in the heart of the traveller in those provinces. There will now be the Victoria Hall at Calcutta to rival with the Taj Mahal at Agra But what with new buildings if the old ones crumble and represent the augustness of a colossal wreck / As we advance, with time and keep pace with the modern civilization we think of improving the old system of memorials in the form of architectural buildings. If the Queen's memorial does not represent the spirit of the modern times and does not lay deeper the foundation of a Tata University or the Victoria Technical Institute which augurs well for all future generations it is no fitting memorial of the beginning of the 20th century.

We think that there is no one system on which memorials ought to be organized. We propose that there be established the 'Indian Memorial University' and the funds of all memorials beginning with Victoria the Good and carring the link of associations of the holy name of the Empress with that of M. G. Ranade should be handed to the University. Let these two memorials go hand in hand and let the University which will represent amongst it members the nucleus of all Indian Universities find out the best means to keep alive the greatness and the goodness of the past great people of India. Such a university will be able to hand over to posterity a long roll of the great saints of the nation with their best traditions writ in golden letters. We do not mean hereby that the Indian Memorial University should disregard local memorials but it should guide the foundation of the latter whereas it should have the direct control over the *national* memorials which should not begin with a sum less than 1,00,000 Rs. as the minimum. Such a University will think well of the need of the times before it prospeses to build a memorial. If the Victoria memorial do not begin with the revival of India by instituting Technical Schools and Colleges we donot think that there will ever be a hope for our people to rise to the level of other nations.

---

## वऱ्हाड

**हवामान—** मध्यंतरीं फारच कडक थंडी पडली होती आणि त्या मुळें थंडीचे आजार बरेच उमळले. काल परवां पासून मळाभ्रामुळें थंडी कमी आहे पण आसपास पाऊस पडत असल्याचीं चिन्हें दिसतात. हवेंत चलविचल वारंवार होत असते. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक नाहीं.

मे. क्राफर्ड कमिशनर साहेब हे किरकोळ रजेवर मुंबईस गेले असून उद्या मुर्तिजापुरास जाणार असून तारीख २१ रोजीं दर्यापूरचा मुक्काम आहे.

---

### औरंगाबाद ( डेक्कन )

१६।२।१९०१

हवामान—गर्मी व थंडी यांची वारंवार फेरपाळी होत आहे. मागच्या महिन्यांतील २ इंच पावसानें रब्बीच्या पिकाला फायदा झाला.

प्लेग—दोन महिन्यांपूर्वीं बेगम पुऱ्यांत ३१४ माणसें आजारी झालीं ह्मणून सर्व पुरा खालीं केला होता आतां लोकांस परत येण्याची परवानगी मिळेल तर बरें !

बदली—अव्वल तालुकदार मिर्झा महमदअल्लीखान साहेब यांस बेदर जिल्ह्यावर बदलून येथें मौलवी सय्यद महमद बिलग्रामी यांस नेमण्यांत आलें.

औरंगाबाद सुभ्याचे सुभेदार नवाब बशीर नवाझ जंगबहादूर यांच्या घरीं नवाब इमादजंग फॉनान्स सेक्रेटरी, वऱ्हाडचे पेनशनर डेपुटी कमिशनर सय्यद शमसुद्दीन अलीखान आणि बक्षी रघुनाथ प्रसाद निजामचे हायकोर्ट जज्ज हे तिथे बडे पाहुणें होते ते हैदराबादेला परत गेले.

दत्तरा— सुभेदार साहेब गंगापूर आणि या दोन्ही दुष्काळग्रस्त तालुक्यांत फिरत आहेत.

छोटी लढाई— भिल्लांनीं मौजे चवका येथें पुंडावा मांडला आहे. आणि त्यांची टोळी सरकारी रमण्यांत जमली होती. ह्मणून क्याप्टन इलियट २८० स्वारानिशी रमण्यांची रखवाली करित होते इतक्यांत त्या पहाडांत त्यांची गांठ मीर तहनियत अल्ली खान मोहतामिमई कोतवाली यांनीं घेतली आणि भिल्लाबरोबर सामना केला. गोळीबार चालू असतांना कोतवालीच्या साहेब बहादुरांनीं जंगलांतच पांच हत्यारबंद भिल्लास कैद केलें. मोठ्या शौर्यानें भिल्लांस शासन करण्याचा यांनीं पक्का बेत केला आहे.

---


### NOTICE

It is published for general information that the assessment lists regarding the taxes on buildings and lands, and Vehicles and animals are prepared by the Committee for the year 1901 under section 55 of the Berar Municipal Law are kept at the Municipal Office open for inspection and that they may be seen there during office hours (11 A. M. to 5 P. M.).

Extract from the same will be allowed to be taken free of charge in the presence of the Head Clerk.

Persons interested are requested to see therein their personal liabilities and to put in their objections if any to the same in writing within thirty days from the date of the publication of the notice. No objections or complaints will be heard if it is submitted later than the above date.

Akola Dated 16th February 1901 } K. G. Damle Secretary Municipal Commitee Akola.

---

### जाहिरात

ह्या नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं म्युनसिपल कायद्यांतील कलम ५५ प्रमाणें कमिटीनें घरपट्टीच्या आणि गाडी व जनावरपट्टीच्या आकारणीच्या याद्या सन १९०१ साला बद्दल तयार केल्या आहेत. त्या कमेटीचे आफिसांत ऑफिसचे वेळेंत ( ११ वाजे पासून ५ वाजे पर्यंत ) पहाण्यास मिळतील व वाटल्यास त्यांतून उतारे कांहीं फी न देतां हेड क्लार्कचे समक्ष करून घेतां येतील.

सदरहू आकारणी बद्दल ज्या कोणाची तक्रार असेल त्यांनीं ह्या नोटिशीचें तारखे पासून तीस दिवसांचे आंत ती कमिटीचे आफिसांत लेखी करावी. त्या नंतर आणल्यास ऐकली जाणार नाहीं. कळावें. तारीख १६ फेब्रुवारी सन १९०१ इ०

K. G. Damle
सेक्रेटरी.
मु० कमेटी आकोलें.

---

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा सन १९०१।१९०२ सालचे हक्कांचा लीलांव तारीख १८ मार्च सन १९०१ इसवी रोजीं सकाळीं ८ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें तारीख १६।२।१९०१ इसवी.

K. G. Damle
Secretary
A. M. C.

---

### जाहिरनामा

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं श्रीशंभु महादेव शिखर सिंगणापूर तालुके माण जिल्हा सातारा येथें चैत्र मासीं दरसाल यात्रा भरत असेत ती प्लेगाचे रोगामुळें कांहीं दिवस भरली नाहीं परंतु गुदस्त सालापासून पुन्हा भरण्याची सुरवात झाली आहे त्या प्रमाणें चालू सालीं चैत्र शुद्ध ५ शके १८२३ ते चैत्र शुद्ध १५ शके मजकूर पावेतों ह्मणजे तारीख २५ मार्च सन १९०१ सोमवार पासून तारीख ३ एप्रिल सन १९०१ रोज बुधवार पावेतों दोन्ही दिवस धरून यात्रा भरणार आहे करितां ज्या लोकांस येण्याचे असेल त्यांस कोणतीहि हरकत नाहीं. फक्त प्लेग ज्या गांवीं असेल तेथील लोकांनीं न येणें चांगलें. कळावें तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १९०१ इसवी.

S. H. Tagare.
मामलेदार व मा० वर्ग २
तालुके माण जि० सातारा.


---

### वर्तमानसार

माद्रिड व इतर प्रांत यांच्यामध्यें भांडणतंटे व बंडावा फार माजला आहे आणि पुष्कळसे लोक एकत्र जमतात, दगड मारतात व गोळ्याही घालतात.

टामस्क, टौबोलस्क, ट्रान्स-बैकल व रशियाच्या दक्षिणेंतील इतर प्रांत यामध्यें पीकें बुडालीं व दुष्काळ पडला आहे. रशियानें ९० लक्ष रुबल दुष्काळग्रस्तांस मदत देण्यासाठीं काढले आहेत !

प्लेगाचा उद्भव केपटाऊन येथें झाला आहे. काफीर लोक एका निराळ्या जागेंत ठेवून उंदीरांचा उपद्रव फार झाला आहे. ह्मणून लष्करी सामानसुमान, छावणी वगैरे जाळून टाकण्यांत येत आहेत.

परिक्षा— मुंबई हायकोर्ट प्लीडर, सबार्डिनेट जज्ज व डि० प्लीडर या परीक्षा येत्या तारीख १७ जूनला कायम करण्यांत आली आहे.

अद्भुत भूचक्र— लंडन आणि ब्रेमन या गांवीं अतिशय मोठा दिवस १६ तासांचा असतो; स्टाकहोम आणि दांझिक या गांवीं अति मोठा दिवस ह्मणजे सतरा तासांचा व अति लहान ह्मणजे सात तासांचा असतो. तोबोलस्क व सेंटपिटर्सबर्ग येथें मोठा दिवस ह्मणजे १९ तासांचा आणि लहान ह्मणजे फक्त ५ च तासांचा असतो. टोरानिया ( फिनलंड बेटांत ) मोठा दिवस २२ तासांचा आणि अगदीं लहान दिवस अवघ्या २ च तासांचा असतो. नार्वे देशांत वार्डनिज नामक गांवीं मे महिन्याच्या २१ वे तारखे पासून तों जुलैच्या २५ व्या तारखे पर्यंत एक सारखा दिवसच असतो.

सध्यां आपल्या मुंबई इलाख्यांत ५०००० मुलें इंग्रजी शिकत आहेत. २४००० मुलें प्राचीन भाषा शिकत आहेत आणि ५२५००० मुलें देशी भाषा शिकत आहेत. असें शाळा खात्याच्या रिपोर्टा वरून समजतें.

सरहद्दीवर तंटा— हिंदुस्थानच्या सरहद्दीवर केटा आणि कुरमव्हाली यांच्यामध्यें काबुलच्या अमिराचे १०० लोकांनीं हद्द निशाण्या उपटून टाकून इंग्रजी हद्दींतील एक गांव बळकाविला व तंट्यास कारण उपस्थित केलें आहे. एक एक होईल तेवढें थोडें.

वे. रा. शंकरभट बिन विष्णुभट गोखले अग्निहोत्री यांनीं वाई येथें अग्निष्टोम क्रतु करण्याचें योजिलें आहे. माघ वद्य १४ स दीक्षा होणार असून अवभृतस्नानाचा दिवस फाल्गुन शुद्ध ५ हा आहे. गेल्या २५।२७ वर्षांत ह्या क्षेत्रीं यज्ञ झाला नाहीं. ज्ञा. च.

पर्शिया व हिंदुस्थान यांच्या दरम्यान केटा सिस्टन रस्त्यानें व्यापार सुरू करण्याच्या इरादानें मि. हनीखान नांवाचा एक पर्शियन गृहस्थ सिस्टन येथील इंग्रज सरकारच्या राजकीय वकिलीचें शिफारसपत्र घेऊन नुकताच कानपुरास आला आहे. इकडे व्यापाराचे जिन्नस काय काय होतात त्यांची पाहणी करून त्यांतले पर्शियांत कोणते खपण्यासारखें आहेत याची निवड करावयाची आणि ते जिन्नस इकडून तिकडे न्यावयाचें आणि तिकडचे जिन्नस इकडे आणून विकावयाचे, आणि अशा रीतीनें उभय देशांतला व्यापार वाढवावयाचा असें करण्याचा त्यांचा इरादा आहे.

विलायत सरकाराकडे दया करण्याचा वगैरे अर्ज करावयाचा असल्यास तो जाईल, पण फाशीच्या शिक्षेवर अपील ह्मणून जावयाचें असल्यास तें पाठविणे किंवा नाहीं हें सरकारच्या मर्जीवर राहील असें ठरलें आहे.

आपल्या नव्या बादशहांचे बंधु ड्युक आफ कनाट हे हिंदुस्थानचे कमांडर इनचीफ होऊन येणार आहेत. बोर प्रकरणावर असलेले लार्ड किचनर हे इतक्यांत तिकडून मोकळे होण्याचा संभव नसल्यामुळें ही व्यवस्था होत आहे. हे ड्युक साहेब मागें मुंबईचे कमांडर इनचीफ होतेच. नेटिवांकरतां मिलिटरी कालेज सुरू करावें असें यांणींच आपलें मत दिलेलें आहे.

आमची फौज मोठ्या जोरानें शत्रुचा पाठलाग करून त्यास हाकून काढण्याच्या मार्गे लागली आहे, आणि लार्ड किचनरही स्वतंत्रपणें त्याच कामाच्या मागें लागले आहेत. वेगळाल्या वाटांनीं बोर लोकांच्या लहान लहान टोळ्या केपहद्दींत शिरत आहेत. त्यांपैकीं मिडलवर्गच्या उत्तरेच्या अंगानें पुढें सरून कालव्हिना येथें हर्टझोगच्या फौजेस मिळण्याच्या बेतांत आहेत लिस्ली हा एका मजबुत फौजेसह फालविणाच्या जवळ आहे. मध्यभागांत असलेले बोर सरदार कडक लढाया देण्याचें टाळीत आहेत. ठा० अ०

रशिया आणि तुर्कस्थान येथें प्लेग उद्भवला आहे. रशिया देशांत आस्त्राखान प्रांतांत प्लेग आहे. तुर्कस्थानांत कानस्टानटिनोपल आणि मिसर्ना येथे प्लेग आहे. कानस्टाटिनोपल हें शहर फार गलिच्छ आहे.

फ्रान्स देशांत एक नवीन कायदा झाला आहे. त्या कायद्याअन्वयें दोन स्त्रिया वकील झाल्या आहेत. मारिस कोर्टांत त्या वकिली करतात. युनाइटेडस्टेटमध्ये फार दिवसांपासून स्त्रिया वकीलीचा धंदा करितात. परंतु इंग्लंडांत स्त्रियांस हा धंदा करण्याची अद्याप परवानगी नाहीं.

---


## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारांची ट. ह. सह ०।४ ची मनिआडर पोंच. तांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय कृत



### अचुक गुणकारी औषधें.

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधाच्या योग्यतेबद्दल व गुणांबद्दल सर्टिफिकेट ( दाखला ) मिळाले आहे. ज्वरांकुश— ( तापावर रामबाण ) तीन दिवसांत हटकून हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. किं. रु. ट. व बंगी खर्च १०।

पूपरम्यावर वस्ताद—तीन दिवसांत हटकून गुण किं. रु. १ ट. व बं. खर्च ॥-

जुलाब, पोटदुखी व कॉलरा ( पटकी ) बंद करण्याचें वस्ताद औषध. प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें किंमत ०।२ ट. व बंगी खर्च ।=

शक्तीवरील गोळ्या—नंबर १ बलवर्धक शक्तिवर्धक पौष्टिक इ विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३ ट. बं. खर्च ।-

सारसोडाइन—देशी सारसापरेला, उपदंश, गर्मीचे चट्टे इ. उत्तम किं. रु. १ ट. व बंगी खर्च ६ आणे.

शक्तीवर गोळ्या— नंबर २ धातुपातावर सुस्तीवर, पानथरीवर, मुलाचे डब्यावर, अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट. व बंगी तीन बाटल्यापर्यंत खर्च ।-

केंस काळेभोर करण्याचा कल्प—किं. रु. १। ट. व. बं. खर्च ॥-

रक्तपितीवर रामबाण—किं. रु. ६ ट. व बंगी खर्च १०-

खोकल्यावर गोळ्या—१०० गोळ्यास किं. ०।२ ट. व बं. दोन बाटल्यापर्यंत खर्च ।-

गमकर्ण अथवा खरजेवर मलम—किं. प्रत्येक डबीस ०६ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।-

नेत्र संजीवनी थेंब—किं० रु १ ट. व बं. खर्च ।=

मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम —किं. रु २ ट. व बं. खर्च ।-

वायुनाशक तेल—किं. ०४ ट. व बं खर्च ।=

खोकल्यावर व दम्यावर सरबत—फारच गुणकारी किं. रु. १ ट. व बं खर्च ।=

बालसंजीवन—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ०।२. ३ बा. ट. व बंगी खर्च ॥।-

कर्णरोगावर थेंब—किं ०।२ ट. व बंगी खर्च ।=

दांतांचें मंजन—किं. ०४ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।-

केशवर्धक तेल—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ॥-

जुलाबाच्या गोळ्या—किं. ०६ ट. व बं. खर्च तीन बाटल्यापर्यंत ।-

अन्नपाचक गोळ्या—१०० गो. किं. रु. १। ट. व बं. खर्च ।-

मुलांचे ताप्यावर—( आंकडीवर ) रामबाण किं. रु ३ व रु. ट. व बं. खर्च ।=

मुद्दाम उन्हाळ्याकरितां थंडगार, हुषारी आणणारी, ऊत येणारी सरबताची भुकटी किं. रु. १ ट. व बंगी ॥।-

केंस जाण्याचें औषध—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ।- हें पाण्यांत भिजवून लेप करून खवडल्यास केंस तत्काळ निघून जातात

### पंढरीनाथ गोपिनाथकृत स्वदेशीय सार्सापरिला मिश्रित रक्तशुद्ध करणाऱ्या व वाढविणाऱ्या

ट. व बं. ख. ।- **गोळ्या.** किं. १ रु.

घाऊक औषध घेणारांस कमिशन देण्यांत येईल. रेल्वेजवळ राहणारांनीं औषधें रेल्वेनें मागवावीं. कारण रेल्वे हांशील स्वस्त पडतें. विस्तृत सचित्र जाहिराती व क्याटलाग मागवा. ह्याशिवाय पाहिजे त्या रोगावर वयाचें व प्रकृतीचें मान सविस्तर कळविल्यास औषधें पाठविण्यांत येतील.

## वैद्य--गोपिनाथ कृष्णाजी क्षात्रिय.

## एजंट पाहिजेत.

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत. मुंबई.


---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as

ॐनमः श्रीगणेशाय.

**सुगंधी अत्तरांची पेटी बक्षीस !**

# आर्यवनौषधालय मुर्डी.

**सुगंधी अत्तरांची पेटी बक्षीस ! !**

या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एकदोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊं. व त्याशिवाय त्याच्या आरोग्यार्थ आणखी एकादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट स्वखर्चानें देऊं. ह्मणजे रोग्यास पूर्णपणें बरा करूं.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य, मु० मुर्डी, पो० हर्णै, जि० रत्नांगिरी, यांचीं जगत्प्रसिद्ध व डा० विश्राम रामजी घोले यांनीं सर्टिफिकीट दिलेलीं, शुद्ध वनस्पतींचीं अनुभविक व लोकमान्य औषधें.**

8

## आर्यबंधूंस सविनय प्रार्थना.

हल्लीं आर्यभूकडे नुसती दृष्टि फेंकल्यानें आर्यभूचि किती कनिष्ठ स्थिति आहे याचें चित्र मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभें राहतें. हल्लीं कलियुग आहे, त्याप्रमाणें सर्व व्यवहार सुरूं आहेतच. व त्यांत आंग्लभाषेचें ज्ञान आर्यभूंत विशेष चमकूं लागल्यामुळें तर त्याचे व्यापार फारच झपाट्यानें चालूं लागले आहेत. ही स्थिति अंशतः तरी कमी होऊन आर्यभूचा उद्धार व्हावा एतदर्थ कित्येक स्वधर्माभिमानी आर्यमातेची सेवा करीत आहेत, ही तर मोठ्या संतोषाचीच गोष्ट आहे. परंतु अशा नरपुंगवांना जसें यश येण्यास पाहिजे आहे तसें अद्याप आलेलें नाहीं. कारण आपल्या आर्यबंधूंनीं आपले आचारविचार सर्व सोडून दिल्यामुळें आपल्या आर्यभूमीची दैना होत आहे, व स्वदेशी कारखाने बुडून परकीय व्यापारास तेजी आली आणि लोकांची निरंतर परकीय वस्तु घेण्याकडे जास्त जास्त प्रवृत्ति होऊन घरोघर नकली वस्तु दृग्गोचर होऊं लागल्या. “ नांव सोनुबाई आणि हातांत कथलाचा वाळा ” या ह्मणीप्रमाणें आपली सर्वतोपरी स्थिति झाली. आपल्या आर्यवैद्यकाची लाचार स्थिति झाली आहे. हल्लीं जिकडे पहावें तिकडे पाश्चात्य औषधांचा उद्धार झालेला दिसतो. परंतु कोणी असा विचार करीत नाहीं कीं देशी औषधें कौडीमोलाचीं ठरलीं आहेत कीं काय, नाहीं. देशी औषधांसारखीं हटकून गुण देणारीं खरीं औषधें अन्यत्र फारच थोडीं दृग्गोचर होऊं शकतील; परंतु सद्यःस्थितींत आर्यबंधूंस देशी वैद्यक ह्मणजे नावडती सून झाली आहे. त्यामुळें तिनें जरीही उत्तम कामगिरी बजावली तरी नाव तीचें मीठ अळणींच असावयाचें. तरी देशी वैद्यकावर प्रेमकटाक्षानें पहा बरें, ह्मणजे तेंच आपणांस आपल्या तेजोबळानें खात्रीनेंच दिपवून टाकील, यांत शंका नाहीं. कारण देशी औषधें अत्यंत गुणकारक आहेत, व या औषधांत अशी एक यजा आहे कीं एकदां बरा झालेला रोग पुनः पुनः उलटत नाहीं, ही तर त्यांत विशेष मजा आहे. या तत्त्वास अनुसरून आह्मीं कायावाचामनेंकरून आजपर्यंत आर्यवैद्यकाची सेवा यथाशक्ती केली आहे. व आजन्म तशीच करीत राहून होतां होईपर्यंत आर्यवैद्यकांची थोरवी स्थापित करूं अशी आह्मांस पूर्ण उमेद असल्यामुळें अशा कृत्यास कितीही विघ्नें आलीं तरी त्यांस पाठ देऊन आर्यवैद्यकाची सेवा रात्रंदिवस करून आर्यवैद्यकाची श्रेष्ठता सर्वत्र स्थापिक करूं, अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे. व त्याप्रचमाणें आमचा यत्नही सुरूं आहे. आणि श्रीमंगलमूर्तीच्या अमूल्य प्रसादानें झपाट्यानें यशाही येत आहे हें मोठें आनंदकारक तर आहेच; परंतु कित्येक परोत्कर्षासहिष्णु मंडळींनीं चालकास लघुत्व आणण्याची वाईट लालसा धरून तद्वत् वर्तन करीत असल्यामुळें अश्रद्धा मात्र उत्पन्न केली आहे. परंतु कुमार्गाचें अवलंबन करणाराचे हेतु सफल होतील काय ? कुमार्गाचें फळ कडूच हें तर ठरलेलेंच आहे. परंतु अशा परोत्कर्षासहिष्णु मंडळींचीं तोंडें बंद करण्याच्या साधनाचें अवलंबन तर आह्मांस केलेंच पाहिजे. कारण तसें जर न करावें तर आर्यवैद्यकाची थोरवी वाढण्यास फारच अडथळा आहे.

आमचीं औषधें किती खात्रीचीं आहेत याची सत्यता दाखविण्याकरितां या जाहिरातींत शेवटीं कांहीं सर्टिफिकिटांचे उतारे दिले आहेत ते अवश्य पहावे. ह्मणजे भोंदू मंडळीचीं नकली औषधें मिळणार नाहींत, हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमचीं औषधें अत्यंत गुणकारक ठरल्यामुळें त्यांचा खपही हल्लीं हिंदुस्थान ब्रह्मदेश लंका इत्यादि भागीं जारीनें सुरू आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे, व असें होणें साहजिकच आहे; कारण उपयुक्त रामबाण औषधें घेण्यास ग्राहक तत्पर असावयाचेच. दिवसेंदिवस आर्यबंधूंस होणारी संतति बलहीन निपजूं लागली आहे. ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. संतती निरोगी होण्याविषयीं प्रथम काळजी घेतली पाहिजे. संतती निरोगी व सशक्त बनण्याकरितां पेंडसे यांच्या मदनामृत संजीवनी गोळ्यांचा उपयोग करा.

## मदनामृतसंजीवनी.

**धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, पौष्टिक, वीर्यस्तभंक, रक्तशोधक, कांतिबुद्धिवर्धक सुवर्णमाक्षीक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्‌भुत गुटिका**

या गुटिकांत अत्यंत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, शिथिलता, कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हात, पाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल. मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, दुष्ट व घातक संवयीनें आलेली कृशता इ. अनेक विकार खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्यसेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्या वर कितीही घेणारांस टपालखर्च माफ.

दर:—एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रुपये, ११५ गो० ३ रु०; १६० गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १० रु

या गुटिका प्रत्येकानें वर्षांतून निदान एक महिना तरी सेवन कराव्या ह्मणजे संतति निरुपद्रव वरील विकार नाहींसें होतील.

### २ पेंडसे यांचें पौष्टिक खाद्य.

**मदनसंजीविनी अद्‌भुत पाक.**

वरील गोळ्यांनीं जे विकार जातात ते सर्व या पाकाचे सेवनानें जातात. वरील विकारावर हें एक स्वतंत्र औषध आहे, तथापि फार जोरदार आणि जुनाट विकार असतील तर त्यांनीं हा पाक वरील गोळ्यांसोबत अवश्य सेवन करावा ह्मणजे वरील सर्व विकार त्वरित जाऊन त्वरित शक्ति येईल. पाक २ रुपयांचे आंत मिळणार नाहीं. दर—४० तोळे पाकास २ रुपये, ८० तोळ्यांस ४ रुपये.

### ३ पेंडसे यांचें मदनसंजीवनी तैल.

हें तैल अनेक वनस्पतींपासून तयार केलें असून यापासून कोणतीही इजा अगदीं न होतां खालील रोगांवर याचा अप्रतिम उपयोग होतो. अति विषयोपभोग, मादक किंवा विदाही पदार्थांचें भक्षण, उपदंशजन्य पीडा, अति जागरण, मानसिक श्रम, अति व्यायाम, कडकी, अति शोक, भयाचा जबरदस्त धक्का बसणें, व वीर्यवेगनिरोध, इ० कारणांनीं वीर्यवाहक शिरांत वातसंचय झाल्यामुळें इंद्रियशिथिलता, नपुंसकत्व, दुर्बलता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुस्राव इ० अनेक गुप्त विकार होतात. ते सर्व या अप्रतिम तैलाच्या मर्दनापासून खात्रीनें बरे होऊन कामी पुरुषांस धातुपुष्टि, वीर्यस्तंभन, कामोद्दीपन चित्तोत्साह. इ० अमूल्य गुण भरपूर व त्वरित प्राप्त होतात. वरील विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असोत, ते सर्व या अप्रतिम तैलमर्दनरूपी बाह्योपायानेंच पथ्यसेवनाची खटपट नसतां तावडतोब बरे होतात. १। भार तैलाची कुपी १ रु०. २॥ भार २ रु०.

सूचना.—हें तैल आणि नंबर १ च्या गुटिका हीं दोन त्या त्या रोगांवर निरनिराळीं स्वतंत्र औषधें आहेत, तथापि या दोन्ही औषधांचा एकदम उपयोग करणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

### ४ उपदंशावरील गोळ्या.

गर्मीसंबंधीं चट्टे, पर्मा, गांधी इ० सर्व विकार व त्याचप्रमाणें नेत्रस्राव, दाह, मूत्रस्थानची तिडीक, सूज, व्रण इ० सर्व विकार तोंड न येतां १०।१२ दिवसांत खात्रीनें दूर होतात. २४ गो० ड० १ रु०. ५० गो. २ रु.

### ५ परम्यावरील सुगंधि तैल घ्या.

कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेला नवीन, अत्यंत जुनाट व जोरदार पर्मा, पथ्यसेवनाची खटपट नसतां व कोणतीही इजा बिलकुल न होतां तत्संबंधी दाह, तिडीक, अंतर्व्रण, मूत्राची लाली, उन्हाळे, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक इ० विकारांसह रक्तमिश्र, पूयमिश्र, पिवळा किंवा श्वेत असला तरी अगदीं थोड्या दिवसांत खात्रीनें बरा होऊन प्रकृति उत्तम होते. हें तैल सुरू केल्याबरोबर बराच गुण समजून येतो आणि थोड्याच दिवसांत कायमचें आरोग्य होऊन रक्तवृद्धि, धातुवृद्धि व पुष्टता प्राप्त होते. या तैलानें साधारण विकार तर सहजच; परंतु हाडीं खिळलेले पर्मा इ० असाध्य रोगसुद्धां प्रतिज्ञेनें बरे होतात. यानें पर्मा बरा झाला नाहीं असें एकही उदाहरण सांपडणार नाहीं. वरील रोगांवर बरींच औषधें घेऊन गुण नसल्यामुळें आपल्या आरोग्याविषयीं जे निराश असतील त्यांनीं या अपूर्व औषधाचा अजब चमत्कार पाहून आपली पक्की खात्री करून घ्यावी. वरील दुर्धर रोगांवर अत्यंत प्रतिज्ञेचें औषध हेंच होय, हें सतत २० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. १। भार तैलाची बाटली २ रुपये. ३ भार ४ रुपये.

### ६ सर्वप्रकारचे तापावर जालीम द०

यानें कोणत्याही प्रकारचा ताप कसाही असला तरी खात्रीनें जातो. हिंव ( थंडी ) लागून येणारे चातुर्थिक, त्र्याहिक, द्व्याहिक, एक दिवसाआड व रोज येणारा ज्वर [ ताप ] यांवर हें औषध रामबाण आहे. या औषधानें कडकी न होतां ताप हटकून बरा होतो. या औषधासारखें प्रतिज्ञेचें दुसरें औषध दुर्मिळच यांत शंका नाहीं. अनुभवानें सत्यता समजेल, सबब जास्त वर्णन करीत नाहीं. १२ पुड्यांस १ रु०

### ७ मूळव्याधीवरचें वस्ताद औषध.

मूळव्याधी [ अर्शोविकार ] या रोगासंबंधीं रक्तस्राव, मोड, मस्तकशूल, मलावरोध, छातींतील वेदना, ग्लानि, अशक्तता व दाह इ० विकार आठ दहा दिवसांत खात्रीनें बरे होतात. फार जोरदार जुनाट विकारही दोन तीन डब्यांनीं बरे होतात. ड. किं. १ रु. व मोडावर लावण्याचें सौम्य मलम ड. ८ आ दोहों मिळून १॥ रु०. दोन्ही औषध एकदम उपयोग करावा लागतो. मोड नसून फक्त रक्तस्रावादि विकारच असतील तर मलमाची गरज नाहीं. वरील विकारांवर औषधें पूर्ण खात्रीचीं आहेत.

### ८ पेंडसे याच्या कफनाशक गोळ्या

लहान मुलांस कफ दाटून श्वास लाग[illegible] दूध किंवा अन्न खात नाहींतशीं होतात. त्या योगानें तीं अगदीं हैराण होतात, थुंकतां येत नाहीं, खोकला येतो व अशा[illegible] गांस डबा असेंही ह्मणतात. अशावेळीं गोळी दिल्यास दोन तासांत मलद्वारा पडून लागलेंच मूल सावध होतें. या[illegible] १।२ वेळां गोळीचा उपयोग केला ह[illegible] कफाची विकृति साफ नाहींशी होते तसेंच[illegible] ठ्या मनुष्यांसही वायगमनावर कफावर[illegible] गोळ्यांचा फारच उपयोग होतो. मु[illegible] डबा बरा करण्याच्या कामीं या गोळ्या [illegible] गदीं रामबाणच आहेत. ३० गो० ड० १ रु० या गोळ्या नेहमीं संग्रहीं ठेवणें [illegible]त हितावह आहे.

### ९ बाळसंजीवनामृत.

लहान मुलांस संग्रहणी, डांग्याखोकल[illegible] नानाप्रकारचे विकार जडून त्यापासून मुलें [illegible] हमीं अशक्त आणि किरकिरीं होतात त[illegible] सर्व विकार नाहींसे होऊन मुलें निरोगी [illegible]ण्यास यासारखें दुसरें औषधच नाहीं. बा. किं. १॥ रु.

### १० गजकर्ण

खरूज, खवडे, नायटे, किडवळ, अ[illegible] इ० विकार दोन दिवसांत प्रतिज्ञेनें ज[illegible] पुन्हां होत नाहींत, औषध चुरचुरत नाहीं तोळे पूड ६ आणे.

[illegible] जात्या यो[illegible] [illegible]वर्धक पूड

योग्यतेचीं [illegible] चोळल्यानें दंतसंबंधीं पू[illegible] स्नायुव[illegible], मुखाची दुर्गंधि इ० विकार [illegible] करून दंत स्वच्छ व मजबूद कर[illegible] नित्य लाविल्यास दंतसंबंधीं कोणताही वि[illegible] [illegible]चा नाहीं. हिरड्या ( दाढा ) [illegible] [illegible]च्या नाहींत, अशी पूर्ण खात्री आहे. किं० ६ आणे.

### १२. विंचवाचें विष.

हें औषध लावितांच विंचवाचें विष प्रथ[illegible]नें उतरतें. इतकें रामबाण औषध दु[illegible] आहे. एक डबी ५० मनुष्यांस पुरते. किं. ८८ आणे.

### १३. खोकला.

क्षयासरीज असलेला कितीही जो[illegible] असला तरी ४।५ दिवसांत बरा होतोच. [illegible]चा खोकला मात्र १४ दिवसांत बरा [illegible] या विकारावर या गोळ्या कधींच मागें ह[illegible] नाहींत, असें १२ वर्षांच्या अनुभवानें [illegible] २० गो० ड० रु० १

**४. वातरक्त रक्तपिती (महाव्याधी)** विसर्प, सुनबेरी, कुष्ठ, यांपैकीं कोणताही … अथवा रक्तविकार असाध्य झाला नसेल … या गोळ्या व मलम यांनीं एक महिन्यांत … होतो. असाध्य रोगही साध्य होतात. व… रोगासंबंधीं सर्व विकार थोडेच दिवसांत … तात. ३० गो.३ रु. मलम ड. १ रु.

**१५. वृषणवृद्धि—[ अंतर्गळ ]** … विकार होण्यास बरींच कारणें आहेत. …ही विशेषेंकरून मलाश्रित वायु हें जोर… कारण आहे. काष्ठप्रहार, मुष्टिप्रहार, अस्थित पतन इ० कारणेंही यास आहेत. … कारणांनीं वृषणाचा एक किंवा … भाग मोठें होऊन ठणका, सूज, …रता इ० विकार होतात. हे सर्व रोग …च्या गोळ्या व मलम यांनीं १०-१२ … सांत खात्रीनें बरे होतात. अति जुनाट व …ही जोरदार असलेले रोग ४० दिवसांचे … कायम बरे होतात. मलम ४८ व २४ … डबीस १॥ रुपया दोन्ही मिळून किंमत२ रु. दोन्ही मिळून एकदम उपयोग करावा …गतो.

**१६ मधुमेहनाशक अप्रतिम गुटिका.** मधुमेह व तत्संबंधीं अशक्तता, जीर्णज्वर, …, वारंवार मूत्रस्राव, ग्लानि, अग्निमांद्य, … पातळपणा, कामेच्छा अल्प असणें … अगदीं नसणें, तृषा, इ० सर्व विकार …त जोरदार किंवा कितीही जुनाट असले …पि दोनपासून फार तर २॥ महिन्यांचे आंत … गोळ्यांनीं निखालस बरे होऊन रोगी श…न् होतो, आणि रक्तवृद्धि, धातुवृद्धि इ. …थ गुण प्राप्त होतात मधुमेहावर खात्रीचें …ध नाहीं असें ह्मणणारे लोक आहेत, त्यां…या गोळ्यांचा अनुभव पहावा, असें आह्मी … म्हणतों. मधुमेहाशिवायचे धातुविकारही … गोळ्यांनीं बरे होतात. ६० गो. ड. ४ रु.

**१७ अपूर्व नेत्रांजन.** … अप्रतिम अंजन हजारों लोकांच्या अनु… फारच अप्रतिम ठरलें आहे. यापासून …यांचे साधारण विकार सहजच, परंतु ह… समूळ नाश करणारे तिमिरांध्य, बडस फुलें, कांच, साहरा, मोर, गळती इ०, …ठे जोरदार व जुनाट रोग, तसेंच तत्सं… मस्तकशूल, नेत्रदाह, खुपऱ्या इ. अनेक … कितीही वयाचे मनुष्यास कोणत्याही …गानें प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट अ…तरी इजा न होतां … बरे होऊन …व नष्ट होतें, … ताच … गोवाय जाग्रणानें, उन्हा… नांव नोंदलें … पानें उपदंशविकारानें, अति… वर्ष… इ० अनेक कारणांनीं डोळे बिघ… ांस याचा मोठा उपयोग आहे. हें चांगल्या …च्या मनुष्यांनीही डोळ्यांत घा… व… विकार बिलकूल होणार नाहींत. … स तर अत्यंत उपयोग आहे. ड. किं… ॥ तो. अंजन.

## १८ मगजशुद्धि.

**काषशीचे तेलाचा अप्रतिम वर्फ.** …यानें थोड्याच काळांत हजारों लोकांस अ…म उपयोग झाला व होत आहे. हा शेंकडों …ती, बदाम वगैरे पदार्थांनीं बनविला आहे. …तिनें, जाग्रणानें, उन्हांतून फिरल्यानें, अ…सानें, अति वाचनानें, अग्नितापानें मस्तकां… मेंदू तापतो, शीण होतो, चक्कर येते, व झाल्यानें नेत्रविकार, मस्तकशूल, इत्यादि …ध रोग जडतात; तरी या वर्फाच्या मर्दनानें त्वरित शमतात. पांढरे झालेले केंस काळेभोर होऊन वाढतात. एक डबी २ महिने पुरते. सुवासिक असून चिकट पडत नाहीं. ड० किं १रु०

**१९. हेमधात्री तेल.** हें सुगंधी तेल अनेक वनस्पतींच्या अर्कांनीं तयार केलें आहे. हें मस्तक, डोळे, तळहात, तळपाय यांस लाविल्यानें त्या ठिकाणचा दाह, ठणका, बधिरता, रुक्षता इ० रोग जाऊन पित्तानें, अपस्मारानें, जाग्रणानें येणारी चक्कर अंधेरी जाऊन उत्तम प्रकारें शांतता येते. उन्माद रोगास आराम पडतो. कपाळ दुखणें बंद होऊन अर्धशिशी बरी होते, सर्व कानचे मस्तकरोग व नेत्ररोग जाऊन मन आनंदमय होतें. अनेक लोकांस रात्रीं काम केल्यानें व जाग्रणानें त्रास होऊन मन उद्विग्न होतें, तरी अशा लोकांनीं याचा सदोदित उपयोग केल्यास त्यांचे श्रम परिहार होऊन पुनः काम करण्यास हुशारी येते. मेंदूची शुद्धि व वृद्धि होते. उत्तम निद्रा येते. तसेंच हें रोज अंगास लावून स्नान केल्यास अंग दुर्गंधरहित होऊन खरूज, गजकर्ण इ० विकार कधींहि जडत नाहींत. तसेंच स्त्रियांनीं रोज याचा उपयोग केल्यास केंस वाढून अकालीं पांढरे केंस होत नाहींत व टकलहि पडत नाहीं. अशा या अपूर्व तेलाचा अजब चमत्कार पाहून आपली पक्की खात्री करून घ्यावी. बा. किं. १॥ रु.

**२० दम्यावरील गोळ्या.**—दमा (श्वासव्याधि) या रोगाचे भेद पुष्कळच आहेत; व या रोगापासून मनुष्यास फारच त्रास भोगावा लागतो. आणि हा हाडीं खिळून बसल्यास अग्निमांद्य, अरुचि, ज्वर, अशक्तता, बरगड्या दुखणें, उरांत बांध बसणें, वारंवार कफस्राव होणें इ० अनेक होतात. आणि रोगी फार फार कासावीस होऊन कधीं कधीं भाषण करण्यासही असमर्थ होऊन श्वासाच्या झपाट्यानें फारच व्याकुळ होतो. तसेंच मलावरोध, निद्रानाश इ० अनेक लक्षणें होतात. तरी या रोगापासून तावडतोब मुक्तता करून घेणें असल्यास दमेकऱ्यांनीं हिंमत न सोडतां या गोळ्यांचें सेवन करावें, ह्मणजे आठ दहा दिवसांचे आंतच सर्व विकारांस बिनचूक गुण येतो. २० गो. ड. किं. १ रु.

**२१ कॉलेरा (पटकी).**—हा विकार धामीचा आहे, व तो केव्हां होईल याचाही नेम नसतो. याकरितां या गोळ्यांचा संग्रह सदोदित जवळ असला पाहिजे. कारण औषध संग्रहीं नसेल तर मरण येतें. कारण पटकी हा विकार तीन तासांचा असतो, असा सर्वत्रांचा अनुभव आहे. तरी ही पटकी हटकून बरी करण्याविषयीं आमच्या गोळ्या केवळ रामबाण आहेत. रोगी कसाही बेजार असो, या गोळ्यांचा उपयोग करितांच रोगी खात्रीनें उतरतो, असा सर्वत्र अनुभव आहे. तरी या गोळ्यांचा प्रत्येकानें अवश्य संग्रह करावा. २० गो. ड. किं. २ रु.

**२२ वज्रदंती मलम.**—या मलमानें अनेक प्रकारच्या जखमा, खरूज, कंडू वगैरे विकार तावडतोब नाहींसे होतात. तसेंच स्त्रियांचे स्तनास व्रणरोग रोग होत असतो, त्यास देशपरत्वें अनेक नांवें आहेत. तो विकार या मलमानें इजा न होतां तावडतोब बरा होतो. मलम ड. किं. १ रु.

**२३ वातनाशक गोळ्या व तेल.**—वातविकारानें या देशांत पुष्कळच बेजार आहेत. तरी आमच्या गोळ्या व तेल यांनीं सर्व प्रकारचे वातविकार, अंगास कळा येऊन अंग दुखणें आमवात, शिरागत, संधिवात, अर्धांगवायु, इ. विकार फार जलद बरे होतात. ३० गो. ड. किं. ३ रु. व ८ तोळे तेल बा० ३ रु.

**२४ कर्णव्रणनाशक अपूर्व तेल.**—हें उत्तम तेल कानांत घातल्यानें पू, रक्त व पाणी वाहणें, ठणका, सूज, कंडू, दाह, कोणत्याही प्रकारचे कानांतील व्रण, वेदना इ० विकार कितीही वयाचे मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले असाध्य व्रण इजा न होतां फारच जलद बरे होऊन बधिरता नाहींशी होते. १। भार तेलाची बाटली किं. १२ आणे. प्या. ख. २ आणे.

**२५ स्त्रियांची धुपणी.**—(तांबडी व पांढरी मिश्र) व तत्संबंधीं अशक्तता, पांडुरता व कृशता इ. विकार असाध्य असले तरी खात्रीनें व जलद बरे होऊन शरीर मजबूत व सतेज बनतें. अनुभवानें पूर्ण खात्री होईलच. २० गो. ड. किं. १ रु.

## २६ स्त्रियांचा बाळंतरोग नाशक, पेंडसे यांचें, नारळाचे पोईंतील रामबाण औषध.

या रोगानें हजारों स्त्रिया औषध असून केवळ हयगयीनें मृत्युमुखांत पडत आहेत. या रोगावर वरील गोळ्या खरोखरच प्रतिज्ञेच्या आहेत. रोग कितीही जुनाट व जोरदार असला तरी तज्जन्य विकारांसह तावडतोब बरा होऊन शरीर निरोगी व मजबूत होते क्षयादि जोरदार रोगही यानें त्वरित बरे होतात. ३० गो० ड० किं० ४ रु० रोग सात दिवसांत हटकून नाहींसा होतो.

**२७ मलशुद्धीचें अप्रतिम चूर्ण.**—या चूर्णाच्या सेवनानें पहिल्या दिवसापासूनच मलशुद्धि होऊं लागते. बद्धकोष्ठता, अजीर्ण, मोडशी, अरुचि, अग्निमांद्य वगैरे कोष्ठसंबंधी सर्व विकार त्वरित जाऊन भरपूर अन्न पचूं लागतें. संग्रहणी बरी होते. विशेष ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ही कीं, याच्या सेवनानें कोठा साफ होऊन कोठा साफ नसल्यानें जे दुःसाध्य विकार होतात ते कधींही प्राप्त होत नाहींत, असा अमूल्य गुण आहे. ९ तो. चूर्ण किं. १ रु

## आर्यवनौषधिसंग्रह
### (प्रवासी पेट्या)

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून आह्मी औषधांच्या पेट्या बनविल्या आहेत. कित्येक प्रसंगीं अकस्मात रोगोत्पत्ति होते. व त्याचें शमन होण्यास थोडेंच औषध बस्स होतें. परंतु कित्येक प्रसंगीं तसें औषधही मिळत नाहीं. हा प्रसंग तर प्रवासांत फारच येतो. ही शोचनीय स्थिति दूर व्हावी ह्मणून, आह्मीं उपयुक्त औषधांच्या पेट्या तयार केल्या आहेत. या पेट्या उत्तम सागाच्या मजबूत बनविल्या असून त्यांत निरनिराळ्या सर्व रोगांवर २९ औषधें असून एक सुवासिक अत्तर असतें. मिळोन पेटींत २६ नग असतात. नेहमीं उपयोगांत येणारीं औषधें पेटींत असल्यामुळें पेटी फारच उपयोगी ठरली आहे. इतकें असून पेटीची किंमत अवघी पांच रुपये आहे. व टपालखर्च १२ आणे. तरी या पेटीचा अवश्य संग्रह करावा, ह्मणजे वेळीवेळीं वैद्याची गरज लागणार नाहीं. पेटींतील औषधें गुणकारक असल्याबद्दल खालीं सर्टिफिकिटें दिलीं आहेत तीं पहावीं, ह्मणजे खात्री पटेल.

प्रवासी पेटी घेणारास ही एक सुगंधी अत्तराची पेटी बक्षीस देऊं. हल्लीं सर्वत्र प्लेग सुरू असल्यामुळें हवा शुद्ध होण्यास या पेटीचा मोठा उपयोग आहे. हें अवश्य लक्षांत असावें

## उत्तम सुगंधी अत्तरांची पेटी.

पेटी उत्तम सागाची बनविली असून तीस उत्तम वारनीस केलें असल्यामुळें फारच मोहक झाली आहे. तीत उत्तम अत्तरें ३ प्रकारचीं कुप्या ३ बेलिया २ तो. गंधाचे रव, लालबुंद कुंकू, सुगंधी उटणें व फितन्याची डबी १ असें सामान ठविलें आहे. तिची अगदीं माफक किंमत २ रु. पो. खर्च ४६ एकदम ४ पेट्या घेणारास ट. ख. मा. एकदम ८ पेट्या घेणारांस फक्त १ पेटी बक्षिस मिळेल.

## सर्टिफिकिटें.

या लोकमान्य औषधांस ज्या सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं थोड्याशा खालीं दिल्या आहेत.—

१ व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डाक्तर विश्राम रामजी घोले यांनीं दिलेल्या सर्टिफिकिटाचा सारांशः—

आपल्या मदनामृत संजीवनी गुटिका मीं तपासून पाहिल्या, व त्यांचा अनुपानखर्डाही वाचिला. या गोळ्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून या गोळ्या हें गुणावह एक उत्तम औषध आहे. या गोळ्या मनुष्यास आरोग्यकारक व अत्यंत कामोत्तेजक आहेत.क०

२ स्वामीराव कृष्ण कारकून विजापूर. हे कळवितात कीं आपल्या मदनसंजीवनी पाकाच्या गुणाबद्दल आमची पूर्ण खात्री झाली. आतां नेत्रांजन व पायाच्या टांचा दुखतात त्यांवर औषध पाठवावें.

३ यादव रघुनाथ एकताटे मु० भंडारा, हे कळवितात कीं आपल्या मदनामृत संजीविनी गुटिका व पाक यांपासून मला बराच फायदा झाला. यांतील पाक व गोळ्या आपल्या स्नेह्यास दिल्या. त्यासही फायदा झाला. यामुळें पेंडसे यांचीं औषधें आमचेकडे मिळतात असें माहीत झाल्यामुळें ते मजमार्फतच मागतात. तर आपला एजंट मला करावें. कळावें.

४ बाबाचार्य जहागिरदार मु० बलोळी. हे कळवितात कीं, आपल्यामदनामृत सं० गुटिका, पाक, दम्याचें औषध वगैरे बरींच औषधें अनुभवून पाहिलीं, त्यांचा बिनचूक उपयोग होतो. अत्यंत जुनाट व जोरदार असा दमा त्वरित गेला. याशिवाय आणखी बरींच औषधें गुणावह आहेत, असेंही अनुभवास आलें. कळावें.

सूचना:—आमच्या औषधालयांतील शेंकडों औषधांपैकीं स्थलसंकोचामुळें सर्व न देतां नेहमीं उपयोगांत येणाऱ्या औषधांचाच यांत समावेश केला आहे. आमच्याकडील सर्व औषधांच्या माहितीचें सचित्र पुस्तक मागितल्यास फुकट पाठवूं. या जाहिरातींतील एकदम ६ रुपयांचीं औषधें घेणारास सर्वोत्कृष्ट सुगंधी अत्तरांची एक पेटी बक्षीस देऊं पेटीची माहिती जाहिरात पाहिल्यानें समजेलच ४ रुपयांचीं औषधें घेणारास दर रुपयास दोन आणे प्रमाणें कमिशन मिळेल. मात्र चार रुपये मिशनांत धरले जाणार नाहींत. नंबर १ व २ या औषधास वेगळें कमीशन मिळणार नाहीं. हें लक्षांत असावें. वरील औषधें रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. किंमतीशिवाय टपालखर्च वेगळा पडेल. अनुपानखर्डा औषधांसोबत मिळेलच. कोणी प्रकृतिमान कळविल्यास, रोगाचें निदान व उपयुक्त चिकित्सा कळवूं.

खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

## वर्तमानसार.

दिल्ली दरबारच्या वेळीं तेथें नानाप्रकारचे खेळ करणारी एक विलायती मंडळी पाहुण्याच्या करमणुकी करितां आपल्या स्वतःच्या फायद्याकरितां हजर राहणार आहे

**पत्ताः—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मु० मुर्डी, जि० रत्नागिरी, पोष्ट हर्णे.**

REGISTERED N. No

वर्षाचा आगाऊ ५ हाशील १२
सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 a
Single copy ...................................4 a

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VO LXXXV AKOLA MONDAY 25 FEBRUARY 1901 NO 8

वर्षं ३५ आकोला सोमवार तारीख २५ माहे फेब्रुवारी सन १९०१ इ० अंक ८

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एकहजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।||- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००, १००, ५०, २५, १५, १०, ५, २ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारांनी ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पाठवें. तांव त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता-- एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुंण.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा सन १९०१।१९०२ सालचे हक्कांचा लीलांव तारीख १८ मार्च सन १९०१ इसवी रोजीं सकाळीं ८ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस सदहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें तारीख १६।२।१९०१ इसवी.

K. G. Damle
Secretary
A. M. C.

## नोटीस

अमृता वल्लद बापूजी कारभारी पाटील वस्ती मौजे पिंपरी खोद्रा तालुके जळगांव यांस.:—

खालीं सही करणार यामकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे सख्खत वडील बंधु. तुमचा व माझा एकत्रपणा होता. कांहीं बेबनांवामुळें सुमारे दीड महिना झाला मी विभक्त राहिलों आहे. सबब आजपावेतों स्थावर जंगम जिनगी जी तुमचे पाशीं आहे आंत मी निमे हक्कदार असल्यानें मजला वाटून द्यावी. त्याच प्रमाणें या सालास आपले मालकीचे व बटाईचे जमिनीत उभयतांचे मेहनतीनें पीक तयार झालेलें तुमचे जवळ आहे त्या पीकाचा निमें वाटा मजला द्यावा. या प्रमाणें सर्व माझा निमे हिस्सा मजला देऊन माझी पावती घ्यावी. या प्रमाणें नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत तुह्मी न केल्यास वर दर्शविलेल्या मिळकतीचा हिस्सा तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करून घेऊ. हे आपणास कळावें तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १९०१ इसवी

सही
केशव बापूजी पाटील
दस्तुर खुद्द.

## नोटीस

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं सन १९०१ सालच्या खानेसुमारीचे अखेरचे गणतीचें काम शुक्रवार तारीख १ माहे मार्च सन १९०१ रोजीं संध्याकाळीं सात वाजल्या पासून बारा वाजे पर्यंत चालेल. त्या वेळीं वराती वगैरे समारंभ किंवा प्रवास तहकूब ठेविले असतां सर्वांस सोईस्कर होईल. तसेंच अखेर गणती साठीं खानेसुमारीचे कामगार रात्रीं सात ते बारा वाजे पर्यंत केव्हांही आल्यास त्यांस खानेसुमारीस लागणारी माहिती बिन हरकत व ताबडतोब त्यांची खोटी न करितां द्यावी. ही माहिती देतां यावी ह्मणून प्रत्येक घरवाल्यानें व बिऱ्हाडकरानें आपापल्या घरीं रात्रीं बारा वाजत पर्यंत दिवा ठेवावा. व खानेसुमारीचे कामगारांस घरांतील सर्व माणसां संबंधी योग्य माहिती देतां येईल असा कोणी तरी मनुष्य जागत राहील अशी तजवीज ठेवावी. आपले आवारांत किंवा घरांत कुत्रे असतील तर ते बांधून ठेवावेत. जो या प्रमाणें न करितां खानेसुमारीचे कामास कोणचेहि प्रकारानें हरकत करील तो खानेसुमारीच्या आक्ट प्रमाणें गुन्हेगार होईल.

अकोला— ता. २१।२।१९०१
*V. M. MAHAJANI*
सेन्ससचे चार्ज सुपरिंटेन्डेंट
अकोला

## जाहिरात

ज्या अर्जदारांनीं सेन्सस ऑफिसांत नौकरी मिळण्याकरितां अर्ज केले आहेत त्यांनीं व दुसऱ्या अशा उमेदवारांनीं उमरावती येथें सेन्सस आफिसांत हजर होऊन तारीख ६ मार्चच्या सुमारापासून आठ दिवस बिन पगारानें ऍबस्ट्रॅक्शन व टॅबुलेशनचें काम शिकावें. त्यानंतर योग्य ठरतील त्यांना ठेविलें जाईल. पगार वगैरे संबधानें माहिती समक्ष सेन्सस आफिसांत दिली जाईल.

A. D. Chinoy.
क्यांप बुलडाणें ता० १९।२।०१ } सुपरिंटेंडेंट आफ सेन्सस आपरेशन्स मुलुखअमानीं हैदराबाद

## मुख सामुद्रिक

नंबर २

(तारीख १९।१०।०० चे अंकावरून पुढें चालू)

आतां आपण प्रथम मुख सामुद्रिकाची किल्ली ह्मणजे जे डोकें त्यांजकडे वळूं. कारण डोक्यांतच मेंदू असतो; व मेंदू हेंच मनाचें— ह्मणजे अर्थात स्वभावाचें— मुख्य इंद्रिय ह्मणजे स्थान आहे. या विषया संबधानें असा एक ठाम सिद्धांत आहे कीं ' चांगल्या आकाराचे डोक्यांत चांगल्या आकाराचा—अर्थात चांगल्या प्रतीचा—मेंदू हटकून असलाच पाहिजे. ' कारण चांगल्या प्रतीचा— चांगल्या आकाराचा— मेंदू आंत असल्याशिवाय डोक्यांस बाहेर चांगला आकार यावयाचाच नाहीं. ह्मणून कोणत्याही पदार्थाचा आकार त्या पदार्थाच्या गुणावगुणांचें बाह्यदर्शक घरलें आहे. मेंदूचे शारिर शास्त्रज्ञांनीं चार भाग केले आहेत. पुढला ह्मणजे कपाळाच्या मागला व टाळूच्या खालचा; मधला; मागला; व पाठच्याचा विद्वान् लोकांनीं आतां असे साधार ठरविलें आहे कीं, मेंदूच्या पुढल्या भागांत अक्कल, बुद्धिप्रागल्भ्य, स्मृति, आकलनशक्ति, कुशाग्रता, सारासार विचार, इंद्रिय बोध, विचार शक्ति, तुलना, इत्यादि बुद्धिविषयक गुणांचीं स्थानें आहेत. मधल्या भागांत कर्तृत्वशक्ति; भक्ष्य व पेय वस्तू विषयींची आवडनावड, पैशाविषयींच्या व धर्मासंबंधीच्या बऱ्या वाईट कल्पना यांचीं स्थानें आहेत. मागल्या, खालच्या, व पाठीच्या कण्या कडील भागांत ह्मणजे ज्याला Small brain अथवा लहान मेंदू ह्मणतात त्याच्या भागांत आपल्या घरगुती व सामाजिक कल्पना—जसे मुलांविषयींचा लळा, मित्रांविषयींची आवड, गृहासंबंधी प्रेम, स्त्री पुरुषांसंबंधी आसक्ती, इत्यादि मनोविकारांचीं स्थानें आहेत. या प्रमाणें एका मेंदूंत अनेक गुणविभाग केलेले असतात तेव्हां आतां अमुक मनुष्यांत अमुक गुण आहे कीं नाहीं हें पहावयाचें असलें त्या गुणाचें मेंदूमध्यें ज्या ठिकाणीं असतें त्या ठिकाणच्या डोक्याच्या भा[...] बाह्य आकारावरून, स्वरूपावरून व [...] वरून तो आहे कीं नाहीं हें जाणा[...] जर डोकेंच लहान व व्यंगयुक्त असे[...] मेंदू तरी मोठा व व्यंगरहित कोठून अ[...] व मेंदू जर लहान व व्यंगयुक्त अ[...] तर मन— अर्थात स्वभाव— मोठा, दि[...] व व्यंगरहित कोठून असूं शकेल? डोक[...] पुढील भागाची ह्मणजे कपाळाची [...] रुंदी, व भरदारपणा हीं त्या भ[...] आंतील मेंदूच्या आकारावर अवलंबून [...] तात. कपाळाचा भरदारपणा व [...] त्या बरोबरच बुद्धि विषयक स[...] कानापासून डोळ्याच्या कोनापर्यंत का[...] रेषेच्या कमजास्त लांबीवर अवलंबून अ[...] ह्मणून आपण कोणत्याही बुद्धीमान् म[...] डोक्यांकडे पाहिलें असतां आं[...] येईल कीं, ही वर प्रमाणें काढलेल[...] लांब आहे ह्मणजे कानापासून डो[...] भाग— कपाळाचा भाग— बराच पुढें [...] आहे. जशीं मेंदूच्या पुढील भागाचीं लक्षणें कपाळावर उमटतात त्याप्रमाणें मेंदूच्या मधल्या, मागल्या, व खालच्या भागांच्या अंतःस्वरूपाचीं लक्षणें बाहेर, डोळे, नाक, गाल, तोंड, ओंठ, कान यांवर स्पष्ट होतात. ह्मणजे या भागांच्या अंतस्स्वरूपाचा परिणाम वर सांगितलेल्या अवयवांच्या बाह्य रचनेवर होतो. या संबंधी सविस्तर हकीकत त्या त्या अवयवांच्या लक्षणांच्या हकीकतींत येईलच. ह्मणजे मेंदूच्या प्रत्येक अंतर्भागाचा परिणाम त्याच्या त्याच्या विवक्षित बाह्य इंद्रियावर झालेला असतो. जर एखादा मनुष्य शिल्पशास्त्र ह्मणा एंजिनियरिंग ह्मणा याला जाण्या योग्य असला तर त्याच्या त्या योग्यतेचीं लक्षणें त्याच्या हाडावरून व स्नायूवरून व्यक्त होतात He was born a soldier; He was born an engineer या वाक्यांत हाच अर्थ गर्भित आहे. जर तो हिंसक अगर खुनी अगर क्रूर असा जायाचा असला तर त्या स्वभावाचीं लक्षणें त्याच्या कानावर जन्मतःच दृग्गोचर होतात. ह्मणजे ते मोठे, ओबडधोबड व डोळ्याच्या बरेच खालीं असे असतात. या विषयीं कानाचे हकीकतींत आणखी येईलच. तेव्हां असा सर्व साधारण नियम काढला आहे कीं बाहेरील एखादा अवयव जर नेहमीपेक्षां निराळा व विलक्षण असेल तर आंतील मेंदूही पण नेहमींपेक्षां निराळा व विलक्षण असाच असतो.

कपाळ-- आतां कपाळाविषयीं. उत्तम कपाळ ह्मटलें ह्मणजे जें नाकापासून वर जातांना उंच, रुंद, व पुढें भरदार ह्मणजे कमानदार असून कललेलें असतें तें. कपाळाच्या मधला भाग हे समजुतीचें व आकलन

शक्तीचें स्थान असतें व वरचा भाग हे विचारशक्ति व मूळ कल्पना काढण्याचें सामर्थ्य यांचें स्थान होय ह्मणून मोठाले तत्ववेत्ते व शोधक लोक यांचें कपाळ वरच्या बाजूस भरदार असें हटकून असावयाचेंच. उलट, तें जितक्या प्रमाणानें वर चढतांना जास्त मागें कललेलें व उंच कमी असेल त्या प्रमाणानें तें कमी प्रतीचें ह्मणजे कमी दर्ज्याचे समजावें.

एकंदर चेहेऱ्याची रुंदी, त्याच्या कपाळाच्या वरच्या टोंकापासून हनुवटी पर्यंतच्या लांबीच्या १/३ असावी या प्रमाणानें, ज्याचा चेहेरा अरुंद त्याच्यांत जोम व कर्तृत्वशक्ती कमी असें समजावें. अशा अरुंद चेहेऱ्याच्या लोकांकडून विशेष मोठें कृत्य होत नाहीं. जर चेहेऱ्याची रुंदी लांबीहून १/३ पेक्षां जास्त असेल तर बुद्धिप्रभावापेक्षां शरीरसामर्थ्य व हिंमत यांचें प्राबल्य जास्त समजावें. या डोळ्यांपासून त्या डोळ्यांपर्यंत काढलेल्या रेषेनें चेहेऱ्याचे दोन सारखे भाग पडावे. ह्मणजे शारिरिक व मानसिक गूण सारखे असतात. जेव्हां कपाळपट्टीचा भाग खालच्या पेक्षां कमी असतो तेव्हां स्वभावस्थैर्य कमी ह्मणून समजावें. शोधांअंतीं असें कळतें कीं लांबी ही चपळता व तदंगभूत इतर गुणांचे दर्शक आहे उदाहरणार्थ शर्यतीचे घोडे, हरणें, शिकारी कुत्रे, वाघ, मांजरें हीं सर्व जनावरें सडसडीत चपळ, पाणीदार, तापट, हुषार, व कधीं स्वस्थ न बसणारीं अशीं असतात; व रुंदी ही शक्तिसामर्थ्य व धिम्मेपणा यांची दर्शक आहे. उदाहरणार्थ हत्ती, सिंह, गेंडा, इ० तद्वत् उंच व सडसडीत, व ठेंगणी व जाडगेली या मनुष्याच्या खुणा होत.

आतां नाका विषयीं. कपाळा मागून स्वाभाविकपणें लक्ष्यांत येण्याजोगा अवयव ह्मटला ह्मणजे नाक होय. एका मोठ्या मुत्सद्याचें असें एक विनोदयुक्त वाक्य आहे कीं 'इतर सर्व अवयव जर प्रमाणांत असले तर मोठें नाक हें कर्तृत्वशक्तीचें मोठें द्योतक आहे.' लहान नाकाचे लोक कधींही मोठ्या योग्यतेस यावयाचे नाहींत. लॅव्हेटर नामक ग्रंथकर्ता ह्मणतो कीं 'A perfect nose was worth a kinglom. I have never seen a broad nose, arched or straight, that did not appertain to a great man.' मात्र नाकांस वाजवी पेक्षां जास्त महत्व देतां कामा नये. कारण इतर इंद्रियें जर त्यांच्या प्रमाणांत नाहींत तर त्या नाकांचा कांहीं उपयोग नाहीं हें जॅनीच्या चित्राकडे पाहून तेव्हांच कळेल. सर्व अवयवांत प्रमाणसाम्यता व एकवाक्यता असणें ही एक मोठी महत्वाची बाब आहे. ज्यांच्या नाकपुड्या लहान असतात ते भित्रे आहेत असें समजावें. नाक लहान व वर वळलेलें असलें ह्मणजे तो माणुस चलाख, थापडवाईक व चौकस असा जाणावा. लांब व खालीं वांकलेलें नाक असलें ह्मणजे तो मनुष्य बहुधा खोलवर नजर पोंचविणारा, सावध, निबोल व हुषार असा असतो. तेंच आंखुड व सरळ असल्यास तो बोलका, पाणीदार, व अविश्वसनीय असा जाणावा. नाकांचे प्रकार चार आहेत, ते हे Roman nose; हें गरुडासारखें अथवा राघूच्या चोंचीसारखें असतें. Grecian nose हें सरळ असतें Jewish nose हें पक्ष्याच्या नाकासारखें असतें. The celestial nose, snub nose feminine nose हेही आणखी प्रकार आहेत.

डोळे— डोळे हे नरदेहांत कोंडलेल्या जीवात्म्याच्या डोकावून पाहण्याच्या खिडक्याच ह्मटल्या तरी चालतील नाका मागून डोळ्यांकडे लक्ष्य जाणें साहजिकच आहे. ह्यांत मनुष्याचे मनोतरंग, बुद्धी, प्रकृति, प्रेम वगैरेचें पुष्कळ परावर्तन पडलेलें असतें. डोळे हे चेहेऱ्यांत महत्वाचें इंद्रिय आहे. यांचे योगानें भिषग्वर्य रोगाचे निदान करितात; गुप्त पोलीस चोर कोण, साव कोण हें ओळखतो. मनुष्य कसा आहे याचें त्याच्या डोळयांत पूर्ण प्रतिबिंब उतरलेलें असतें, बफननें ह्मटलें आहे कीं 'आपल्या मनोविकाराचें चित्र विशेषेंकरून डोळ्यांत रेखाटलें जातें. आत्म्याचे गुणावगुण डोळ्यापेक्षां कोणच्याही दुसऱ्या इंद्रियानें समजत नाहींत. मनोविकाराचा यांवर आधी परिणाम घडतो. डोक्यांतील विचारांची बातमी डोळ्यावर प्रथम वचतां येते. त्यांत रागाची उग्रता, आनंदाची प्रफुल्लता, हास्याची कळी, व विचारांचा कल्लोळ हीं सारखींच तेव्हाच स्पष्ट होतात. काळ्या डोळ्यांचे लोक हिम्मतवान व जोरदार; पिंगट डोळ्यांचे लोक धूर्त, आत्मसंयमी, व बुद्धिमान; निळ्या डोळ्यांचे शोधक, भित्रे, निस्सीम, व प्रीति करणारे असे असतात. पण या गोष्टी विशेष विश्वसनीय दिसत नाहींत. कारण यापैकीं कोणच्याही रंगांच्या डोळ्यांच्या लोकांत वर सांगितलेले सर्व गुण आढळतात. ज्यांचे डोळे स्थीर, वटारलेले, व पुढें आलेले असें असतात तेव्हां त्याचे मेंदूंत कांहीं तरी विकृति आहे असें समजावें. ज्यांचे स्तिमित डोळे असतात ते मंदमति जाणावे. उत्तम डोळे ह्मटले ह्मणजे फार खोल नाहींत फार उथळ नाहींत व जे चंचल पण अस्थिर नाहींत असे होत ज्यांचे डोळ्यांमधील अंतर कमी असतें ते चिरडखोर व लुच्चे असतात. ज्यांचे फार दूर असतात ते भित्रे, सावध, दक्ष, व निरुपद्रवी असे असतात. ज्यांच्या भिवया जाड व दाट असून डोळ्यांचीं बुबुळें जाड पापण्यांनीं अर्धीं झाकलेलीं असतात व डोळे लांबट व बदामाच्या आकाराच्या असतात ते लोक बुद्धिमान असतात.

पुढें चालूं

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ७ शके १८२२

आमच्या देशी कलांचा व उद्योगांचा ऱ्हास होण्याला कारणें दोन प्रकारचीं आहेत: पहिल्या प्रकारांत इतरत्र यांत्रिक कलेचा होत असलेला प्रसार व इंडियांत तिचा अभाव या दोन्ही गोष्टी एकवट होतात. या यांत्रिक ज्ञानाचा हत्ती जेथें जेथें फिरतो तेथें तेथें तो मूळच्या कलाकौशल्याचें उच्चाटन करितो. हस्तकौशल्याची मात्रा यांत्रिक कले पुढें बिलकूल चालत नाहीं आणि सुधारणेचें मुख्य अंग जी यांत्रिक कला ती जर आपण आपलीशी करणार नाहीं व तिच्या सामर्थ्यानें इतर राष्ट्रांशी टक्कर मारणार नाहीं तर आपला देश खालावणार यांत तिळमात्र संदेह नाहीं. यांत्रिक ज्ञानाचा हव्यास आमच्या लोकांना लागणार नाहीं व याची गोडी कळूनही जर आह्मी पूर्ववत्च अज्ञानी राहूं तर आमची औद्योगिक अभिवृद्धी होणार नाहीं इतकेंच नाहीं तर या देशाची सांपत्तिक स्थिती खाऊन आलेली निर्धनता उत्तरोत्तर वाढत जाऊन आपला देश आकाबाईच्या भोंवऱ्यांतून बाहेर पडण्याची मुळींच आशा नको. यांत्रिक ज्ञानाची वृद्धि करण्याचें कार्य प्रजाजनाचें नसून राज्यकर्त्यांचें आहे आणि जोंपर्यंत सापत्नभाव सरकारच्या आचरणांतून नाहींसा होणार नाहीं तोंपर्यंत आमच्या देशाची सुधारणा कुंठित राहील इतकेंच नाहीं तर आमचा देश अवनतीच्या रसातळाला पोंचेल.

पहिलें कारण दूर करणें सरकारच्या हातीं आहे तसेंच दुसरें कारण प्रस्तुतच्या शिक्षणक्रमामुळें उद्भुत झालें आहे. विद्यादानाचें दातृत्व सरकारनें पदरी घेतलें आहे पण या दानाची पात्रता व समय यांचें विवेचन बरोबर होत नसल्यामुळें भलताच प्रकार घडून येत आहे. हल्लींच्या शिक्षणानें नव्या पिढीला जुने कामधंदे कमीपणाचे वाटतात व ते करण्या इतकी त्यांच्या अंगीं शक्तीही राहत नाहीं. जुने पिढीजाद धंदे व तशीच शेतकी या विषयीं शाळांतून शिकलेल्या मंडळीस मोठा तिटकारा आहे. धंदा कोणताही असला तरी तो राजमान्य आहे. आणि तो करण्यांत कांहींच कमीपणा नाहीं. इंग्रजी विद्यामृतानें ही गोष्ट कळली नाहीं तर सर्व विद्या शिकून पालथ्या घड्यावर पाणी ओतल्या प्रमाणें होत आहे असें ह्मणावें लागतें. कोणत्याही धंद्याला लघुत्व नाहीं तर तो करणारा माणूस तो धंदा लघुत्वाला उतरवितो किंवा महत्वाला चढवितो. पूर्वीं ग्रीस देशांत एका मुत्सद्याला शिक्षा ह्मणून गांवच्या सफाईचें काम करण्यास सांगितलें. पण तें त्यानें इतकें उत्कृष्ट केलें कीं सर्वजण त्याच्या कामाची वाहा करीत आणि शहराच्या आरोग्यवृद्धिकडे पाहून सर्व लोक त्याचे धन्यवाद गात असत हा दृष्टांत सर्वांनीं ध्यानांत धरण्या सारखा आहे. कांहीं दोष हल्लींच्या शिक्षणक्रमाचाही आहे. पांचवें किंवा सहावें वर्ष लागल्यापासून जो एक वेळ या विद्येच्या चक्रींत भरडत जातो त्याला २९।३० वर्षे वयाला होई पर्यंत डोकें वर करण्याला फुरसतच नाहीं, शाळेच्या सुरम्य इमारतींत कालक्रमणा करावी, पुस्तकें घोटावीं आणि शरीराला व्यायाम ह्मणून कांहीं उ.बैस करावी या पलिकडे ज्यांची दीनचर्या नाहीं त्यांस शेतीचा, लोहाराचा, सुताराचा किंवा तसाच परिश्रमाचा धंदा करितां आला नाहीं तर त्यांत नवल नाहीं. मनुष्यांतला कंटकपणा या विद्यार्जनानें नाहींसा होतो आणि देशी उद्योगधंदे बुडाले व विद्येनें मिळणारे रोजगार किंवा हुद्देदाऱ्या ही मिळत नाहींशीं झालीं त्यामुळें मोठ्याच जनसमूहाचा चरितार्थ शेतीवर येऊन पडला आणि शेती करण्या इतकी अंगांत धमक राहिली नाहीं. हल्लीं प्रमाणेंच विद्वानांची दुर्दशा होत जाईल आणि ते निरुपयोगी होत जातील तर नवल नाहीं हल्लींची शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांचे कल यामुळें वाडवडिलापासून चालत आलेल्या उद्योगाची धूळधाण उडाली आहे. शेती नको किंवा वडिलार्जित धंदे नको पण भिकेची चाकरी पाहिजे असा आजचा मनू आहे ईश्वर करो आणि या मनूचा पालट होवो !

## द्विरुक्ती

मंगल गोष्टीची पुनरुक्ती नकोशी वाटत नाहीं. तिचें स्वाभाविक रहस्य मनाला आनंद देतें. आमचे चक्रवर्ती बादशहा सिंहासनावर बसले तेव्हां त्यानीं आपल्या प्रजाजनाला जो त्या कळकळीचा निरोप पाठविला तो इंग्रजी निरोप आह्मी मराठी मार्फत आमच्या वाचकांच्या माहितीसाठीं पूर्वींच मोठ्या उत्कंठेनें प्रसिद्ध केला आहे. ही प्रसिद्धी झाल्या नंतर ही मे० कमिशनर साहेबांनी अलिशान नामदार रेसिडेंटाच्या हुकुमावरून पुन्हां त्या निरोपाचें भाषांतर आह्माकडे पाठविलें आहे. या मुद्दाम पाठविलेल्या पत्राचा उद्देश त्या निरोपाची प्रसिद्धी पुन्हां करावी असा असावा असें दिसल्यावरून तो निरोप आज दुसऱ्यांने छापणें भाग आहे.

'मलिक माआझम, केसरेहिंद, यांजकडून हिंदुस्थानचे राजेरजवाडे व लोक यांस आलेलें पत्र.:—

हिंदुस्थानचे राजेरजवाडे व लोक यांस,— माझ्या परमप्रिय मातोश्रीच्या अत्यंत दुःखकारक मरणामुळें, फार पुरातन काळापासून वंशपरंपरेनें चालत आलेली गादी मला प्राप्त झाली आहे. तेव्हां या प्रसंगीं हिंदुस्थानचे राज्यकर्ते संस्थानिक व माझ्या हिंदुस्थानच्या राज्यांतील रहिवासी यांचें अभीष्ट चिंतून, त्यांचें कल्याण करण्याची माझी मनापासून इच्छा आहे असें त्यांना आश्वासन देणें मला इष्ट वाटतें. इंग्लंड देशाच्या राज्यकर्त्यांपैकीं माझ्या पूर्वीं गादीवर असलेल्या व ज्यांच्या बद्दल सर्व लोक एवढें दुःख करीत आहेत त्या विख्यात महाराणी साहेबांनींच प्रथम हिंदुस्थानचा राज्यकारभार प्रत्यक्ष आपल्याकडे घेतला, आणि त्या विस्तीर्ण देशाच्या राज्यकारभाराशीं आपला विशेष निकट संबंध जडला हें दर्शविण्यासाठीं बादशाहीण हा किताब धारण केला.

हिंदुस्थानासंबंधी सर्व बाबतींत केसरे-हिंद ह्या स्वतः नेहमीं अंतःकरणापासून मोठी कळकळ बाळगीत असत, आणि खुद्द त्यांच्या विषयीं व त्यांच्या गादीविषयीं हिंदुस्थानांतील कोट्यावधि लोकांची किती राजनिष्ठा व प्रेम असे हें मला चांगलें अवगत आहे.

ही राजनिष्ठा व प्रेम हीं, दक्षिण आफ्रिकेंतील लढाईमध्यें राज्यकर्ते संस्थानिक, उदार अंतःकरणानें व स्वदेशाभिमानानें, जी मदत देण्यास पुढें आले तीवरून, व देशी सैन्यानें आपल्या स्वदेशाच्या हद्दीबाहेर जी मर्दुमकीची कामगिरी बजाविली तीवरून, महाराणीसाहेबांच्या चिरकाल चाललेल्या व वैभवास चढलेल्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं विशेष व्यक्त झाली.

मी हिंदुस्थानांत येऊन, या प्राचीन व प्रख्यात साम्राज्यांतील राज्यकर्ते संस्थानिक, इतर प्रजाजन व मोठमोठीं शहरें यांची प्रत्यक्ष ओळख व माहिती करून घेतली ती महाराणीसाहेबांच्याच इच्छेवरून व परवानगीनें होय.

त्यावेळीं माझ्या मनावर जे परिणाम घडले, त्यांचें मला कधींही विस्मरण होणार नाहीं; आणि नी, पहिल्य कैसरेहिंद यांनीं घालून दिलेला अत्युत्तम कित्ता पुढें ठेवून हिंदुस्थानांतील माझ्या सर्व दर्जाच्या प्रजाजनांचें सामान्य हित करण्याचा, व महाराणी साहेबांच्याचप्रमाणें, या प्रजाजनांच्या अचल राजनिष्ठेस व प्रेमास पात्र होण्याचा प्रयत्न करीन.

(सही) एडवर्ड, रा. व बा.
मुक्काम जांजेरे विंडूसर, तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १९०१"

# The Berar Samschar

MONDAY FEBRUARY
25 1901

Poverty is our daily companion and India is now an asylum of famines. The question is what we shall do next if we propose to mend matters and to over-come difficulties in the course of progress. There is the utter fall of the people's power of with-holding their own against adverse times. They have got neither money nor food — stuffs and have to depend upon the next day's labour for their daily bread. There is a hard battle of wages. Labour is extremely cheap because it lies waste and unused for want of employment. Our next programme will be to wage a war against the present odds and to ensure a life of comfort with the help of sheer labour, intelligence and abilities for doing great and important things. The market is over—crowded with the products of other nations and unless we turn our thoughts to these we cannot be able to drive the crowds that figure in the congested ranks of the learned professions. It is our contact with the western civilization that has brought poverty to India and the wisdom that adversity never fails to teach in moments of need. We have for our guide-posts the poverty and the stern lessons it has taught us. If we let slip the present times we plunge ourselves into a hopeless future which imagination fails to picture in the lurid light of the present poverty.

The western education is our beacon-light in this state of a national ship—wreck. The rocks of adverse fortune have upset our ship and there are few chances of her recovery from the dangerous condition. The contact with the western thought is replete with wisdom for future use. If our educated classes fail to understand the lessons of the Western knowledge and do not care to interpret properly the signs of the present times we donot hope to see India's return to her past glory. It is not our purpose to blame the people who are best fitted to read Indian matters with the glasses of the western prosperity. We only request them to come to the brunt of war and to lead aright the masses so that the latter will study how to earn a better living and to secure more comforts of life. The depth of poverty is rather hard to reach and it is only with the gradual upheaval of the people that we can hope to get into the sunlight of the western prosperity from the dire mist of decay and ruin in which our people are being involved.

What is then our next programme? It is for the educated people to leave all lethargy and to instruct themselves along with their brethren in the arts of making money. Nations rise because they take their stand upon the solid basis of material prosperity. A nation like India must fall if its foundations are undermined by the drain of wealth The foreign rule and the sale of foreign articles in Indian markets are the chief causes of this drain. It is now a proved fact that India cannot hope to flourish on her agriculture. If she be blocked from communications with other nations then it is a matter of hope that her agriculture will be a great saviour. But with our refined luxuries and the utter want of self—denial in regard to the use of foreign articles we cannot cherish hopes of Indian's revival in the race of competition with other nations: We have done enough with our prayers to the government who do not come forth to help us. Our political affairs are lacking in the energy and the independence which material prosperity alone can purchase. Self—help is the key—stone of all progress. How shall we help ourselves to get out of this morbid state? The history of the western nations suggests the remedy. It is something like this. There must be a perfect harmony and unity with the ruling race. And we must supplement our political and social movements by the sober ambition of improving the material wealth of the country. Technical education is the only pass-port to this haven of the ultimate ambition. And let us do our best to minimize the pressure of *literary* education and to magnify the spread of the technical and scientific education. If the Victoria memorial immortalizes the benevolent mission of England for reigning over India for India's sake we hope to run a successful race with the other civilized nations.

## वऱ्हाड

मे० रुस्तुमजी फर्दुनजी डेपुटी कमिशनर साहेब यांची स्वारी वार्षिक दवऱ्यावर गेल्या २१ वे तारखेपासून निघाली आहे. केळीवेळी, दहिहांडा, व जऊळके येथून साहेब बहादूर काल रोजीं आकोटास गेले आहेत. तेथें तारीख २८ पर्यंत मुक्काम होईल आणि पुढील मुक्काम येणेंप्रमाणें आहेतः—

| तारीख | गांव |
|---|---|
| १ मार्च | मुंडगांव |
| २ „ | पळसोद |
| ३ „ | बोरगांव (बाळापूर) |
| ४।५।६।७ | बाळापूर |
| ८।९ | खामगांव |

वऱ्हाडांतील प्लेग– प्रतिबंधक अमलवारी साठीं इंडियांतील खालील भाग प्लेगानें दूषित असें ठरविण्यांत आले आहेत.

| इलाखा | दूषित भाग. |
|---|---|
| बंगाल | कलकत्ता, भागलपूर, गया, मानभू, मोंगीर, पाटणा व सारण. |
| मुंबई | सिंध खेरीज मुंबई इलाखा. |
| म्हैसूर | बंगळोर, टिपटूर, शिमोगा, शिकापूर, आर्सीकेरी, कोलार, म्हैसूर. |
| पंजाब | जालंधर, गुरुदासपूर, सिआलकोट जिल्हे. |

रा. रा. विठ्ठल नारायण काळीकर आफिशिएटींग ए० असि० कमिशनर, कोर्ट, दर्यापूर यांस स्माल काजचा १०० रुपया पर्यंतचा अधिकार व १ ले वर्ग माजि० चा अधिकार देण्यांत आले.

मि० वाटसन व्यांकेचे एजंट हे बदलून गेल्यामुळें मुनसिपल सभासदाची एक जागा रिकामी होती. या जागीं राजा इंद्रकरण आनररी अव्वाची यांची नेमणूक करण्यांत आली.

चालूं १९०१ साला करितां वऱ्हाडांत १३० वकिलांस सनदा देण्यांत आल्या आहेत त्यापैकीं ३३ पहिले वर्गाचे सनदवाले असून दुसऱ्या वर्गात ९७ आहेत. हैदराबादच्या कोर्टात १४ पहिले वर्गात व ५ दुसरे वर्गात मिळून १९ वकील आहेत.

## तेल्हारा— १६।२।१९०१

जैनधर्मी गुरु विजयानंद सुरीश्वर यांचे प्राशिष्य हंसविजय हे महा साधु पुरुष असून आपल्या उपदेशानें जैनधर्मी लोकांवर मोठा अनुग्रह करीत असतात. श्रीमत् हंसविजय हे तेल्हाऱ्यास आणि त्यांच्या हातून एका सुंदर देवालयांत मूर्तीच्या स्थापनेचा मोठा टोलेजंग समारंभ झाला. अमदाबाद, मुंबई, पुणे, खानदेश, वगैरे भागांतून दीड हजारावर मंडळी जमली होती. नवें सुबक, रमणीय व मनोहर देवालय येथील शेट रा. रा. हरकचंद गुलाबचंद यांनीं बांधलें त्यांस १५ हजार रुपये खर्च आला आणि मूर्तीस्थापनेच्या समारंभाला ८ हजार रुपये त्यांनीं खर्चिले. शेट हरकचंद हे आमच्या गांवची शोभा व पांघरूण आहेत. गृहस्थ फारच सुशील आहे. या समारंभाच्या निमित्तानें जैनदर्मीयांची दुसरी कांग्रेस तेल्हाऱ्यास भरविण्यांत आली होती.

या कांग्रेसमुळें बाळापूर व तेल्हारा येथील जैन लोकांमध्यें १०० वर्षां पासून बंद पडलेला बेटीव्यवहार पूर्ववत् सुरुं झाला. ही मोठी आनंदाची गोष्ट होय. स्वामी विजयानंद हे धर्मश्रद्धा वाढवितांना सोज्वळ सुधारणाही करण्यास अनमान करीत नाहींत.

## नोटीस

वेशमी केवलचंद ताराचंद अज्ञान पालन करणार मातोश्री रुखमाई मर्द ताराचंद राहणार वडनेर भोलजी तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणाः–

यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं आमच्याकडे तुमच्या दुकानची दस्तऐवजी बाकी, खाते बाकी आणि हुकूमनाम्याची बाकी बरीच चढली होती आणि त्या शिवाय आमची वडिलोपार्जित गढींतील जागा व मौजे पिंपरी तालुका मलकापूर येथील शेत सर्व्हे नंबर १२ या स्थावराची खेरदीही तुमच्या नांवानें वडिलांनीं करून दिली होती. ही जुनी वाडवडिलांची स्थावर जिनगी परत खेरदी द्यावी व तुमच्या कर्जबाकीतून मुक्त व्हावें म्हणून परत खेरदी व कर्जाची फेड याची उक्ती रक्कम ९०० रुपये खंडण्यांत आली आणि त्या रकमेचे मी तुम्हाला दोन रोखेही करून दिले. कराराच्या तारखे पर्यंत वरील रक्कम बिनव्याजी होती. रकम रुपये ७०० तुम्हास पोचल्या नंतर तुम्ही सदहू स्थावराची परत खरिदी करून देण्याचें कबूल केलें होतें. कराराच्या तारखे नंतर तुम्हास ७०० रुपयांची रकम पोंचण्यापूर्वींच जर हंगाम निघून गेला तर स्थावराच्या तुमच्या स्वामीत्वाबद्दल २०० रुपयेंही आम्ही देण्याचें कबूल केलें होतें परंतु आम्ही तुमची रकम ७०० रुपये पोचती केली आहे इतकेंच नाहीं तर २०० रुपयांच्या दस्तऐवजाची सव्याज २१९ रुपयावर फेड केली आहे.

येणे प्रमाणें तुमच्या कर्जाची व स्थावराच्या परत खेरदीची रकम रुपये ९०० सव्याज आम्ही पोचती करून दिली आहे असें असून तुम्ही अद्याप परत खेरदीचा कागद करून नोंदून दिला नाहीं. शेत व गढी आमच्या ताब्यांतच आहे म्हणून तुम्ही ती गोष्ट दिरंगाईवर व लांबणीवर टाकीत असाल पण व्यवहारामध्यें चोख असलें पाहिजे आणि माझ्या वडिलांचा माझ्या मागे तगादा आहे म्हणून मी तुम्हास या लेखानें कळवितो कीं तुम्ही आपल्या कडील कागदपत्र लिहून नोंदून देण्याचा करार नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत पुरा करावा. ही गोष्ट करण्यास तुम्ही चुकाल तर तुम्हावर दिवाणीत दावा करून पुरी दाद मिळवावी लागेल व सर्व खर्च तुम्हावर बसेल. आम्ही तुमची जुनी असामी आहो म्हणून ही नोटीस देणें जरूर वाटलें. कळावें तारीख २४ फेब्रुवारी १९०१ इसवी.

सही
गणपत वल्लद लक्ष्मण पाटील राहणार पिंपरी कोळी परगणे जळगांव तालुका मलकापूर दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

आश्चर्य— आंधळ्याला जेवढें ज्ञानदृष्टीनें दिसतें इतकें डोळस माणसाला उघड्या डोळ्यांनींसुद्धां दिसत नाहीं.

विलक्षण शोध—इंग्लंडांतील एका जी. कारटर नांवाच्या विद्वानानें सरकीच्या तेलांत कांहीं मिश्रण घालून रबर तयार करण्याची युक्ति काढली आहे.

सगळ्या जगांत इंग्लंदासारखा दुसरा दारूबाज देश नाहीं. फ्रान्स देशचा नंबर त्याच्या खालोखाल लागतो. सर्वांत इंग्लंद वाईन मार्केट ( दारूचा बाजार ) चा नंबर पहिला आहे असें ह्मणतात.

वकिलांची विनंती—मद्रासेकडील वकिलांनीं विलायतच्या प्रिव्हिकौन्सिलाकडे असा अर्ज केला आहे कीं हिंदुस्थानच्या हायकोर्टच्या वकिलांना ब्रिटनच्या ब्यारिष्टरांचे अधिकार देण्याची त्यांनीं तजवीज करावी.

स्त्री विश्वविद्यालय—जपानची राजधानी टोकिओ येथें फक्त स्त्रियांकरितां ह्मणून एक विश्वविद्यालय होत आहे या विद्यालयाकरितां एका श्रीमंतानें जागा मोफत दिली व तिघांनीं मिळून २४ हजार पौंड रक्कम दिली.

बोअर स्त्रियांचें शौर्य—ट्रान्सवॉलचे लढाईवर गेलेल्या एका ब्रिटिश गृहस्थानें डचबूर लोकांच्या तरुण बायकांही बंदुका घेऊन व खंदकाचा आश्रय धरून लढाईचें काम आपल्या नवऱ्यांच्या बरोबर राहून शौर्यानें करीत असतात असें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. ज्ञा. च.

ब्रिटिशसत्तेखालीं एकं भावी मोठें राज्य—सध्यां चोहों कडून आफ्रिकेंमध्यें एक प्रचंड राज्य उभारण्याची त्यांची खटपट चालली आहे. या महत्कार्यास पन्नास साठ वर्षांचा कालावधी लागणार. इतकी वर्षें पुढल्या आशेवर लक्ष्य देऊन मोठ्या नेटानें काढलीं पाहिजेत. व असें झालें तरच हें भावी मनोराज्य खरोखरीचें होईल. पण तोंपर्यंत याच्या पायीं काय विलक्षण अनर्थपरंपरा ओढवतील हे ईश्वर जाणे!

येत्या दोन शतकांत आशियाखंड व आफ्रिकाखंड हीं जगाच्या राजकीय उलाढालीचा केंद्र होणार, असें जगातील मोठमोठ्या मुत्सद्यांचें भविष्य आहे.

महाराणीसाहेबांचें स्मारक काय करावे याबद्दलच्या सूचनाः—

१ ही स्मारकफंडाची रक्कम कायम दुष्काळफंड ह्मणून ठेवावी.

२ राणीसरकारच्या नांवानें सर्व देशांत औद्योगिक शिक्षण व औद्योगिक कला यांची उन्नति होईल, अशा तऱ्हेची तजवीज या फंडांतून व्हावी.

३ राणीसरकारच्या नांवानें कलकत्ता येथें एक जंगी सुरेख इमारत बांधून तेथें एक पदार्थसंग्रहालय करावें.

४, लेडी डफरीनफंडाप्रमाणें स्त्रियांच्या रोगांवर औषधें मिळण्याकरिता फुकट दवाखानें काढून स्त्रियांस वैद्यकीय शिक्षण देण्याची तजवीज करावी.

कलकत्ता येथे एक जंगी व्हिक्टोरिया हॉल बांधून त्यांत पूर्वीच्या अलौकिक वस्तु व थोर पुरुषांच्या तसबिरी, कोनाकोपऱ्यांत पडलेल्या अमूल्य जिनसा इत्यादिकांचा शोध लावून त्या सर्वांचा सदर्हू हॉल मध्यें संग्रह करण्याचा व्हाइसराय साहेबांचा पक्का मानस आहे. कलकत्याच्या रायल एशियाटिकसोसायटीपुढें 'व्हिक्टोरिया हॉलमध्यें संग्रह करावयाच्या वस्तू' याविषयावर खुद्द लॉर्ड कर्झन साहेब व्याख्यान देणार आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. शिवाय पन्नास हजारांहून अधिक रकम देणाऱ्या प्रत्येक इसमाचें नांव व्हिक्टोरिया हालच्या दरवाज्यावरील संगमरवरी दगडावर कोरलें जाईल असेंही प्रसिद्ध झालें आहे. अशा युक्तीनें कार्यभाग होणारच हें सांगणें नलगे.

हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या तर्फेनें महाराणी साहेबांचें एक निराळेंच स्मारक व्हावें अशा बद्दल लेडीकर्झन खटपट करीत आहेत.

महाराणीसाहेबांच्या स्मारकासंबंधानें मुंबईस जी जाहीर सभा भरली होती तिनें नेमलेल्या जनरल कमिटीनें मुंबई इलाख्यांत स्मारकासाठीं जमणारी रकम कलकत्याच्या 'व्हिक्टोरिआ हॉल' कडे देऊं नये असें ठरविलें. स्मारकासाठीं जी रकम जुळेल तिला 'व्हिक्टोरिया फंड' हें नांव देऊन ती रकम एकदम कोणत्याही संस्थांस न देतां ट्रस्टीचे ताब्यांत द्यावी व तिचे उत्पन्नातून धंद्याचें व औद्योगिक शिक्षण व नवीन शोध यांना मदत करावी, याप्रमाणें एक्झिक्युटिव कमिटीचें ह्मणणें आहे.

मद्रासकडेही या संबंधाचेच वाटाघाट सुरू आहे व बंगाली बाबूमंडळीही या सूचनेस अनकूल होतील अशी खात्री वाटत आहे व्हाईसरायसाहेब आपला हट्ट न सोडतील तर मुंबई, मद्रास व बंगाला यांनी एक जुटीनें औद्योगिक शिक्षणाची वृद्धि करण्यांत महाराणी साहेबांचें स्मारक करण्याचा दृढ निश्चय ठेवावा; ह्मणजे वायव्यप्रांत व पंजाब या प्रांतांचेही साह्य मिळून महाराणी साहेबांचें प्रस्तुत कालास योग्य व सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या लोकांचें कल्याण होईल असेंच स्मारक झाल्या शिवाय राहणार नाहीं.

तात्पर्य—महाराणीसाहेबांचें चांगलें स्मारक होऊन शिवाय लोकांचा फायदाही कशानें होईल हें लक्षांत आणून लोकांनीं आपली वर्गणी कोणीकडे द्यावयाची तें ठरवावें हें बरें.

वादळ नाहींसे करणें—विमानाच्या साह्यानें आकाशांत तोफेचे बार काढल्यानें ढग व वादळें दूर होतात.

अतिबुद्धिवान मुलगा—काशी येथें थियोसोफिकल मंडळीची सभा भरली होती तेथें एका १२ वर्षांच्या मुलानें वेदांत विषयावर अस्खलित भाषण करून आपल्या विद्वत्तेनें संपूर्ण श्रोत्रवृंदास थक्क करून सोडिलें.

हायकोर्ट वकील कारकुनी करूं लागले—सुरत हायकोर्टांतील एक सनदी वकील मि. मुकुंदराय घेलाभाई हे त्याच जिल्ह्यांतील एका से. स. जज्ज कोर्टांत दरमहा १६ रुपयांची कारकुनीची जागा पतकरून राहिले आहेत. धंद्यांत पोट भरण्यास जर मार्गच नाहीं तर काय करणार बिचारा?

असें कां?— विलायत सरकाराकडे दया करण्याचा वगैरे अर्ज करावयाचा अभ्यास तो जाईल, पण फांशीच्या शिक्षेवर अपील ह्मणून जावयाचें असल्यास तें पाठविणें किंवा नाहीं हें सरकारच्या मर्जीवर राहील असें ठरलें आहे. जीवा साठीं केलेलें अपील विलायत सरकारापर्यंत पोहोंचूहि नये अशी न्यायदेवतेस बंदी कशासाठीं?

शस्त्रप्रयोगाची कमाल— म्याड्रिड येथील प्रोफेसर मॉल यांनीं असें प्रतिपादन केलें होतें कीं क्षयरोगग्रस्त इसमाची रोगमुक्तता शस्त्रप्रयोगानें कारितां येणें शक्य आहे. व त्या प्रमाणें त्यांनीं एका क्षयग्रस्त बाईवर प्रयोग करून दाखविला. तिची छाती कापून नळ्या आणि फुफुसें उघडलीं, व फुफुसांतील सर्व नळयांत औषधें घालून साफ करून कुजलेले भाग कापून काढले तेव्हां पासून ती बाई चांगला सुधारत आहे. शस्त्रक्रियेंत युरोपियन लोकांचा हात धरणार कोणी नाहीं. क्षयासारख्या असाध्य रोगांवर शस्त्र चालवून रोगी बरें करणें हें शस्त्रक्रियेची व प्रोफेसरांची थोरवी व महती दाखवितात. शु सू.

बोअर लोकांचीं घरें जाळणें, त्यांचीं शेतें जाळणें, बायकामुलांस आश्रयरहित करून देशोधडीस लावणें इत्यादि अनेक अनन्वित कृत्यें ख्रिश्चन धर्माचें विरुद्ध ब्रिटिश शिपाई करीत आहेत. शत्रूंशीं टक्कर देणें ही लढाई, त्यांच्या बायका पोरांना छळणें हा नामर्दपणा; शत्रूबरोबर दंड ठोकून दोन हात करणें हें खऱ्या शिपायाचें काम; त्यांचीं घरें जाळणें हें भागूबाईपणाचें लक्षण होय, समरांगणावर लढता लढतां आंगांतून घाम काढणें हा खरा शिपाई बाणा, शत्रूंचीं शेतें जाळण्या पोळण्यांत प्रतिष्ठा मिरविणें हें म्याड मनुष्याचें काम आहे. मो.

मेरिट सरटिफिकिटाची लालूच:— आपण होऊन खानेसुमारीच्या कामास मदत करण्याचे मनांत आणून खुषीनें फुकट काम करणारे विद्यार्थी असतील तर त्यांची नांवें कळविण्याविषयीं सरकार मार्फत कित्येक मराठी शाळामास्तरांना विचारण्यांत आलें आहे. व असेंही सुचविण्यांत आलेलें आहे कीं खुषीनें खानेसुमारीच्या कामासाठीं सरकारास मदत करणारे लोकास सरकारा कडून त्यांच्या सौजन्या बद्दल सरटिफिकिटें देण्यांत येणार असून त्यांतल्या त्यांत जे विशेष चांगल्या रीतीनें काम करितील त्यांना त्यांच्यापेक्षांही जास्त किमतीचे बक्षीस मिळण्याबद्दल तजवीज करण्यांत आलेली आहे. व या पासून रोख पैसे घेण्यापेक्षां परिणामीं जास्त फायदा होण्याचा संभव आहे ही गोष्ट विद्यार्थी लोकांस चांगल्या रीतीनें समजून सांगावी.

लहान वयापासूनच सरकारचीं कामें सौजन्याच्या सरटिफिकीटासाठीं आपला उद्योग सोडून फुकट करण्याचें बाळकडू आपल्या मुलांना न घालूं देण्याबद्दल लहान मुलांच्या आईबापांनीं दक्ष असलें पाहिजे.

---

## नोटीस

बेशमी चिनकाजी वल्लद दर्याजी मयत वारस मुलगा गणपती अज्ञान पालन करणार मारोती वल्लद भवानी मत्ते राहणार पाटखेडें तालुका आकोला.—

यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं माझ्या नांवाचा ६०० रुपयांचा गहाण रोखा चिनकाजीनें २८।४।९७ रोजीं करून दिला होता. सदर्हू गहाणाच्या कर्जांत रुपये १२० वसूल पोंचला आहे. बाकीच्या कर्जाचा हिशेब करून दोन अडीच महिन्यापूर्वीं चार पंचा समक्ष तुह्मी सर्व कर्जाची बाकी उक्ती ७०० सातशे रुपये खंडली आणि तिच्या फेडी मध्यें तुह्मी असा ठराव केला कीं गहाणाच्या चारी शेतांतील उभी पीकें मी घ्यावी, तुह्मी वायदा भरावा आणि मांगरूळ परगणें बारशीटाकळी येथील दोन सर्व्हे नंबर ह्मणजे ६७ व ६९ ची शेतें मी फरोक्त ह्मणून घ्यावी, व ती विक्री पुरी करण्यासाठीं तुह्मी त्यांची खाती माझ्या नांवानें बदलून द्यावी. ज्या वेळेला हा ठराव पुरा होईल त्या वेळेला गहाणाचा उलगडा व्हावयचा होता. परंतु हा ठराव होते वेळा पूर्वींच तुह्मी १५॥ मण कापूस नेला होता त्याची किंमत रुपये ४२–१० आणे तुह्मी मला देण्याचे कबूल केले.

या करारा प्रमाणें मी एकंदर ३ खंडी कापूस व २ खंड्या जवारी मिळून २६६ रुपये किंमतीचा माल घरीं आणिला. व तंबाखू २ मण किंमत ९ रुपयांचा व रा. जगुरा ९ पायली किंमत २ रुपयांचा मिळून सर्व पीक २७२ रुपयाचें माझ्या हातीं लागलें. पण तुह्मी अद्याप मांगरूळच्या शेतांची खातीं बदलून देत नाहीं. सरकारी वायदा भरला नाहीं व तुह्मी नेलेल्या कापसा बद्दल ४२ रुपये १० आणे ही रकम आणून देत नाहीं.

वरील करारा प्रमाणें तुह्मी वागण्यास चुकाल तर कर्जाची खंडून टाकलेली रकम मी मंजुर करणार नाहीं; आणि २७२ रुपये गहाणांत वसूल देऊन बाकीच्या कर्जाबद्दल कोर्टांत फिर्याद करीन. कराराची संपूर्ण अंमलबजावणी करण्यास तुह्माला ही नोटीस पोंचेल त्या तारखे पासून चार आठवड्यांची मुदत दिली आहे. या मुदतींत तुह्मी सर्व करार पूर्ण न कराल तर हा करार तुह्मा आह्मा मध्यें कायमचा होत नाहीं असें मला पक्कें समजावें लागेल. पंचांनीं करून दिलेला ठराव तुह्मी पुरा न केल्यामुळें माझ्यावर कोणत्याच प्रकारची जोखीम राहणार नाहीं. आणि मला मात्र निरुपायास्तव तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून सर्व खर्चासह रकम तुह्माकडून भरून घ्यावी लागेल. कळावें. तारीख २१ फेब्रुवारी सन १९०१ इसवी.

सही

कन्हताजी वल्लद चहादाजी

शेंडे राहणार पाटखेडे

तालुका आकोला

निशाणी वखर

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.